
CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

धाराशिव | शनिवार, २९ नोव्हेंबर २०२५ | वर्ष ३ रे अंक २६९ | पाने १२ | किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. ▌dainiktarunbharat.com ▌epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



समाज आपला जसा आहे तसाच स्वीकारला पाहिजे. गुणांबरोबरच दोषही न रागवता सौम्यपणानेच घ्यावे लागतील. विचारांची उग्रता व व्यवहार सौम्य अशी सांगड हवी.

**- मोरोपंत पिंगळे**
रा. स्व. संघाचे पूर्व सह सरकार्यवाह

## महत्त्वाचे

### अनिश्चिततेच्या कारभारात निर्देशांक सपाट

**मुंबई :** देशाचा जाहीर झालेला आर्थिक विकास दर आणि उत्पादन



विकास दरामुळे शेअर बाजारात अनिश्चिततेचे वातावरण पसरले त्यातूनच निर्देशांक आणि निफ्टी सपाट बंद झाले. ३० शेअर्सवर आधारित मुंबई बाजारातील निर्देशांक अवघ्या १४ अंकांनी खाली आला तर निफ्टीत १३ अंकांची घसरण झाली. ज्या कंपन्यांचे शेअर्स घसरले त्यात पॉवर ग्रीड, इटर्नल, भारती एअरटेल, ॲक्सिस बँक आणि इन्फोसिस यांचा समावेश होता. या स्थितीतही महिंद्रा, सन फार्मा, कोटक महिंद्रा आणि एसबीआयचे शेअर्स किंचित वधारले होते.

### मिर्झा एक्सप्रेस थांबली

## सुप्रसिद्ध कवी डॉ. मिर्झा बेग यांचे निधन

**अमरावती :** सुप्रसिद्ध कवी, हास्यसम्राट 'मिर्झा एक्सप्रेस' फेम डॉ. मिर्झा रफी अहमद



बेग यांचे शुक्रवार, २८ नोव्हेंबरला सकाळी ६.३० वाजता दीर्घ आजाराने निधन झाले. ते ६८ वर्षांचे होते. यवतमाळ जिल्ह्यातील नेर तालुक्यातील धनज-माणिकवाडा हे त्यांचे मूळ गाव आहे. सध्या अमरावती येथील वलगाव रोडवरील नवसारी परिसरात 'मिर्झा एक्सप्रेस' या घरात त्यांचे वास्तव्य होते. त्यांच्या पश्चात पत्नी फातेमा मिर्झा, अभियंता मुलगा रमीज, महाजबी व हुमा या दोन कन्या आहेत. त्यांच्यावर अमरावती येथील ईदगा कब्रस्तानात दुपारी अंत्यसंस्कार करण्यात आले. खासदार अनिल बोंडे व साहित्यासह विविध क्षेत्रातील मंडळींनी त्यांचे अंत्यदर्शन घेतले.

### बिहारच्या उपमुख्यमंत्र्यांच्या स्वागत रॅलीत गोळीबार

**लखीसराय :** बिहारचे उपमुख्यमंत्री विजय सिन्हा लखीसराय विधानसभा मतदारसंघातून सलग पाचव्या विजयानंतर शुक्रवारी बरहिया येथे पोहोचले. त्यांच्या स्वागतासाठी समर्थकांनी बंदुकीतून गोळीबार करून स्वागत केले. यावेळी आजूबाजूने जाणारे लोक काही काळ घाबरले. यावेळी विजय सिन्हा गाडीतून माईक घेऊन बोलताना दिसले- आमचे सरकार स्थापन केल्याबद्दल लखीसरायच्या जनतेचे आभार. त्यांच्या या आवाजादरम्यान समर्थक गोळीबार करत राहिले.

### तिरुमलासारखे भव्य वेंकटेश्वर मंदिर उभारणार

**अमरावती :** आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी अमरावतीतील वेंकटपालेम येथील वेंकटेश्वर स्वामी मंदिराच्या विस्ताराची पायाभरणी केली. तिरुमला मंदिराच्या धर्तीवर २६0 कोटी रुपये खर्चून मंदिराचा विस्तार केला जाईल. हे मंदिर अवघ्या अडीच वर्षांत पूर्ण करण्याचे लक्ष्य आहे.मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी अमरावतीमधील वेंकटपालेम वेंकटेश्वर स्वामी मंदिराच्या मोठ्या विस्ताराची पायाभरणी केली. तिरुमलाच्या धर्तीवर हे मंदिर साकारले जाणार आहे. पहिल्या टप्प्याला १४0 कोटी रुपये आणि दुसऱ्या टप्प्याला १२0 कोटी रुपये खर्च येईल. यामध्ये सात मजली राजगोपुरम, पुष्करणी, अन्नदानम संकुल, विश्रामगृह आणि एक मोठे पार्किंग लॉट असेल.

# नगरपंचायत, नगरपरिषद निवडणुकांना स्थगिती नाही

**● सर्वोच्च न्यायालयाचा आदेश ● निकालाची वैधता ठरेल अंतिम आदेशावर**

◆ **नवी दिल्ली, २८ नोव्हेंबर**

महाराष्ट्रात सध्या सुरू असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक प्रक्रियेला सर्वोच्च न्यायालयाने हिरवा कंदील दिला आहे. ज्या नगरपंचायती आणि नगर परिषदांमधील आरक्षण ५० टक्क्यांच्या वर गेले आहे अशा ठिकाणचे निकाल जानेवारी महिन्यात होणाऱ्या सुनावणीतील निर्णयावर अवलंबून राहील, असेही न्यायालयाने स्पष्ट केले आहे. निवडणुकांना स्थगिती न दिल्याने उमेदवारांनी सुटकेचा नि:श्वास टाकला आहे.

निवडणुकांना स्थगिती न दिल्याने २८८ नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या निवडणुका घोषणेप्रमाणे होणार आहेत. एकीकडे राज्यात निवडणूक प्रचाराचा धुराळा सुरू असताना दुसरीकडे आरक्षणाची ५० टक्के असलेली मर्यादा ओलांडल्याचे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात सुरू आहे. आरक्षणाच्या मुद्यावर शुक्रवारी सरन्यायाधीश सूर्य कांत आणि न्यायमूर्ती जोयमाला बागची यांच्या न्यायासनासमोर सुनावणी



झाली. राज्य सरकारने काही ठिकाणी ओबीसी व इतर घटकांना जास्त प्रमाणात आरक्षण देत घटनात्मक चौकट ओलांडल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रद्द करण्यात याव्यात यासाठी विकास गवळी यांनी याचिका दाखल केली आहे. तर बांठीया आयोगाच्या अहवालानुसार कायद्याच्या चौकटीत राहून आरक्षण निश्चित केल्याचा दावा राज्य सरकारने केला. दोन्ही बाजूंचे मुद्दे ऐकून घेतल्यानंतर न्यायासनाने अंतरिम आदेश जारी करीत सध्या प्रक्रिया सुरू असलेल्या नगरपरिषद व नगरपंचायतींच्या निवडणुका ठरल्याप्रमाणे होतील, असे सांगितले.

या प्रकरणावर येणाऱ्या २१ जानेवारीला तीन सदस्यीय न्यायासनासमोर सुनावणी होणार असल्याचे न्यायासनाने स्पष्ट केले. तथापि, ज्या ठिकाणी आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडली आहे तेथील निकाल जानेवारी महिन्यात होणाऱ्या निर्णयावर अवलंबून राहणार असल्याचे स्पष्ट केले. सोबतच सर्वच निवडणुकांची वैधताही तपासली जाणार असल्याचे न्यायालयाने म्हटले आहे. त्यामुळे सर्वच निवडणुकांचे निकाल हे कोर्टाच्या अंतिम आदेशावर अवलंबून राहणार आहे.

नगर परिषदा आणि नगर पंचायतींसाठी २ डिसेंबरला मतदान होणार असून ३ डिसेंबरला मतमोजणी व निकाल जाहीर होणार आहे. ◂(वृत्तसंस्था)

### आरक्षणाची मर्यादा ओलांडल्याची कबुली

»» ४० नगरपरिषदा आणि १७ नगरपंचायतींमध्ये ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडल्याची कबुली राज्य सरकारने दिली आहे. त्यामुळे संतुलित आरक्षण रचनेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित झाले होते. सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारच्या सुनावणीत एकीकडे राज्य सरकारला दिलासा देत दुसरीकडे आरक्षणाची मर्यादा ओलांडलेल्या ठिकाणचे निकाल जानेवारीत होणाऱ्या अंतिम निकालाच्या अधीन असतील, असे स्पष्ट केले.

### पं. स., जि. प., मनपा निवडणुकांत ५० टक्के मर्यादेचे पालन करा

»» नगरपरिषद आणि नगरपंचायतींच्या निवडणुका संपल्यानंतर पंचायत समिती, जिल्हा परिषद आणि महानगरपालिकांच्या निवडणुका होणार आहेत. या निवडणुकांमध्ये ५० टक्के आरक्षणाच्या मर्यादेचे पालन करा, असा निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे.

### नव्याने आरक्षण सोडत काढावी लागणार

»» १७ जिल्हा परिषद आणि २ महानगरपालिकांमध्ये ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडली आहे. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश पाहता या ठिकाणी नव्याने आरक्षण सोडत काढावी लागणार आहे.

### आरक्षणाची ५० टक्के मर्यादा ओलांडलेल्या संस्था

| नगरपरिषद | नगरपंचायत | पंचायत समिती | जिल्हा परिषद | महानगरपालिका |
|---|---|---|---|---|
| ४० | १७ | ८४ | १७ | २ |



भगवान श्रीराम यांच्या जगातील सर्वांत उंच मूर्तीचे अनावरण शुक्रवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आले. दक्षिण गोवा जिल्ह्यातील श्री संस्थान गोकर्ण जीवोत्तम मुत्त येथे प्रभू रामाची भव्य मूर्ती उभारण्यात आली आहे. कास्य धातूने तयार केलेली ही मूर्ती ७७ फूट उंच आहे.

# भारताच्या अर्थव्यवस्थेची ताकद वाढली

◆ **नवी दिल्ली, २८ नोव्हेंबर**

भारताच्या अर्थव्यवस्थेने पुन्हा एकदा आपली ताकद दाखवून दिली आहे. चालू आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीत देशाचा आर्थिक विकास दर ८.२ टक्क्यांच्या वेगाने वाढला. हा दर गेल्या सहा तिमाहींमधील सर्वाधिक आहे. ही वाढ देशांतर्गत मागणी, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि सरकारी खर्चाची ताकद स्पष्ट करणारी ठरली आहे.

मागील तिमाहीत ७.८ टक्के असलेला आर्थिक विकासदर दुसऱ्या तिमाहीत ८.२ टक्क्यांपर्यंत वाढला. अर्थशास्त्रज्ञांनी ७.३ टक्के वाढीचा अंदाज वर्तवला होता, तर आरबीआयने तो ७ टक्के राहण्याचा अंदाज वर्तवला होता. सरकारने जीएसटीमध्ये कपात, सणांपूर्वी वाढलेला साठा आणि ग्रामीण भागात मागणीत वाढ ही या वाढीमागील प्रमुख कारणे होती.

२२ सप्टेंबर रोजी जीवनावश्यक वस्तूंवरील जीएसटी दर कमी करण्यात आले. यामुळे घरगुती वस्तू आणि किराणा माल यासारख्या एफएमसीजी उत्पादनांच्या विक्रीत वाढ झाली.

**दुसऱ्या तिमाहीत विकासदर ८.२ टक्के**



जीएसटी सवलतीमुळे अंदाजे २ लाख कोटी रुपयांची अतिरिक्त बचत होईल, यामुळे खर्च वाढेल आणि अर्थव्यवस्थेला ऊर्जा मिळेल, असे अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांनी सांगितले होते. भारताच्या मजबूत जीडीपी वाढीचे श्रेय ग्रामीण अर्थव्यवस्थेतील सुधारणा, सरकारी भांडवली खर्च आणि वाढलेली निर्यात या तीन प्रमुख घटकांना दिले जात आहे.

**शेतीत सुधारणा, खाणकामात घट**

कृषी आणि खाणकाम यांचा समावेश असलेल्या प्राथमिक क्षेत्रात वार्षिक वाढ ३.१ टक्के होती. कृषी क्षेत्राची वाढ ३.५ टक्के होती, जी गेल्या वर्षीच्या तुलनेत थोडी कमी होती. खाणकाम क्षेत्र तुलनेने स्थिर राहिले, फक्त ०.०४ टक्क्यांनी घटले. दरम्यान, ग्रामीण अर्थव्यवस्थेत सुधारणा आणि चांगल्या पावसाळ्यामुळे कृषी उपक्रमांना चालना मिळाली. ◂(वृत्तसंस्था)

### विकास दराचे आकडे उत्साहवर्धक : पंतप्रधान

»» देशाच्या आर्थिक विकास दराचे जाहीर झालेले आकडे उत्साहवर्धक असल्याची प्रतिक्रिया पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिली आहे. आर्थिक विकासामध्ये सुधारणांसाठी केलेले प्रयत्न यशस्वी ठरल्याचे हे प्रतीक आहे. लोकांच्या कठोर परिश्रमाने हे साध्य झाले आहे. यापुढेही सरकार सुधारणांवर कार्य करतच राहील, असेही पंतप्रधानांनी म्हटले आहे.

## राजेश अग्रवाल राज्याचे मुख्य सचिव

◆ **मुंबई, २८ नोव्हेंबर**

राज्याचे मुख्य सचिव राजेशकुमार मीना ३० नोव्हेंबर रोजी निवृत्त होणार असल्याने, त्यांच्या जागी सामान्य प्रशासन विभागात अतिरिक्त मुख्य सचिव म्हणून कार्यरत असलेले ज्येष्ठ सनदी अधिकारी राजेश अग्रवाल यांची राज्याचे मुख्य सचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

३० जून २०२५ ला ज्येष्ठ सनदी अधिकारी राजेशकुमार मीना यांची राज्याचे नवे मुख्य सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. १९८८ च्या तुकडीचे सनदी अधिकारी असलेले राजेशकुमार मीना हे ऑगस्ट २०२५ मध्ये सेवानिवृत्त होणार होते. त्यामुळे मुख्य सचिव पदासाठी त्यांच्याकडे जुलै आणि ऑगस्ट या जेमतेम दोन महिन्यांचाच कालावधी होता. आता राजेश कुमार मीना हे ३० नोव्हेंबर रोजी निवृत्त होणार आहेत. ◂(तभा वृत्तसेवा)

## आधार कार्डाच्या आधारे दिलेले
# जन्म-मृत्यूचे दाखले रद्द करा
### महसूल मंत्री बावनकुळे यांचा आदेश

◆ **मुंबई, २८ नोव्हेंबर**

केवळ आधार कार्डाच्या आधारे दिलेले किंवा संशयास्पद वाटणारे जन्म-मृत्यूचे दाखले आणि नोंदी तत्काळ रद्द करा, तसेच याप्रकरणी पोलिस तक्रारी दाखल करण्याचे आदेश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महसूल प्रशासनाला दिले आहेत. यासंदर्भातील परिपत्रक महसूल विभागाने जारी केले आहे.

अमरावती, सिल्लोड, अकोला, छत्रपती संभाजीनगर शहर, लातूर, अंजनगाव सुर्जी, अचलपूर, पुसद, परभणी, बीड, गेवराई, जालना, अर्धापूर आणि परळी या ठिकाणी या मोहिमेवर अधिक भर दिला जाणार आहे.

१६ मुद्यांच्या आधारे या दाखल्यांची तपासणी केली जाईल. यासाठी विशेष मेळाव्यांचं आयोजन करुन प्रकरणे निकाली काढली जातील. ज्या प्रकरणांमध्ये केवळ



आधार कार्डला पुरावा मानून जन्म मृत्यू दाखले दिले गेले आहेत, ते आदेश त्रुटीपूर्ण मानले जातील. अर्जातली माहिती आणि आधार कार्डवरील जन्मतारीख यामध्ये तफावत आढळली तर संबंधित व्यक्तींवर गुन्हा दाखल केला जाईल.

जे लाभार्थी मूळ प्रमाणपत्र परत करणार नाहीत किंवा जे आता सापडत नाहीत, त्यांची यादी बनवून त्यांना 'फरार' घोषित करा आणि एफआयआर दाखल करा असेही या परिपत्रकात म्हटले आहे. ११ ऑगस्ट २०२३ च्या सुधारणेनंतर नायब तहसीलदारांनी वितरीत केलेले जन्म-मृत्यू नोंदीचे आदेश परत घेण्याचे आणि रद्द करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ◂(तभा वृत्तसेवा)

# कुलगुरुने मृत हिंदूंच्या जमिनी हडपल्या

◆ **नवी दिल्ली, २८ नोव्हेंबर**

अल फलाह विद्यापीठाचा कुलगुरू जावेद अहमद सिद्दीकीने मृत हिंदूंच्या मालकीची जमीन हस्तांतरित करण्यासाठी बनावट कागदपत्रांचा वापर केल्याचे पुढे आले आहे. या नव्या आरोपामुळे अल फलाहचे पाय आणखी खोलात जाणार आहेत. ईडी आता जमिनीच्या व्यवहारांशी संबंधित नवीन आरोपांची चौकशी करत आहे.

ईडीच्या मते, मदनपूर खादरमधील खसरा क्रमांक ७९२ असलेली जमीन तारबिया एज्युकेशन फाउंडेशनला हस्तांतरित करण्यात आली होती, जी सिद्दीकीशी संबंधित




असल्याचे म्हटले जाते. एजन्सीने असे म्हटले आहे की सादर केलेला जीपीए २००४ चा आहे, तर कागदपत्रात सूचीबद्ध बहुतेक मालक १९७२ ते १९९८ दरम्यान मरण पावले. तपास एजन्सींचे म्हणणे आहे की संपूर्ण जमीन हस्तांतरण प्रक्रिया या बनावट कागदपत्रांवर अवलंबून होती. हे बनावट कागदपत्रे मृत हिंदूंच्या नावे तयार करण्यात आली होती आणि हे कागदपत्रे केवळ बेकायदेशीर नव्हती तर जमिनीची पुनर्नोंदणी करण्यासाठी वारंवार वापरली जात होती. सिद्दीकीला १८ नोव्हेंबर रोजी मनी लॉंड्रिंगच्या आरोपाखाली अटक करण्यात आली होती.

एजन्सीचे म्हणणे आहे की तपासा दरम्यान मिळालेल्या कागदपत्रांवरून आणि डिजिटल पुराव्यांवरून जमीन व्यवहारात अनियमितता झाल्याचे सिद्ध होते. सध्या त्याची कसून चौकशी सुरू आहे. ◂(वृत्तसंस्था)

### विद्यापीठ अनुदानास अपात्र

**»» ईडीने विद्यापीठ आणि त्याच्या संलग्न कार्यालयांवर व्यापक छापे टाकले. तपासात असे दिसून आले की विद्यापीठाने त्याच्या मान्यताबाबत दिशाभूल करणारे दावे केले होते. यूजीसीने स्पष्ट केले की ही संस्था फक्त राज्य खाजगी विद्यापीठाच्या श्रेणीत येते आणि कोणत्याही अनुदान किंवा विशेष मान्यतासाठी पात्र नाही. एजन्सी आता त्याच पत्त्यावरून कार्यरत असलेल्या नऊ शेल कंपन्यांची देखील चौकशी करत आहे.**

# नगरपालिका आजतागायत जिल्ह्यातून २० सदस्य अन् १ नगराध्यक्ष बिनविरोध

**तभा वृत्तसेवा | अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर-**

जिल्ह्यातील ९ तालुक्यातील ११ नगर परिषदेसाठी अध्यक्ष पदासाठी ६६ उमेदवार तर सदस्य पदासाठी ८९३ उमेदवार रिंगणात आहेत. या निवडणुकीसाठी १५२ प्रभागातील २ लाख २२ हजार २४७ महिला, २ लाख २१ हजार १४३ पुरूष आणि इतर मतदार ९४ असे ४ लाख ४३ हजार ४८४ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. अनगर ही नगरपालिका अविरोध झाली असून, इतर ३ तालुक्यातही ३ सदस्य बिनविरोध निघाल्याने जिल्ह्यात २० सदस्य आणि १ नगराध्यक्षपदाची बिनविरोध निवड झाल्याची माहिती नगरपालिका प्रशासनाचे जिल्हा सहआयुक्त योगेश डोके यांनी दिली.

जिल्ह्यातील ९ तालुक्यातील ११ नगरपरिषदेसाठी २ डिसेंबर रोजी सकाळी ७:३० वाजल्यापासून मतदान प्रकिया पार पडणार आहे. जिल्ह्यात या निवडणुकीसाठी ४९९ मतदान केंद्र असून, १३२२ बॅलेट युनिट व ६११ कंट्रोल युनिटच्या माध्यमातून मतदान होणार आहे, मतदान प्रकिया शांततेत व व्यवस्थितपणे पार पाडण्यासाठी बूथ निहाय व केंद्र निहाय तीन पोलीस तैनात करण्यात आले आहेत. जवळपास एक हजार पोलिसांचा फौजफाटा आहे. २७०० हुन अधिक प्रशिक्षणार्थी कर्मचारी निवडणूक प्रकियेत सहभागी आहेत. सुरक्षा यंत्रणेच्या देखरेखीखाली दि. ३ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजले पासून मतमोजणी प्रकिया ज्या-त्या ठिकाणच्या गोडाऊन येथे पार पडणार असल्याची माहिती दिली.

**खालील ठिकाणचे उमेदवार बिनविरोध**

मंगळवेढा येथील बीजेपीचे प्रभाग क्र. ३ मधील सोमनाथ विष्णुपंत आवताडे आणि बार्शी येथील प्रभाग क्र. ७ च्या शिवसेनेच्या उमेदवार मीरा शीतल नाळे हे दोघेजण विरोधी पक्षाच्या उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्याने बिनविरोध झाले आहेत. तर पंढरपूर येथील प्रभाग क्र. ५ च्या कुसुम जगन्नाथ प्रचंडे या भाजपच्या उमेदवारही बिनविरोध झाल्याची माहिती जिल्हा निवडणूक कार्यालयातून मिळाली. तर अनगर नगरपालिकेचे एक नगराध्यक्ष आणि १७ सदस्य यापूर्वीच बिनविरोध निघाल्याने बिनविरोध सदस्यांची संख्या २० आणि १ नगराध्यक्ष अशा २१ जणांचा समावेश आहे.

**राज्यातील निवडणूक आयोगाचीही यंत्रणा सज्ज**

राज्यातील नगरपरिषद आणि नगरपंचायतीच्या मतदानासाठी निवडणूक आयोगाची यंत्रणा सज्ज झाली आहे.



नगरपरिषद आणि नगरपंचायतींच्या निवडणुकांसाठी एकूण १ कोटी ७ लाख ३ हजार ५७६ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. त्यासाठी सुमारे १३ हजार ३५५ मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. या निवडणुकांसाठी ईव्हीएम मशीनचा व्यवस्था करण्यात आली असून, त्यात १३ हजार ७२६ कंट्रोल युनिट आणि २७ हजार ४५२ बॅलेट युनिटची उपलब्धता करण्यात आली आहे.राज्यातील २४६ नगरपरिषदा तर ४२ नगरपंचायतींच्या सदस्यपदासाठी आणि थेट अध्यक्षपदाच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता २ डिसेंबर रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० पर्यंत मतदान होणार आहे. तर मतमोजणी ३ डिसेंबरला सकाळी १० वाजेपासून सुरु होणार आहे.

**मंगळवेढ्याबाबत आयोगाच्या सुधारित आदेशाची प्रतिक्षाच!**

ज्या जागांसाठी जिल्हा न्यायालयात अपील दाखल असून, सुनावणी प्रलंबित आहे किंवा सुनावणी झालेली आहे, परंतु आदेश अप्राप्त आहेत. त्यांची निवडणूक पुढे ढकलण्याचा निर्णय निवडणूक आयोगाने घेतला. मात्र या आदेशावर तीव्र पडसाद मंगळवेढ्यात उमटत आहेत. यासाठी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी निवडणूक आयोगाला पत्र पाठवले असून सुधारित आदेशाची प्रतीक्षा लागून राहिली. ती आज पूर्ण होण्याची शक्यता होती मात्र रात्री उशिरापर्यंत सुधारित आदेशाची प्रत मिळालेली नाही. मंगळवेढा नगरपालिका निवडणुकीतील नगराध्यक्ष पदाचे उमेदवार रागिनी कांबळे, सुप्रिया जगताप, सुनंदा अवताडे या तिघी विरोधात पंढरपूर येथील न्यायालयात तीन अपील होते. त्या अपिलाचा निकाल काल झाला; त्यामध्ये निवडून निर्णय अधिकारी मदन जाधव यांनी दिलेला निकाल कायम ठेवण्यात आला होता.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्त्वाचे...



### वडकबाळ येथील गोशाळेत ध्वजारोहण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. २८ नोव्हेंबर-**

वडकबाळ येथील श्री कट्टेव्वादेवी गोशाळेत श्री राम जन्मभूमी अयोध्या येथील राम मंदिर शिखरावर भगवा सनातन धर्मध्वजारोहण निमित्त ध्वजारोहण कार्यक्रम करण्यात आले. प्रथम गोमातेचे पूजन व आरती त्यानंतर श्रीराम प्रभू प्रतिमेचे पूजन व आरती करून भगवा सनातन धर्मध्वजारोहण करण्यात आले. सर्वांना गोड प्रसाद वाटप करून गोमय उत्पादन भेट देण्यात आले. या कार्यक्रमास संस्थेच्या अध्यक्ष उमा बिराजदार, सहाय्यक कृषी अधिकारी कस्तुरे मॅडम व मंडळ कृषीअधिकारी अश्विनी शिंत्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत व वडकबाळ येथील महिला बचत गटाच्या महिला सदस्य, गोसेवक रुद्रप्पा बिराजदार, सिद्धप्पा बिराजदार, महादेव बिराजदार, पिरप्पा बिराजदार, मल्लिनाथ बिराजदार आदी गोभक्त उपस्थित होते.



### सुदृढ बालक, सशक्त भारत अंतर्गत १०० बाल रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. २८ नोव्हेंबर-**

रोटरी क्लब ऑफ सोलापूर, जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय, सोलापूर आणि लोकमान्य टिळक सर्वसाधारण रुग्णालय बाल शल्यचिकित्सा विभाग, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने बालरुग्ण शस्त्रक्रिया शिबिर मोठ्या उत्साहात सुरू झाले. पहिल्या दिवशी १०० बाल रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया करण्यात आली. यामध्ये जीभ टाय, फिमोसिस, हर्निया, अवांतरित अंडकोष, नाभी हर्निया आणि सिस्ट यांसारख्या शस्त्रक्रिया नियोजित आहेत.

शिबिराचे उद्घाटन डॉ. वर्षा डोईफोडे जिल्हा शल्यचिकित्सक, डॉ. पारस कोठारी प्रमुख, बालशल्यचिकित्सा विभाग, लोकमान्य टिळक रुग्णालय, मुंबई, वैद्यकीय अधिकारी डॉ. अग्रजा चिटणीस-वरेरकर, वैद्यकीय अधीक्षक डॉ. जयश्री ढवळे, डॉ. आशा घोडके, रोटरी जिल्हा ३१३२ चे प्रांतपाल सुधीर लातुरे, २०२६-२७चे प्रांतपाल जयेश पटेल यांची प्रमुख उपस्थिती होती.

मुंबईच्या लोकमान्य टिळक सर्वसाधारण रुग्णालयातील तज्ज्ञ डॉक्टरांची टीम विशेषतः या शिबिरासाठी सोलापूरला दाखल झाली असून, जिल्हा रुग्णालयाच्या डॉक्टर आणि स्टाफ यांच्या सहकार्याने पुढील दोन दिवस शस्त्रक्रिया पार पडणार आहेत.

कार्यक्रमास सहाय्यक प्रांतपाल जयश्री चव्हाण, डॉ. ज्योती चिडगूपकर, सौ. शांता येळंबकर, सौ. पारुल पटेल, सुहास लाहोटी, मितेश पंचमीया, संतोष कणेकर, शिवाजी उपरे, पराग कुलकर्णी , प्रशांत सिंगी, बी.एस. मुंदडा, राज मिनियार , कालिदास जाजू , विलास कोल्हे, आनंद गुंड्याल, डॉ. सोनाली वळसंगकर आदी मान्यवर उपस्थित होते.



# रेशीम कोष वाहतुकीतून रेल्वेला मिळाला नवीन महसूल स्त्रोत

- पहिल्याच दिवशी १,५०० किलो वजनाचे रेशीम कोष बुक
- शेतकऱ्यांना प्रति किलो ५ रुपयांपेक्षा कमी किंमतीत वाहतूक पर्याय

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.२८ नोव्हेंबर-**

रेशीम कोष वाहतुकीच्या माध्यमातून रेल्वेला नवीन महसलू स्त्रोत मिळाला आहे. पहिल्याच दिवशी पंढरपूर विभागातील एका शेतकऱ्याने १ हजार ५०० किलो वजनाचे ३८ पोते रेशीम बुक झाले आहे. यानिमित्ताने शेतकऱ्यांना प्रति किलो ५ रुपयांपेक्षा कमी किंमतीत वाहतूक पर्याय उपलब्ध झाला असल्याचे सांगण्यात आले.

शेतकऱ्यांना किफायतशीर, थेट बाजारपेठ उपलब्ध करुन देण्याच्या सरकारच्या दृष्टिकोनानुसार, मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने २७ नोव्हेंबर २०२५ रोजी पंढरपूरहुन आशियातील सर्वात मोठी रेशीम कोष बाजारपेठ असणाऱ्या कर्नाटकातील रामनगरम येथे, थेट रेशीम कोष वाहतूक करुन एक महत्वाचा टप्पा गाठला आहे.

कर्नाटकातील बेंगळुरू जवळील रामनगरम हे आशियातील सर्वात मोठे रेशीम कोष व्यापार केंद्र आहे. पंढरपूर, सोलापूर आणि कलबुर्गी ते रामनगरम पर्यंत रेशीम कोषची परवडणारी, एंड-टू-एंड वाहतूक शक्य होईल, यामुळे शेतकऱ्यांना थेट बाजारपेठ उपलब्ध होईल, लॉजिस्टिक्स खर्चातही घट होईल, असे सांगण्यात आले.

सोलापूर विभाग आधीच रामनगरम ला ट्रेन क्रमांक १६५३६ पंढरपूर-म्हैसूर गोलगुंबज एक्सप्रेस आणि १७३०८ बागलकोट-म्हैसूर बसवा एक्सप्रेसने जोडलेला असला तरी, रामनगर येथे पाच मिनिटापेक्षा कमी वेळेचा थांबा असल्यामुळे सिल्क कोकन्स लवकर बुक करता आले नाहीत.

### स्वस्त, वेगवान, सुरक्षित वाहतूक

रेल्वे आधारित वाहतूक ३० टक्क्यांपेक्षा जास्त स्वस्त तसेच रस्ते किंवा इतर वाहतुकीपेक्षा खूप वेगवान व सुरक्षित अशी आहे.

### सोलापूर विभागातून धावणाऱ्या रेल्वेगाड्या

१६५३६ गोलगुंबज एक्सप्रेस ही पंढरपूरहून दुपारी २:०० वाजता आणि सोलापूरहून दुपारी ३:३० वाजता रामनगरमकडे निघणारी दररोजची रेल्वेसेवा.

१७३०८ बसवा एक्सप्रेस ही सोलापूरहून १९:३० वाजता आणि कलबुर्गीहून २१:१५ वाजता राम नगरमकडे जाणारी दैनिक रेल्वेसेवा.

या समस्येचे निराकरण करण्यासाठी व शेतकऱ्यांना लॉजिस्टिक सहाय्य प्रदान करण्यासाठी मध्य रेल्वे आणि दक्षिण पश्चिम रेल्वे यांनी संयुक्तपणे प्रयत्न केले, असेही सांगण्यात आले.

## श्री ईश्वरस्वरुप सत्यदर्शनम् पुस्तकाचे प्रकाशन



**तभा, वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. २६ नोव्हेंबर-**

सोलापूर पेन्शनर्स असोसिएशनच्या कार्यालयात गुरूवारी एका उत्साही प्रकाशन सोहळ्यात श्री ईश्वरस्वरूप सत्यदर्शनम आणि श्री विठ्ठल प्रार्थना या दोन महत्त्वाच्या पुस्तकांचे प्रकाशन झाले. घालदेव जाधव यांनी संपादित केलेल्या श्री ईश्वरस्वरूप सत्यदर्शनम् या पुस्तकातून ईश्वराचे स्वरूप, त्याची कारणे आणि ईश्वर आश्वासन या संकल्पना सामान्य लोकांना सहजपणे समजून घेता येणार आहेत.

या कार्यक्रमाला उपस्थित असलेले महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी यांनी आपल्या भाषणात या दोन्ही ग्रंथांचे महत्त्व अधोरेखित केले. ''साम ान्य वाचकांना क्लिष्ट वाटणाऱ्या अध्यात्मिक विषयांची माहिती या ग्रंथातून सोप्या भाषेत मिळाली आहे,'' असे त्यांनी सांगितले. श्री ईश्वरस्वरूप सत्यदर्शनम या ग्रंथातून ईश्वर काय आहे? कोण? केव्हा? का येतो? कसा येतो? यासारख्या मूलभूत प्रश्नांची उत्तरे मिळतील, तसेच ईश्वर आश्वासन काय आहे? कोठे देतात? कोणाला देतात? केव्हा देतात? या प्रश्नांचा उलगडा सामान्य वाचकांसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरेल, असे मत कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

गीता ज्ञानेश्वरी मंदिर, लिमयेवाडी येथील अच्युत मोफरे महाराज यांनी प्रकाशित केलेल्या या पुस्तकांचा प्रकाशन सोहळा जिल्हा पेन्शनर्स असोसिएशनचे अध्यक्ष सदाशिव उंब्रजकर, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी, जिल्हा कोषागार अधिकारी वैभव राऊत, अपर कोषागार अधिकारी रामकृष्ण डंके यांच्या हस्ते पार पडला. यावेळी भालचंद्र धुमाळ, सुभाष रंगदाळ, अरुण डांगे, प्रा. विलास मोरे, श्याम कांबळे, गौरीशंकर कोनापुरे, विजय अभ्यंकर, इंडे प्रिंटर्सचे श्रीशैल इंडे यांच्यासह अनेक साहित्यप्रेमी आणि मान्यवर उपस्थित होते.

### मतदान व मतमोजणी कालावधीत मद्य विक्री बंद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२७ नोव्हेंबर-**

सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट, अकलुज, बार्शी, दुधनी, मैंदर्गी, करमाळा, कुडुवाडी, मंगळवेढा, मोहोळ, पंढरपूर, सांगोला नगरपरिषद सदस्यपदांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी २ डिसेंबर रोजी मतदान तर ३ डिसेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. या सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने मतदान व मतमोजणी कालावधीत मद्य विक्री बंद ठेवण्यात यावे, असा आदेश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी काढले आहेत.

संबंधित नगरपरिषदा/नगरपंचायत निर्वाचन क्षेत्रामध्ये सार्वजनिक शांतता व कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी नगरपरिषदा/नगरपंचायत निर्वाचन क्षेत्रातील सर्व देशी/विदेशी किरकोळ मद्य विक्री व ताडी विक्री अनुज्ञप्ती (नमुना एफएल-२. एफएल-३, एफएल-४ (क्लब अनुज्ञप्ती), एफएल/बीआर-२, सीएल-२, सीएल-३., सीएल/एफएल/टिओडी-३, टिडी-१ इ.) इत्यादी) खालील प्रमाणे बंद ठेवण्याचे आदेश देत आहे. त्यात कसूर झाल्यास संबंधित अनुज्ञप्तीधारकांविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असेही यात म्हटले आहे.

## मसिहा संस्थेच्या रक्तदान शिबिरात ३१० रक्तपिशव्यांचे संकलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२९ नोव्हेंबर-**

संविधान व शहीद दिनानिमित्त येथील मसिहा सामाजिक बहुद्देशीय संस्थेच्या वतीने आयोजित केलेल्या रक्तदान शिबीरात ३१० रक्तपिशव्यांचे संकलन झाले. याकामी सोलापूर ब्लड बँकेने सहकार्य केले, असे संस्थेचे संस्थापक अमित मंचले यांनी सांगितले.



माजी आमदार नरसय्या आडम यांच्या हस्ते या शिबीराचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी श्रीदेवी फुलारे, वैष्णवी करगुळे, श्रीकांत डांगे, ॲड.अनिल वासम, मारेप्पा कंपली यांची प्रमुख उपस्थिती होती, असेही त्यांनी सांगितले.

## थकबाकी वसुलीसाठी झेडपी घेणार विधी सेवा प्राधिकरणाची मदत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ नोव्हेंबर-**

मुख्यमंत्री समृध्दी पंचायतराज अभियानांतर्गत राज्य सरकारने ग्राम पंचायत घरपट्टी (मालमत्ता कर), पाणीपट्टी आदी करांच्या थकबाकीवर ५० टक्के सवलत जाहीर केली आहे. थकबाकीची १०० टक्के वसूल करण्यासाठी झेडपी अर्थात जिल्हा परिषदेने जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाची मदत घेतली जाणार आहे. यासंदर्भात जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाने १३ डिसेंबर २०२५ रोजी लोक अदालत घेण्यात येणार आहे, असे सीईओ कुलदीप जंगम यांनी सांगितले.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाने नुकतीच जिल्ह्यातील ११ तालुक्यांतील गटविकास अधिकाऱ्यांची बैठक घेतली. घरपट्टी व पाणीपट्टी वसूल करण्यासाठी जिल्हा परिषदेकडून ग्रामस्तरावर विशेष मोहिमा राबविण्यात येत आहेत. पहिल्या मोहिमेत कोट्यवधी रुपयांचा कर जमा झाला. चांगले काम करणाऱ्या ग्रामपंचायतीचा व ग्रामसेवकांचा सन्मान देखील करण्यात आला. ५० टक्के कर सवलत घेण्यापूर्वी ग्रामपंचायतींनी ग्रामसभा घेणे आवश्यक आहे. त्या ग्रामसभेत ५० टक्के कर सवलतीसंदर्भातील ठराव करणे बंधनकारक आहे, असेही त्यांनी सांगितले.

## ...अन्यथा स्मार्ट मीटर फोडू : संभाजी ब्रिगेड

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.२९ नोव्हेंबर-**

अदानी समूह कंपनी मार्फत वीज ग्राहकांना नवीन टीओडी मीटर म्हणजेच स्मार्ट मीटर बसवण्याचे काम संपूर्ण महाराष्ट्रात दिले आहे. हे मीटर बसवण्यासाठी कंपनीच्या लोकांकडून सक्ती केली जात आहे. स्मार्ट मीटर बसवणे बंद करून ज्यांना लावले असतील ते मीटर काढण्यात यावे अन्यथा स्मार्ट मीटर फोडण्यात येईल, असा इशारा संभाजी ब्रिगेडच्यावतीने देण्यात आला.



ग्राहक घरी नसताना त्यांचे बाहेरील भिंतीवरचे मीटर परस्पर त्यांच्या परवानगी शिवाय बदलले जात आहेत. इथून पुढे तुमच्या घरी मीटर रीडिंगसाठी लाईट ऑफिसचे कर्मचारी येणार नाहीत व हे स्मार्ट मीटर कंपल्सरी बसवणे बंधनकारक आहे. असे सांगून ग्राहकांचा फसवणूक करत आहेत. हे मीटर बसवल्यानंतर ग्राहकांना दुप्पट ते तिपटीने बिल वाढवून येत आहे.

या मीटरच्या वाढीव बिला संदर्भात नागरिक लाईट ऑफिसला गेले असता तिथल्या अधिकारी त्यांची दखल घेत नाहीत, असे सांगण्यात आले.

स्मार्ट मीटरच्या विरोधात निदर्शने करण्यात आली. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद आणि विद्युत विभाग अभियंता यांच्याकडे निवेदनही देण्यात आले. याप्रसंगी संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष संभाजी भोसले, महानगर प्रमुख जगदाळे, महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुखा मीनल दास, गणेश कदम, मनीषा कोळी, सुनीता घंटे, राजेंद्र माने, शेखर भोसले, सिद्धाराम सावळे, सतीश वावरे, जरयाब आबादिराजे, साहिल बागवान, अस्लम शेख, मुरतुज शेख, इस्माईल शेख, गऊस शेख, शफिक मकाशे आदी उपस्थित होते.

# पंडीत भीमण्णा जाधव, व्यंकटेशकुमार जाधव यांना आकाशवाणी संगीत संमेलनात सुंद्रीवादनकरिता निमंत्रण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. २८ नोव्हेंबर-**

आकाशवाणी सगीत संमेलन निमंत्रण भारत सरकार कडून आकाशवाणी पुणे केंद्र व आकाशवाणी धारवाड केंद्राच्या माध्यमातून पंडीत भीमण्णा जाधव, व्यंकटेशकुमार यांना सुंद्रीवाद्य वादनकरिता निमंत्रण आलेल्याची माहिती जागतिक कीर्तीचे सुंद्रीवादक पंडीत भीमण्णा जाधव यांनी माहिती दिली.

आकाशवाणी संगीत संमेलन प्रसार भारती सांस्कृतीक मत्रालंय भारत सरकारच्या माध्यमातून ७३ वे वर्ष निम्मित भारत देश्यातील ए व टॉप ग्रेड च्या निवडक कलावंताना निमंत्रीत करण्यात आले आहे. हा आकाशवाणी सगीत संमेलन होणार आहे.त्यामध्ये सोलापूरचे पिता पुत्र पंडीत भिमण्णा जाधव मास्टर व्यंकटेशकुमार (सुंद्रीवाद्य वादन) पंडीत रविकिरण नाकोड (तबला) मल्लमल्लेश देसाई कल्लूर (दुक्कड) वाद्य साथ करणार आहेत.





पंडीत भिमण्णा जाधव हे सुंद्रीसम्राट पंडित सिद्राम जाधव यांचे नातू तर वडील पंडित चिदानंद जाधव यांचे चिरंजीव होय. वयाच्या ७ व्या वर्षी त्यांनी युवावाणी ऑल इंडिया रेडिओसाठी प्रसारक म्हणून सार्वजनिक पदार्पण केले सोलापूर सुंदरी हे दुर्मिळ आणि अद्वितीय वाद्य आहे. ज्यांचे पालनपोषण शोधण्याचा आणि सामान्य लोकांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केवळ जाधव कुटुंबापुरता मर्यादित नाही पंडित भीमण्णा यांनी या वाद्याचा भारताच्या सीमेपलीकडे गौरव केला आहे, त्यांनी फ्रान्स आणि बेल्जियममध्ये आपली कला सादर करून आपल्या कुटुंबाची स्वप्ने साकार केली आहेत. इंडियन कौन्सिल ऑफ कल्चरल रिलेशन्स आणि भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाने सुंद्री या दुर्मिळ वाद्याचा प्रचार आणि संकलन करण्याकरिता पंडीत भिमण्णा जाधव यांचे नांव स्वतंत्रपणे समाविष्ट केले आहे.

महाराष्ट्र राज्य सरकारने गुरु शिष्य परंपरा योजना दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र नागपूर पश्चिम क्षेत्र सांस्कृतिक केंद्र उदयपूर आणि संगीत नाटक अकादमी ऑफ म्युझिक डान्स अँड ड्रामा यांच्या माध्यमातून अनेक शिष्यांना प्रशिक्षण दिले आहे.

भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाच्या ऑल इंडिया रेडिओला सर्वोच्च श्रेणीतील टॉप कलाकार म्हणून पंडीत भिमण्णा जाधव यांना मान्यता मिळाली आकाशवाणी संगीत संमेलनांतर्गत आणि परदेशात आयोजित केलेल्या राष्ट्रीय कार्यक्रमांतर्गत राष्ट्रपती भवन, २० शिखर संमेलन, यशोभूमी उदघाटन, रामलल्ला प्रतिष्ठान अयोध्या येथे सुंद्री वादन, प्रजासत्ताक दिन कर्तव्य पथाची सुंद्री वादनाने सुरुवात अश्या अनेक प्रतिष्ठित संगीत मैफलीत सुंद्री वाद्य वादन सादर.

आकाशवाणी प्रतीयोगिता स्पर्धा पुरस्कार पश्चिम बंगाल जदुभट्ट पुरस्कार समाजभूषण पुरस्कार गुजरात रत्न पुरस्कार, केंद्रीय संगीत नाटक अकादमी उस्ताद बिस्मिल्ला खा पुरस्कार २००७, उस्ताद अल्लाउद्दीन खा संगीत आणि कला प्रदेश अकादमी सांस्कृतिक परिषद भोपाळ उस्ताद लतीफ खान सन्मान २०१९, कु.मास्टर व्येकटेंशकुमार भिमण्णा जाधव गुरुवर्य वडील पंडित भिमण्णा जाधव यांच्याकडून सुंद्री वाद्य वादनाचे प्रशिक्षण घेत आहेत.

सुद्रीसम्राट पंडित सिद्राम जाधव यांचे परंतन्डु पंडित चिदानंद जाधव यांचे नातू जाधव घराण्याची ५वी पिढीतील कलाकार सुंद्रीसारख्या दुर्मिळ वाद्याचा प्रसार करताना कु.मास्टर व्यंकटेशकुमार आकाशवाणीने दूरदर्शन, राष्ट्रपती भवन, प्रजासत्ताक दिन कर्तव्य पथाची सुंद्री वादन,भीमपलासी धारवाड, ८५ अखिल भारतीय कन्नड साहित्य संमेलन गुलबर्गा, सुरसिगार संस्था मुंबई, बाल गंधर्व संगीत महोत्सव सोलापूर, संगीत संजे बिजापूर,कलबुर्गी, कल्याण कर्नाटक फेस्टिव्हल, सगीत नाटक अकादेमी आयोजित वर्ल्ड म्युझिक डे फेस्टिव्हल दुर्मिळ समारोह नवी दिल्ली, सुंदरी सम्राट संगीत महोत्सव सोलापूर सगीतभूषण पंडीत राम मराठे सगीत महोत्सव ठाणे, रामकृष्ण आश्रम स्वामी विवेकानंद फेस्टिवल कोलकत्ता, आणि भारतातील विविध राज्ये अनेक म्युझिक वर्कशॉप्स म्युझिक फेस्टिव्हलमध्ये भाग घेतला आहे, भारत सरकारचा मिनिस्ट्री ऑफ कल्चरल माध्यमातून संस्कृतीक स्तोत्र एवं प्रशिक्षण केंद्रचा दुर्मिळ वाद्या करिता भारतातून प्रथम स्कॉलरशिप अवॉर्ड, पदमविभूषण हरिप्रसाद चौरसिया राष्ट्रीय फेलोशिप सन्मान प्राप्त सद्या तो सोलापूर येथे दमाणी विद्या मंदिर सोलापूर येथे इ. ९ वी वर्गात सीमा मोहळकर मैडम व मुख्याध्यापिका रेखा पेंबर्ती अधीन शालेय शिक्षण पूर्ण करत आहे.

# सोलापूर विद्यापीठातील संकुलांचे शैक्षणिक व प्रशासकीय मूल्यांकन जाहीर

## रसायनशास्त्र, सामाजिकशास्त्रे, संगणकशास्त्र पदार्थविज्ञान, संकुलांची उत्कृष्ट कामगिरी

**तभा, वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. २८ नोव्हेंबर-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षामार्फत २०२२-२५ या कालावधीतील बाह्य शैक्षणिक व प्रशासकीय मूल्यांकनाचा अहवाल जाहीर करण्यात आला. विद्यापीठ कॅम्पस मधील एकूण ११ संकुलांचे मूल्यमापन करण्यात आले.



यात रसायनशास्त्र, सामाजिकशास्त्रे, पदार्थविज्ञान आणि संगणकशास्त्र संकुलाने उत्कृष्ट कामगिरी नोंदवली आहे. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.मनोहर चासकर आणि मुंबई येथील विद्यापीठ विभाग फ्रेमवर्क रँकिंगचे मूल्यांकन डॉ.एम.एस. कुऱ्हाडे यांच्या समितीने सदर मुल्यांकन केले.

रसायनशास्त्र आणि सामाजिकशास्त्रे संकुलानी प्रत्येकी ८४ गुण, संगणकशास्त्र संकुलाने ७९ गुण, पदार्थ विज्ञान संकुलाने ७६ गुण, भूशास्त्र संकुलाने ७५ गुण तर भाषा आणि साहित्य संकुलाने ६९ गुण मिळविले. आरोग्य विज्ञान संकुल, कला व ललितकला संकुल, जीवशास्त्र संकुल, वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र संकुल आणि स्कूल ऑफ टेक्नॉलॉजी या संकुलांनीही समाधानकारक कामगिरी केली आहे.

प्रशासकीय विभागांचेही मूल्यमापन करण्यात आले. यात सामान्य प्रशासन (कुलसचिव कार्यालय), शैक्षणिक व संशोधन विकास, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, वित्त व लेखा विभाग, ज्ञानस्त्रोत केंद्र, नवोन्मेष व इन्क्युबेशन, कौशल्य विकास, क्रीडा विभाग, विद्यार्थी विकास विभाग, राष्ट्रीय सेवा योजना आणि वैज्ञानिक उपकरण केंद्र या विभागांचा समावेश होता.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरु डॉ.प्रकाश महानवर यांच्या हस्ते संकुल आणि विभागांना प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ.लक्ष्मीकांत दामा, प्रभारी कुलसचिव डॉ.अतुल लकडे आदींची प्रमुख उपस्थिती होती. अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ.गौतम कांबळे यांनी प्रास्ताविक केले. सहाय्यक कुलसचिव डॉ.शिवाजी शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव अनिल जाधव यांनी आभार मानले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# श्रीलंकेत चक्रीवादळाचे थैमान

**• ७६ नागरिकांचा बळी, ६०० घरे भुईसपाट • उद्या धडकणार भारताच्या किनारपट्टीवर**




चक्रीवादळामुळे अनेक घरांचे नुकसान झाले असून पुरात अडकलेल्या नागरिकांच्या मदतीसाठी बचाव पथके सरसावली आहेत

**◆ कोलंबो, २८ नोव्हेंबर**

बंगालच्या उपसागरात तयार झालेले दितवाह चक्रीवादळ गुरुवारी मध्यरात्रीनंतर श्रीलंकेच्या किनारपट्टीवर धडकले. मुसळधार पाऊस आणि सोसाट्याच्या वाऱ्यामुळे राजधानी कोलंबोसह इतर शहरात जनजीवन विस्कळीत झाले आहे. चक्रीवादळाच्या धुमाकुळामुळे आतापर्यंत ७६ नागरिकांचा मृत्यू झाला असून, ५० पेक्षा अधिक बेपत्ता आहे. ६०० पेक्षा अधिक घरांचे नुकसान झाले, तर हजारो नागरिकांना स्थलांतरित व्हावे लागले.

श्रीलंकेतील विध्वंसानंतर चक्रीवादळ भारताच्या दिशेने सरकत असून, रविवारी उत्तर तामिळनाडूच्या किनारपट्टीवर धडकण्याचा अंदाज आहे. चक्रीवादळाचा धोका प्रामुख्याने तामिळनाडू, पुद्दुचेरी, दक्षिण आंध्र प्रदेश, तेलंगणा आणि केरळच्या किनारपट्टीलगच्या भागांना बसणार असल्याचे भारतीय हवामान विभागाने म्हटले आहे. श्रीलंकेच्या आपत्ती व व्यवस्थापन प्राधिकरणाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, मुसळधार पावसाने प्रचंड नुकसान केले, अनेक भागात घरे, रस्ते आणि शेती पाण्यात बुडाली. याशिवाय अनेक भागात भूस्खलन झाले असून आतापर्यंत ७६ नागरिकांच्या मृत्यूची आकडेवारी मिळाली आहे. सोसाट्याचा वारा आणि मुसळधार पावसामुळे सहाशेपेक्षा अधिक घरे जमीनदोस्त झाली, तर ५० हून अधिक नागरिक बेपत्ता आहे. बचाव पथकाने हजारो नागरिकांना सुरक्षित स्थळी पोहोचविले आहे. बिकट परिस्थिती लक्षात घेता, सरकारने शुक्रवारी सर्व सरकारी कार्यालये आणि शाळा बंद ठेवण्याचा निर्णय घेतला. (वृत्तसंस्था)



“ श्रीलंकेतील चक्रीवादळात ज्यांनी आपले नातेवाईक गमावले त्यांच्याबद्दल माझ्या मनापासून संवेदना, मी बाधित नागरिकांच्या सुरक्षेसाठी प्रार्थना करतो. सागर बंधू मोहिमेंतर्गत भारताकडून मदत साहित्य, मानवतावादी मदत आणि आपत्ती निवारण मदत पाठवण्यात आली. संकटाच्या काळाच भारत श्रीलंकेसोबत उभा आहे. आवश्यकता भासल्यास आणखी मदत पाठवली जाईल.

**- नरेंद्र मोदी,** पंतप्रधान

### चहा उत्पादक शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान

सरकारच्या म्हणण्यानुसार, बादुल्ला आणि नुवारा एलिया या डोंगराळ चहा उत्पादक भागात सर्वात जास्त नुकसान झाले. या भागात २५ जणांचा मृत्यू झाला. आपत्ती व्यवस्थापन केंद्राच्या म्हणण्यानुसार, या दोन्ही भागात २१ जण बेपत्ता आहेत, तर १४ जण जखमी झाले. भूस्खलनामुळे अनेक महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाल्याने मदत कार्यासाठी बाधा येत आहे. ढिगाऱ्यात अडकलेल्या नागरिकांच्या बचावासाठी युद्धपातळीवर मोहीम राबवली जात आहे.

### बचावकार्यासाठी लष्कराची मदत

श्रीलंकेत गेल्या २४ तासांत ३०० मिमी पेक्षा जास्त मुसळधार पाऊस झाला. यामुळे अनेक ठिकाणी भूस्खलनाच्या, पुराच्या घटना घडल्या, आतापर्यंत ४३,९९१ लोकांना सुरक्षितस्थळी हलवण्यात आले आहे. सरकारने शाळा, महाविद्यालये, सरकारी कार्यालयांना सुटी जाहीर केली. रेल्वे सेवा थांबवण्यात आली आहे, तर कोलंबो स्टॉक एक्स्चेंजमधील व्यवहारही थांबवावे लागले. नागरिकांच्या बचावासाठी लष्कर आणि वायुदलाची मदत घेतली जात आहे.

# शक्तिशाली देशांच्या यादीत भारत तिसऱ्या स्थानावर

**• अमेरिका, चीनला देतोय् टक्कर • पाकिस्तान पहिल्या १५ मध्येही नाही**

**◆ नवी दिल्ली, २८ नोव्हेंबर**

ऑस्ट्रेलियाच्या प्रतिष्ठित लोवी इन्स्टिट्यूटने त्यांचा वार्षिक आशिया पॉवर इंडेक्स २०२५ जाहीर केला आहे, जो २७ आशियाई देशांच्या लष्करी, आर्थिक, राजनैतिक आणि सांस्कृतिक प्रभावाचे तपशीलवार मूल्यांकन प्रदान करतो. अहवालात प्रादेशिक सत्तेतील मोठे बदल अधोरेखित केले आहेत, ज्यामध्ये चीन आशियातील प्रमुख शक्ती म्हणून उदयास येत आहे. भारत सतत वाढत आहे आणि अमेरिकेचा प्रभाव मागील वर्षांच्या तुलनेत कमी झाला आहे.

अहवालात आठ क्षेत्रांवर आधारित देशांची क्रमवारी लावण्यात आली आहे (लष्करी क्षमता, संरक्षण नेटवर्क, आर्थिक ताकद, राजनैतिक प्रभाव, सांस्कृतिक पोहोच, लवचिकता आणि भविष्यातील संसाधन क्षमता). जगातील दहा सर्वात शक्तिशाली देशांमध्ये अमेरिका, चीन, भारत, जपान,रशिया, ऑस्ट्रेलिया, दक्षिण कोरिया, सिंगापूर, इंडोनेशिया, मलेशिया यांचा समावेश आहे. पाकिस्तान पहिल्या १० च्या बाहेर असून १६ व्या क्रमांकावर आहे.

**भारताची वाढती शक्ती**

अहवालात आशियातील भारताच्या वाढत्या प्रभावावर प्रकाश टाकण्यात आला आहे. भारत २०२५ मध्ये ४०.० गुणांसह प्रमुख शक्ती दर्जाचा उंबरठा ओलांडेल. अहवालानुसार, भारताची वाढ त्याच्या मजबूत आर्थिक वाढीमुळे आणि वाढत्या लष्करी क्षमतांमुळे झाली आहे. जरी भारताची लष्करी आणि संसाधनांची वाढ लक्षणीय असली तरी, त्याचा राजनैतिक आणि आर्थिक प्रभाव अद्याप त्याच्या क्षमतांच्या वाढीशी पूर्णपणे जुळलेला नाही, जो पुढील विस्तारासाठी प्रचंड क्षमता दर्शवितो.

महासत्ता श्रेणीत फक्तअमेरिका आणि चीन यांचा समावेश आहे. अमेरिका अव्वल स्थानावर आहे, परंतु २०१८ मध्ये आशिया पॉवर इंडेक्स सुरू झाल्यापासून ते सर्वात कमी प्रभाव स्कोअर दाखवत आहे. विश्लेषक याचे कारण ट्रम्प प्रशासनाच्या काळात घेतलेल्या धोरणात्मक निर्णय असल्याचे सांगतात, जे आशियातील अमेरिकेच्या प्रभावासाठी निव्वळ नकारात्मक म्हणून वर्णन केले गेले आहेत. चीन अमेरिकेसोबतचे अंतर हळूहळू कमी करत आहे, ज्यामुळे फरकाची मर्यादा २०२० नंतरच्या सर्वात कमी बिंदूवर आली आहे. (वृत्तसंस्था)

### रशियाची स्थिती मजबूत

२०१९ नंतर पहिल्यांदाच रशियाने आशियामध्ये आपले स्थान मजबूत केले आहे. युक्रेन युद्धानंतर लादलेल्या निर्बंधांमुळे त्याने गमावलेला प्रभाव परत मिळवला आहे. मॉस्कोची वाढती प्रादेशिक उपस्थिती मुख्यत्वे चीन आणि उत्तर कोरियासोबतच्या त्याच्या धोरणात्मक संरक्षण आणि आर्थिक भागीदारीमुळे आहे. २०२४ मध्ये ऑस्ट्रेलियाकडून गमावलेले रशियाने पाचवे स्थान परत मिळवले. इतर मध्यम शक्तींच्या तुलनेत जपानचा प्रभाव वाढला आहे. दक्षिण कोरिया आणि ऑस्ट्रेलियासारखे देश मध्यम शक्ती म्हणून वाढत्या प्रमाणात महत्त्वाच्या भूमिका बजावत आहेत.

# इम्रान खान जिवंत आहेत की नाही!

### पुत्र कासिमने मागितला पुरावा

**◆ इस्लामाबाद, २८ नोव्हेंबर**

पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान यांचे पुत्र कासिम खान यांनी तुरुंगात असलेल्या आपल्या वडिलांच्या जिवंत असल्याचा पुरावा मागितला आहे. इम्रान जिवंत आहेत की नाहीत हे कोणालाही माहीत नसल्याचे कासिम म्हणाला.

कासिमने एक्सवर लिहिले की, त्यांच्या वडिलांना ८४५ दिवसांपूर्वी अटक करण्यात आली होती. गेल्या सहा आठवड्यांपासून त्यांना एकाकी डेथ सेलमध्ये ठेवण्यात आले आहे. कोणालाही त्यांना भेटू दिले नाही, तसेच कोणताही फोन कॉल किंवा मेसेज दिला नाही.

कासिमने सांगितले की, त्यांच्या आत्यांनाही त्यांच्या भावाला भेटू दिले जात नाही. हे सर्व कोणत्याही सुरक्षा नियमामुळे नाही, तर जाणूनबुजून केलेली कारवाई आहे. सरकार त्यांच्या वडिलांची खरी स्थिती लपवत आहे.

दुसरीकडे, इम्रान खान यांना पाठिंबा देण्यासाठी रावळपिंडीच्या अडियाला तुरुंगात पोहोचलेले खैबर-पख्तूनख्वा राज्याचे मुख्यमंत्री सोहेल आफ्रिदी यांना पोलिसांनी गुरुवारी रस्त्यावर मारहाण केली. आफ्रिदी यांनी पाकिस्तानचे लष्करप्रमुख जनरल आसिम मुनीर यांच्यावर टीका करत म्हटले की देशातील बिघडलेल्या परिस्थितीसाठी तेच जबाबदार आहेत. इम्रान खान यांच्यापर्यंत पोहोचण्यास प्रतिबंध करणे आणि त्यांच्या आरोग्याची माहिती लपवणे हे जनतेच्या विश्वासाशी खेळण्यासारखे आहे. (वृत्तसंस्था)

### मणिपूरमध्ये चार बंडखोरांना अटक

**◆ इम्फाळ, २८ नोव्हेंबर**

सुरक्षा दलांनी इम्फाळ पूर्व आणि इम्फाळ पश्चिम जिल्ह्यांमधून खंडणीत सहभागी असलेल्या वेगवेगळ्या प्रतिबंधित संघटनांशी संबंधित चार बंडखोरांसह पाच जणांना अटक केली, असे पोलिसांनी शुक्रवारी सांगितले .

बुधवारी इम्फाळ पूर्व जिल्ह्यात कांगलेईपाक कम्युनिस्ट पार्टीच्या तीन सक्रिय कार्यकर्त्यांना अटक करण्यात आली. ते इम्फाळ पूर्व भागातील जनतेकडून, पेट्रोल पंपांवर, खाजगी शाळा आणि सरकारी महाविद्यालयांकडून खंडणीत सहभागी असल्याचे पोलिसांनी सांगितले. गुरुवारी इम्फाळ पश्चिम जिल्ह्यातील लुकर मायाई लीकाई भागातून या संघटनेच्या आणखी एका सदस्याला अटक करण्यात आली. तो बंदी घातलेल्या संघटनेसाठी तरुणांच्या भरतीत सहभागी असल्याचा आरोप आहे. सुरक्षा दलांनी गुरुवारी इम्फाळ पूर्व जिल्ह्यातील कोंठा अहल्लूप येथून एकाला अटक केली आणि त्याच्या ताब्यातून दोन हातबॉम्ब जप्त केले. (वृत्तसंस्था)

# खैबर प्रांताच्या मुख्यमंत्र्यांना पोलिसांची बेदम मारहाण

## इम्रान खानच्या समर्थनार्थ निदर्शने करणाऱ्यांवर लाठीमार

**◆ इस्लामाबाद, २८ नोव्हेंबर**

तुरुंगात असलेले पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान यांची तुरुंगात भेट घेऊ द्यावी, यासाठी पाकिस्तान तहरिक ए ए इन्साफ अर्थात् पीटीआय पक्षाचे कार्यकर्त्यांनी रावळपिंडीतील अदियाला तुरुंगाबाहेर जोरदार निदर्शने केली. यावेळी खैबर पख्तूनख्वा राज्याचे मुख्यमंत्री सोहेल आफ्रिदी यांना लाथा-बुक्क्यांनी जोरदार मारहाण करण्यात आली.



लष्कराच्या आदेशानुसार अफरीदी यांच्यावर कारवाई करण्यात आल्याचे पोलिसांनी म्हटले आहे. एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, गुरुवारी सोहेल आफ्रिदी अदियाला तुरुंगाजवळ पोहोचले, तेव्हा तेथे मोठ्या प्रमाणात बंदोबस्त तैनात होता. पीटीआय समर्थकांची गर्दीही वाढत असल्याने तणावाचे वातावरण होते. आफ्रिदींच्या आगमनामुळे परिस्थिती अधिक चिघळली.पोलिसांनी मुख्यमंत्री आणि त्यांच्यासोबतच्या नेत्यांना पुढे जाण्यापासून रोखले. यावेळी झालेल्या धक्का-बुक्कीमध्ये, पोलिसांच्या काही कर्मचाऱ्यांनी मुख्यमंत्र्यांना रस्त्यावर पाडत मारहाण केली. पीटीआय पक्षाने या घटनेचा तीव्र निषेध केला असून, ही लोकशाही अधिकारांवरचा थेट हल्ला असल्याचे म्हटले आहे.

**आंदोलन चिघळल्यास सरकार जबाबदार**

आफ्रिदी यांनी आरोप केला की, सरकारला इम्रान खान यांच्या आरोग्याबाबत आणि सुरक्षेबाबत उपस्थित झालेल्या सर्व प्रश्नांची योग्य उत्तरे द्यावी लागतील अन्यथा आम्ही जनतेसोबत रस्त्यावर उतरू. आंदोलन चिघळल्यास यासाठी सरकार जबाबदार असेल. देशातील बिघडलेल्या परिस्थितीसाठी लष्करप्रमुख असीम मुनीर जबाबदार आहे. इम्रान खान यांच्यापर्यंत पोहोचण्यास प्रतिबंध घालणे आणि त्यांच्या आरोग्याची माहिती लपवणे हा जनतेच्या विश्वासाशी खेळ आहे. (वृत्तसंस्था)

### माझ्या वडिलांना डेथ सेलमध्ये ठेवले

इम्रान खानचा मुलगा कासिम खान याने सांगितले की, त्याच्या वडिलांना ८४५ दिवसांपूर्वी अटक करण्यात आली होती. गेल्या ६ आठवड्यांपासून त्यांना डेथ सेलमध्ये ठेवण्यात आले आहे. या काळात कोणालाही त्यांना भेटू दिले नाही. हे सर्व कोणत्याही सुरक्षा नियमामुळे नाही, तर जाणूनबुजून केलेली कारवाई आहे.

### ३०० पोपटांची तस्करी करणाऱ्या दोघांना अटक

**◆ बरेली, २८ नोव्हेंबर**

उत्तर प्रदेशातील बरेली येथे वन विभाग आणि विशेष कार्य दल यांनी संयुक्त कारवाईत आंतरराज्यीय वन्यजीव तस्करांना अटक केली. ३०० हून अधिक पोपट त्यांच्या ताब्यातून जप्त करण्यात आले. हे पक्षी चार मोठ्या पिंजऱ्यात बंद करण्यात आले होते. तस्करांनी पक्ष्यांना अमानुष स्थितीत ठेवले होते.

माहितीच्या आधारे वन्यजीव तस्करांची एक टोळी बरेलीमार्गे दिल्लीकडे जात आहे. ही माहिती विश्वासार्ह होती. काही वेळातच, एक संशयास्पद वाहन थांबवण्यात आले आणि झडतीत ३०० पोपट आढळले, असे वन विभाग अधिकारी दिशा भंडारी यांनी सांगितले. या प्रकरणी दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्यांची ओळख अरसलाख खान आणि शाकिब अशी पटली आहे. अनेक जिल्ह्यांमधून पोपट पकडले आणि ते बरेलीमध्ये गोळा करून दिल्लीला नेले. तिथे ते मोठ्या प्रमाणात विकले, ही बाब चौकशीदरम्यान त्यांनी कबूल केली. हा लहान प्रमाणात होणारा बेकायदेशीर व्यापार नसून हे एक संपूर्ण नेटवर्क असण्याची शक्यता आहे. पक्षांना पकडणे हे वन्यजीव संरक्षण कायद्याचे उल्लंघन आहे. तस्करांनी हे पोपट कोणत्या माध्यमातून विकले आणि ते कोणाच्या संपर्कात होते, याचा तपास सुरू आहे. ताब्यता घेतलेले पोपट वनविभागाच्या देखरेखीत सुरक्षित आहेत. (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### ऐश्वर्यावर पाकी मौलवीची असभ्य टिप्पणी

**इस्लामाबाद :** पाकिस्तानी मौलवी मुफ्ती अब्दुल कावी यांनी अलीकडेच अभिनेत्री ऐश्वर्या राय आणि अभिषेक बच्चन यांच्यावर असभ्य टिप्पणी केली आहे. एका पॉडकास्टमध्ये त्यांनी म्हटले की, जर ऐश्वर्या-अभिषेक वेगळे झाले, तर अभिनेत्री स्वतः त्यांना निकाहचा प्रस्ताव पाठवेल. पॉडकास्टमध्ये जेव्हा त्यांना विचारण्यात आले, तुम्ही त्यांच्यासाठी तयार असाल का?. तेव्हा मुफ्तींनी उत्तर दिले, नक्कीच, मी का तयार नसेन? जेव्हा त्यांना विचारण्यात आले की तुम्ही ऐश्वर्याचा धर्म बदलणार का, तेव्हा ते म्हणाले, नक्कीच, ऐश्वर्या रायचे नाव आयशा राय असे लिहू, खूप मजा येईल. हा पॉडकास्ट सुमारे १३ दिवसांपूर्वी पाकिस्तानच्या अनफोल्ड पाकिस्तान नावाच्या यूट्यूब चॅनलवर अपलोड करण्यात आला होता. या पॉडकास्टमध्ये मुफ्ती अब्दुल कवी यांनी असाही दावा केला की राखी सावंतने त्यांना लग्नाचा प्रस्ताव दिला होता.




### ‘असंभव’मधील भूमिकेसाठी प्रियाचे अपार कष्ट



**मुंबई :** ‘असंभव’ चित्रपटात मुक्ता बर्वे आणि प्रिया बापट यांची प्रमुख भूमिका आहे. विशेष म्हणजे, यात प्रियाला भूमिकेच्या दोन वेगवेगळ्या छटा सादर करण्याची संधी मिळाली आहे. एक ३५ व्या वर्षातील असून दुसरी ७५ व्या वर्षातील आहे. प्रियाचे दोन्ही लूक अचूक व्हावे यासाठी तिने आणि मेकअप टीमने अपार कष्ट घेतले. ७५ वर्षीय वृद्धेचा रूप धारण करण्यासाठी तिला साडे तीन तास मेकअप करायला लागायचे. त्या वृद्ध पात्राचा आवाजही काढणे हे प्रियाचे कसब होते. एखादी वृद्द महिला कशी बोलेल, कशी बसेल आणि तिच्या वावरण्यात कुठेही अभिनय वाटणार नाही, याचीही खबरदारी घेण्यात आली. त्यासाठी प्रियाने अनमोल भावे याच्या मदतीने वृद्ध महिलेच्या आवाजाचा, बोलण्याच्या शैलीचा सराव केला. एकूणच काय तर पात्राला जिवंत करण्यासाठी प्रियाने अपार कष्ट घेतले.




उत्तर प्रदेशातील कानपूर जिल्ह्यात शुक्रवारी खाजगी प्रवासी बसला आग लागून तिची राखरांगोळी झाली. ही बस दिल्लीवरून वाराणसीला जात होती. ४३ प्रवाशांना सुखरूप बाहेर काढण्यात आले. आगीत बसमधील सर्व साहित्य जळून खाक झाले

# कॅनडामधील कपिल शर्माच्या कॅफेवर गोळीबार करणाऱ्याला दिल्लीत अटक

**◆ नवी दिल्ली, २८ नोव्हेंबर**

दिल्ली पोलिसांच्या गुन्हे शाखेने कॅनडामधील कपिल शर्माच्या कॅफेमध्ये झालेल्या गोळीबारात सहभागी असलेला शूटर बंधू मानसिंह सेखोनला अटक केली आहे. सेखोन हा गँगस्टर गोल्डी ब्रारशी संबंधित आहे.

गोळीबारानंतर तो भारतात परतला. सेखोन हा लॉरेन्स बिश्नोई गँगचा मोस्ट वॉन्टेड गँगस्टर गोल्डी ढिल्लोनच्या संपर्कात होता. दिल्ली पोलिसांच्या गुन्हे शाखेचे हे एक मोठे यश मानले जात आहे. अटक करण्यात आलेला आरोपी बंधू मानसिंह सेखोन हा कॅनडामधील गोळीबार घटनेतील मुख्य शूटर असल्याचे सांगितले जाते. कॅफेमध्ये झालेल्या गोळीबारामागील कट समोर येण्यासाठी ही अटक महत्त्वाची आहे. सेखोनचे गोल्डी ब्रारशी संबंध असल्याने दिल्ली पोलिस पुढील तपास करत आहेत. बंधू मानसिंह सेखोन याने कॅनडामधील कपिल शर्माच्या कॅफेमध्ये गोळीबार केला. गोळीबारानंतर तो ताबडतोब भारतात पळून आला. दिल्ली पोलिसांच्या गुन्हे शाखेने त्याला दिल्लीत अटक केली. (वृत्तसंस्था)

# चीनकडून सीमेवर रोबोट्सची फौज तैनात

**• २४ तास पहारा देणार • बॅटरी स्वतःच बदलणार**

**◆ बीजिंग, २८ नोव्हेंबर**

चीनने आपल्या तांत्रिक कौशल्याचे प्रदर्शन करणारा एक मोठा निर्णय घेतला आहे. यूबी टेक रोबोटिक्स नावाच्या कंपनीला २६४ दशलक्ष युआन किंवा अंदाजे ३७ दशलक्ष किमतीचे कंत्राट देण्यात आले आहे. या करारांतर्गत, कंपनी ग्वांग्झीच्या सीमावर्ती भागात ह्युमनॉइड रोबोट्स तैनात करेल. ही तैनाती डिसेंबरमध्ये सुरू होणार आहे.

व्हिएतनामच्या सीमेला लागून असलेल्या फांगचेंगगांग येथे हा करार झाला. येथे, यूबी टेक जुलैमध्ये लाँच झालेला त्यांचा नवीन वॉकर एस२ रोबोट तैनात करेल. हा जगातील पहिला ह्युमनॉइड रोबोट आहे जो स्वतःची बॅटरी बदलू शकतो. या वैशिष्ट्यांमुळे तो २४ तास सतत काम करू शकतो.

**रोबोट्सचा आतापर्यंतचा सर्वात मोठा वापर**

हा ह्युमनॉइड रोबोट्सचा सर्वात मोठा वास्तविक जगातील अवतार आहे. चाचण्यांमध्ये, हे वॉकर एस२ रोबोट सीमा चौक्यांवर तैनात केले जातील, जिथे ते प्रवाशांना मार्गदर्शन करण्यास, गर्दी नियंत्रित करण्यास, गस्त घालण्यास आणि



रसद हाताळण्यास मदत करतील. अहवालात असेही म्हटले आहे की ते स्टील, तांबे आणि ॲल्युमिनियम उद्योगांमध्ये तपासणीसाठी वापरले जातील. याचा अर्थ असा की रोबोट केवळ सुरक्षेसाठीच नव्हे तर औद्योगिक उत्पादनासाठी देखील वापरले जातील. (वृत्तसंस्था)

### चीनमध्ये झपाट्यात वाढतेय एआय रोबोटिक्स

चीनमध्ये एआय आणि रोबोटिक्सची व्याप्ती झपाट्याने वाढत आहे. चीन अनेक क्षेत्रांमध्ये रोबोट्सचा समावेश करत आहे. विमानतळ, सरकारी कार्यालये, प्रमुख कार्यक्रम रोबोट्स सर्वत्र आहेत. हांग्झो विमानतळाने प्रवाशांच्या प्रश्नांची उत्तरे देणारा रोबोट देखील तैनात केला आहे. शांघाय कोऑपरेशन ऑर्गनायझेशन समिटमध्ये बहुभाषिक रोबोट्सचा वापर देखील करण्यात आला. अनेक शहरांमध्ये पोलिसांप्रमाणे गस्त घालणारे रोबोट्स देखील दिसले आहेत.

### दीपिका अबू धाबीची ब्रॅण्ड ॲम्बेसेडर

**अबू धाबी :** दीपिका पदुकोण रणवीरसिंहसोबत ‘एक्सपिरीयन्स अबू धाबी’ची ब्रँड ॲम्बेसेडर बनली आहे. अबू धाबीच्या संस्कृती आणि पर्यटन विभागाने या आशयाची घोषणा केली आहे. दीपिकाचा नवरा रणवीर २०२३ पासून या मोहिमेत काम करतो आहे. आता त्यात दीपिकाचाही प्रवेश झाला आहे. त्यामुळे आता ते अशा प्रकारच्या पर्यटन मोहिमेचे प्रतिनिधीत्व करणारे हिंदी चित्रपटसृष्टीतील पहिले जोडपे ठरले आहे. भारत आणि त्यापलीकडे असलेल्या प्रेक्षकांसाठी दीपिका अबू धाबीमधून तिचा प्रवास शेअर करेल. शहराला अनुभवांनी समृद्ध असलेले डेस्टिनेशन म्हणून दाखवेल, ज्यामध्ये प्रत्येकासाठी काहीतरी पाहण्यासाठी, करण्यासाठी आणि शोधण्यासाठी काहीतरी असेल, अशी जाहिरात केली जात आहे.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# मोठ्या शून्याकडून छोट्या शून्याकडे

देशातील सर्वांत जुना वा वयोवृद्ध काँग्रेस पक्ष काही केल्या सुधारायला तयार नाही. नावापुरता नेता कुणीही असला तरी गांधी घराण्याचे वर्चस्व संपत नाही. ना काँग्रेसवाल्यांना बदल करावासा वाटतो, ना गांधी घराण्यातल्या लोकांना आता तरी काँग्रेसला स्वबळावर वाढू द्यावे, असे वाटते. सध्या काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे असले तरी काँग्रेस पक्षावर आजही गांधी घराण्याचा रिमोट कंट्रोल आहेच. खडगे हे नाममात्र आणि नामधारी अध्यक्ष आहेत. कर्नाटकातील सत्तासंघर्षात तशी कबुली त्यांनी आपल्या तोंडाने दिली आहे. गांधी घराणे काँग्रेस पक्ष चालवत असले तरी त्यात सध्या अंतिम शब्द राहुल गांधी यांचा असतो. राहुलच्या आले मना तेथे कोणाचे चालेना, अशी सध्या काँग्रेस पक्षाची स्थिती आहे. राहुल गांधी म्हणतील ती काँग्रेस पक्षात पूर्व दिशा असते. राहुल गांधींनी पश्चिम दिशेला पूर्व म्हटले तरी काँग्रेसचे नेते डोके गहाण ठेवून त्यांचीच री ओढायला सुरुवात करतात आणि तसे समोरच्याला पटवून देण्याचा प्रयत्नही करीत असतात.

बरं, ज्या राहुल गांधींची काँग्रेसमधील सर्व नेते जी-हुजुरी करतात, त्यांचे नेतृत्व, कर्तृत्व आणि वक्तृत्व असाधारण वगैरे आहे, असेही नाही. ते अतिशय साधारण आणि कोणताही वकूब नसलेले नेते आहेत. ते नेते बनले कारण ते गांधी आहेत. काँग्रेस पक्षात आजवर अनेक अध्यक्ष होऊन गेलेत. राहुल गांधी यांच्यासारखा अकार्यक्षम आणि कर्तृत्वहीन अध्यक्ष आजपर्यंत दुसरा कोणी झाला नाही. काँग्रेस पक्षातील सर्वांत अयशस्वी नेता असे त्यांचे वर्णन करावे लागेल. देशातील जनतेचा विश्वास तर काँग्रेसने गमावलाच आहे, आता पक्षातील नेत्यांचा आणि कार्यकर्त्यांचाही राहुल गांधी यांच्या नेतृत्वावरून विश्वास उडू लागला आहे. नेता तो असतो, जो पक्षात चैतन्य निर्माण करतो, नेत्यांमध्ये आणि कार्यकर्त्यांमध्ये आत्मविश्वास आणि विजयाची जिद्द निर्माण करतो. पक्षाला निवडणुका जिंकून देतो तो नेता. यातील एकही काम राहुल गांधी आजपर्यंत करू शकले नाही. काँग्रेस पक्षाला एकही निवडणूक त्यांच्या नेतृत्वात जिंकता आलेली नाही. लोकसभा आणि विधानसभा सोडा, पण साधी ग्रामपंचायत, नगरपरिषद, जिल्हा परिषद आणि महानगरपालिकेची निवडणूकही राहुलबाबांच्या नेतृत्वात काँग्रेसला धडाची फळली नाही. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत गांधी घराण्याचा बालेकिल्ला म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अमेठी मतदारसंघात राहुलबाबांचा पराभव झाला. त्यानंतरही पक्षाच्या वाट्याला सतत पराभव आले. आता काँग्रेस पक्षात राहुल गांधी यांच्या नेतृत्वाविरुद्ध आवाज उठवणे सुरू केले आहे. त्याची सुरुवात काँग्रेसचे ज्येष्ठ नेते रशीद अल्वी यांनी केली आहे. काँग्रेसचे नेतृत्व प्रियांका वढेरा यांच्याकडे सोपवावे, अशी मागणी करीत अल्वी यांनी सर्वांना धक्का दिला. एकप्रकारे त्यांनी राहुल गांधी यांच्या नेतृत्वावर अविश्वास व्यक्त करीत नेतृत्वबदलाची मागणी केली आहे.

एखाद-दुसऱ्या निवडणुकीत पक्षाचा पराभव झाला तर समजण्यासारखे असते. पण राहुलबाबांच्या नेतृत्वात काँग्रेस पक्ष एकही निवडणूक जिंकू शकला नाही. २०१४ पासून लोकसभेच्या तीन तर विविध राज्यांतील आतापर्यंतच्या ९५ विधानसभा निवडणुकांत काँग्रेस पक्षाचा पराभव झाला. पुढील दोन वर्षांत राहुल गांधींच्या नेतृत्वात काँग्रेस पक्षाने विधानसभा निवडणुकीतील पराभवाचे शतक गाठले तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. आता तर काँग्रेस पक्षाला बुडत्या जहाजाचे स्वरूप आले आहे. ते अजून पूर्णपणे बुडाले नसले तरी ते गटांगळ्या खाऊ लागले आहे हे नक्की. अशाही स्थितीत आणि इतिहास समोर असताना, काँग्रेस पक्षाला गांधी घराणेच वाचवू शकेल किंवा तेच आपले तारणहार असल्याचे त्या पक्षातील नेत्यांना अजूनही का वाटते, हा प्रश्न अनाकलनीय आहे. एकेकाळी गांधी घराण्याच्या पुण्याईवर काँग्रेस पक्ष वाढला, सत्तेवर आला, ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. मात्र, आता ती परिस्थिती राहिली नाही. २०१४ नंतर, देशात नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाचा उदय झाल्यानंतर तर परिस्थितीत झपाट्याने बदल झाला. काँग्रेसचे नेतृत्व सोनिया गांधी यांच्याकडून राहुल गांधी यांच्याकडे आल्यानंतर तर काँग्रेसचा मोठा ऱ्हास सुरू झाला. गेल्या ११ वर्षांपासून काँग्रेसची घसरण सुरू आहे, जी राहुल गांधी यांना अद्याप सावरता आली नाही. मोदी आणि अमित शाह यांच्या नेतृत्वाच्या झंझावातात राहुल गांधी यांचा पार पालापाचोळा झाला आहे. त्यामुळेच राहुल गांधी यांच्या नेतृत्वक्षमतेबद्दल पक्षात चर्चा सुरू झाली आहे. रशीद अल्वीसारखे नेते आता जाहीरपणे बोलू लागले आहेत. अल्वी खुलेआम बोलत असले तरी ती त्यांची एकट्याची भावना नव्हे. काँग्रेस पक्षातील बहुसंख्य नेत्यांची ती भावना आहे. कुणीही हारणाऱ्या घोड्यावर पैसे लावत नाही. काँग्रेस पक्षात राहुल गांधी यांची स्थिती सतत हारणाऱ्या घोड्यासारखी झाली आहे. त्यामुळेच रशीद अल्वी यांनी जाहीरपणे राहुल गांधींना काँग्रेसच्या नेतृत्वपदावरून पायउतार होण्याची सूचना आणि प्रियांका वढेरा यांच्याकडे काँग्रेसचे नेतृत्व सोपवण्याची मागणी केली आहे. रशीद अल्वी यांच्या पहिल्या सूचनेशी बहुतेक जण सहमत होण्याची शक्यता असली तरी दुसऱ्या सूचनेशी किती जण सहमत होतील, याबद्दल शंका आहे.

प्रियांका वढेरा या इंदिरा गांधी यांच्यासारख्या दिसतात, त्यामुळे त्यांच्याकडे काँग्रेस पक्षाचे नेतृत्व सोपवावे, अशी अल्वी यांची सूचनावजा मागणी आहे. आतापर्यंत प्रियांका वढेरा म्हणजे काँग्रेस पक्षासाठी झाकली मूठ सव्वा लाखाची होत्या. पण मागील काही निवडणुकीत त्यांच्याही नेतृत्वाचा फुगा फुटला. आपल्या नेतृत्वाचा करिश्मा त्या दाखवू शकल्या नाहीत. या देशातील मतदार आता शहाणा झाला आहे. नेत्याच्या चेहऱ्याकडे पाहून, वा चेहरा किती स्मार्ट आहे, कोणासारखा दिसतो, हे पाहून तो मतदान करीत नाही. कोण देशाचे कणखरपणे नेतृत्व करू शकतो, देशाला प्रगतिपथावर नेऊ शकतो, विकासाच्या मार्गावर अग्रेसर करू शकतो, हे पाहून तो मतदान करीत असतो. उगीच सलग तीन लोकसभा निवडणुकीत देशातील जनतेने नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भाजपाला निवडून दिले नाही.

थोडेसे मागे वळून पाहिले तर असे दिसते की, काँग्रेस महासचिव म्हणून प्रियांका वढेरा यांना उत्तरप्रदेश काँग्रेसचे प्रभारी करण्यात आले होते. उत्तरप्रदेश काँग्रेसचे सर्वाधिकार त्यांच्याकडे सोपवण्यात आले होते. पण त्या उत्तरप्रदेशात काँग्रेसची इभ्रत वाचवू शकल्या नाहीत. राज्यात पुन्हा एकदा काँग्रेसचे पानिपत झाले. अशा स्थितीत काँग्रेसचे नेतृत्व प्रियांका यांच्याकडे सोपवल्याने फार काही फरक पडेल, असे वाटत नाही. राहुल गांधी हे मोठे शून्य असतील तर प्रियांका या छोटे शून्य ठरतील. शून्याचा आकार लहान असो वा मोठा, त्याने फार फरक पडत नाही, असते ते फक्त शून्यच. विरोधकांचे पक्ष टिकले पाहिजेत, असे लोकशाहीप्रेमींना वाटते. काँग्रेस टिकली पाहिजे, वाचली पाहिजे, असे काँग्रेसच्या नेत्यांनाही वाटत असेल तर त्यांनी गांधी घराण्याबाहेर काँग्रेसचे नेतृत्व शोधले पाहिजे, घराण्याच्या बाहेरील नेत्याकडे काँग्रेसचे नेतृत्व सोपवले पाहिजे. घराण्याच्या बाहेरचा नेता काँग्रेसचा फार फायदा करू शकला नाही तरी फारसे नुकसानही करू शकणार नाही. काँग्रेस पक्षाने राहुलबाबांच्या नेतृत्वात नुकसानीची कमाल मर्यादा कधीचीच गाठली आहे. काँग्रेस पक्षात आता नुकसान होण्यासारखे काही उरले नाही. त्यामुळे काँग्रेस पक्ष वाचला पाहिजे, टिकला पाहिजे, असे काँग्रेसच्या नेत्यांना प्रामाणिकपणे वाटत असेल तर त्यांनी गांधी घराणे किंवा त्या घराण्याचे नेतृत्व वगळून विचार सुरू केला पाहिजे. तसेही राहुल गांधी गरज असताना काँग्रेस पक्षाला वाऱ्यावर सोडत वारंवार परदेशात जातच असतात. हलाखीला आलेला पक्ष तरीही कसाबसा चालतोय. आता गमावण्यासारखे काहीही राहिलेले नाही. त्यामुळे पठडीबाहेरचा विचार करून काँग्रेसने एकदा हा प्रयोग करून पाहायला हरकत नसावी. शून्यांच्या पल्याड गेलात तरच आकडेमोड सुरू होईल, हे काँग्रेस नेत्यांनी समजून घ्यायला हवे.

## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# ही तर रामराज्याची नांदी...



जानेवारी २०२४ रोजी अयोध्येत भगवान श्रीरामांच्या जन्मभूमी मंदिरात प्रभू रामललांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा झाली आणि २५ नोव्हेंबर २०२५ रोजी धर्मध्वज फडकवण्यात आला. हा सोहळा अभिजित मुहूर्तावर म्हणजेच सकाळी ११.४५ ते दुपारी १२.२९ दरम्यान संपन्न झाला. हा ऐतिहासिकदृष्ट्या, धार्मिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा क्षण होता. या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वत: ध्वजारोहण केले. यावेळी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत उपस्थित होते. सुमारे पाचशे वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर, असंख्य बलिदानानंतर हा क्षण पाहायला मिळाला आहे, हे आपल्या पिढीचं भाग्य आहे. माउली म्हणतात, ''रुप पाहता लोचनी । सुख झाले वो साजणी'' विठ्ठलाचं दर्शन झालं आणि सुखाशी नातं जडलं. हे सुख कशामुळे प्राप्त झालं तर, अनेक जन्मांपासून जे सत्कर्म केलं, त्यामुळे हे सुख प्राप्त झालं आहे. मी अतिशय खात्रीने सांगू शकतो की जसा आनंद माउलींना विठ्ठलाचं रूप पाहिल्यावर झाला, तसा आनंद आज प्रत्येक हिंदूला झाला असावा. हा क्षण, हा सोहळा पाहण्यासाठी आपण जिवंत राहिलो, हे काय कमी आहे! काही वर्षांपूर्वीच कोरोनाचं संकट आलं आणि यात आपण आपले जिवलग, नातलग, मित्रवर्य गमावले. मात्र आपण बचावलो तो हा सुंदर सोहळा पाहण्यासाठी... इतिहास साक्षी आहे की, इस्लामी जिहादी आक्रमकांनी श्रीराम जन्मभूमीवरील मूळ मंदिर उद्ध्वस्त केले. औरंगजेबासारख्या अतिरेक्यांनी त्या जागी बाबरी नावाची रचना उभी केली. पण मंदिर तोडले तरी श्रद्धा तोडता येत नाही, हे त्या अतिरेक्यांना कळलंच नव्हतं. भारताची समाजरचनाच अद्भुत आहे. ज्या विस्तारवादी पंथांनी अर्ध्याहून अधिक जग आपल्या पंथाचं केलं, त्या पंथांना भारत पूर्णपणे बाटवता आला नाही. त्या पंथांना भारताच्या संस्कृतीचा नायनाट करता आला नाही. याचं कारण आपल्या मनात वसलेला राम आहे.

श्रीराम हे केवळ दैवत नाही. तर ती भारतीयांच्या जीवनाची शैली आहे. हा भारतीयांचा आत्मा आहे. हा श्वास आहे. हनुमंत ज्याप्रमाणे आपली छाती फाडून त्यात रामाचं अस्तित्व असल्याचं दाखवतो. ही कथा रुपक आहे. हनुमंत हा हिंदूंचं प्रतीक आहे. हनुमंताप्रमाणे प्रत्येक हिंदूच्या हृदयात राम आहे. म्हणून प्रत्येक हिंदू म्हणजे रामाचं जणू एक मंदिर आहे. या हाडामांसाच्या देहात प्रभू श्रीराम राहतात. ही आपली भावना आहे. म्हणूनच आपला समाज, आपली संस्कृती नष्ट होऊ शकली नाही. पाचशे वर्षे हिंदूंनी जन्मभूमीची जागा सोडली नाही. कोर्टात लढले, रस्त्यावर उतरले, बलिदान दिले. रामजन्मभूमी मुक्तीसाठी कारसेवकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. १९९० मध्ये मुलायमसिंग सरकारने कारसेवकांवर गोळ्या झाडल्या, तरी हिंदू मागे हटला नाही. हजारो हिंदूंनी आपल्या शरीराची समिधा करून या यज्ञात आपले सर्वस्व अर्पण केले. ते बलिदान व्यर्थ गेले नाही. आणि मग आला तो क्षण - नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सरकारने सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर राम मंदिराच्या निर्मितीला गती दिली. अवघ्या काही वर्षांत भव्य दिव्य मंदिर उभं राहिलं. २२ जानेवारी २०२४ ला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वत: प्राणप्रतिष्ठा केली आणि मंदिराच्या गाभाऱ्यात रामललांची मूर्ती विराजमान झाली. आता राम मंदिराच्या कळसावर धर्मध्वज फडकला. मोदींनी थरथरत्या हातांनी ध्वजाला प्रणाम केला. डाव्यांनी, जिहादी वृत्तींनी मोदींची थट्टा केली. पण ते हात वयामुळे थरथरत नव्हते. आपला जन्म राम-कर्मासाठी कामी आला, ही कृतज्ञता त्या थरथरत्या हातात होती... शबरीने असंख्य वर्षांच्या प्रतीक्षेनंतर ज्यावेळी पहिल्यांदा रामाचं दर्शन केलं असेल, तेव्हा तिचेही हात थरथरले असतील. तिच्याही शरीरात कंपन उठलं असेल. तिच्या नयनांतून गंगा यमुना वाहिल्या असतील. या भावना शहरी नक्षलींना नाही कळणार, या भावना जिहादी प्रवृत्तीच्या लोकांना नाही कळणार, या भावना दळभद्री मनाच्या लोकांना नाही कळणार. या भावना समजून घ्यायच्या असतील तर तुम्हाला हिंदू व्हावं लागेल, राममय व्हावं लागेल. कदाचित तुम्ही जन्माने हिंदू नसाल पण भावनेने हिंदू व्हावं लागेल. हा भाव आपल्याला ज्ञानेश्वर माउलींच्या मूर्तीत दिसतो, हा भाव आपल्याला तुकोबांच्या तसबिरीत दिसतो, हा भाव आपल्याला समर्थ रामदासांच्या प्रत्येक ओळींमध्ये दिसतो, हा भाव आपल्याला कबीराच्या भक्तीत दिसतो. हा भाव या दानवांना कसा कळेल?

आपला धर्मध्वज फडकला आणि संपूर्ण विश्वाला एकच संदेश दिला गेला - ज्यांनी ज्यांनी आमचा धर्म दडपण्याचा प्रयत्न केला, त्यांना आता हे कळलं पाहिजे की तुमची जिहादी मानसिकता, मिशनरी कटकारस्थाने, तुमची डावी आक्रमणे किंवा धर्मांतराचे षडयंत्र यापैकी कशानेही हिंदू धर्माला, हिंदू संस्कृतीला किंचितही इजा होणार नाही. उलट ज्याप्रमाणे प्रभू श्रीरामांनी रावणाचा अंत केला त्याप्रमाणे हिंदू तुमचे सगळे डाव उद्ध्वस्त करतील आणि अविरत ध्वज फडकवत ठेवतील.

या आनंदाच्या क्षणीही काही लोकांच्या पोटात दुखायला लागलं आहे. काँग्रेस, डावे, तथाकथित पुरोगामी आणि शहरी नक्षली बुद्धिजीवी धर्मध्वजाची थट्टा करतायत. म्हणतायत, ''हा मध्ययुगाकडे परतण्याचा प्रयत्न आहे'', ''हा विज्ञानविरोधी डाव आहे'', ''हा असहिष्णुतेचा विजय आहे.'' पण या साऱ्यांचा दुटप्पीपणा फार भयंकर आहे. हे लोकच तर सतत गांधींचं नाव घेऊन म्हणतात, ''गांधीजी रामाचे भक्त होते, ते रोज रामाचे भजन गायचे, शेवटच्या क्षणी देखील त्यांनी 'हे राम' म्हटलं''. पण ज्या रामाचे गांधीजी भजन गायचे, त्या रामाचंच मंदिर आणि त्या रामाचाच धर्मध्वज या लोकांना नकोय! म्हणजे एकीकडे गांधींच्या नावाचा वापर करायचा आणि दुसरीकडे रामाला नावे ठेवायची? हा दुटप्पीपणा आता हिंदू जनतेने ओळखला पाहिजे. आता तुम्ही म्हणाल या शुभ प्रसंगी या दानवांचा उल्लेख का करता? अहो, आपला सणही रावण दहन केल्यानंतरच साजरा होतो की नाही? आता धर्मध्वज फडकला आहे, याचा अर्थ असा की भारताला पुन्हा ते जुने वैभव प्राप्त होण्याचा क्षण जवळ आला आहे. प्रभू श्रीरामांच्या कृपेने भारत पुन्हा एकदा महासत्ता होईल. नारायण आले की त्यामागून लक्ष्मी येणारच! आता खऱ्या अर्थाने रामराज्याची नांदी सुरू झाली आहे. पुढची २०-२५ वर्षे म्हणजे २०४७ पर्यंत आपण विकसित भारत घडवणार आहोत, हा ध्यास सर्वांनीच मनात ठेवला पाहिजे. आपल्यातील जातिवाद, प्रांतवाद, भाषावाद मिटवून भारताला बलशाली करण्याचा ध्यास घेतला पाहिजे. जातिवाद, प्रांतवाद, भाषावादाच्या दलदलीत ढकलणाऱ्या पुढाऱ्यांवर मतपेटीतून हल्लाबोल करून हद्दपार केलं पाहिजे. कारण भारत आर्थिकदृष्ट्या, लष्करीदृष्ट्या, तंत्रज्ञानात, विज्ञानात अतुलनीय शक्तिशाली करायचा असेल तर आपल्यातील भेद हीच खूप मोठी अडचण आहे. म्हणून हा भेद नकोय... या आधुनिक भारताची मुळे ही हिंदूभूमीच्या हजारो वर्षांच्या संस्कृतीत, सनातन धर्मात घट्ट रुजलेली आहेत. रामराज्य म्हणजे केवळ रामाचं भजन गाणं नव्हे; तर रामराज्य म्हणजे न्याय, समरसता, सुशासन, आत्मनिर्भरता, वैज्ञानिकता आणि संपूर्ण मानवजातीसाठी आदर्श असलेलं राज्य होय! ते राज्य आता दूर नाही. हा फडकणारा धर्मध्वज म्हणजे एक संकल्प आहे. हिंदू सभ्यतेला पुन्हा जागृत करण्याचा संकल्प. पाचशे वर्षांपूर्वी मंदिर पाडलं होतं, पण आज मंदिर उभं राहिलं आणि त्यावर धर्मध्वज फडकला. यापुढे कोणत्याही आक्रमकाला, कोणत्याही धर्मांधाला, कोणत्याही दुटप्पी राजकारण्याला हे विसरता येणार नाही की ही भूमी रामाची आहे, ही भूमी कृष्णाची आहे, ही भूमी शिवाची आहे. ही हिंदूंची भूमी आहे आणि या भूमीवर आता पुन्हा रामराज्य येत आहे.

जय श्रीराम!

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**विजय कुळकर्णी**

# कुटुंबव्यवस्था टिकणे आवश्यक

आज एका वृत्तपत्रातील बातमी वाचण्यात आली. त्यातील घटना भारतातील नसली तरी, भारतात तशी घटना घडू नये, असे वाटते. या बातमीत म्हटल्याप्रमाणे लंडनमधील एका जोडप्याच्या लग्नाचा १० वा वाढदिवस डिसेंबरमध्ये आहे. हे जोडपे एकाच छताखाली राहत असले तरी त्यांचे एकमेकांशी संबंध काही आवश्यक गरजेपुरतेच आहेत. त्यांच्या नात्यात एकमेकांबद्दल स्वारस्य उरलेले नाही. कामाच्या ठिकाणावर क्वाईट क्विटिंग, म्हणजे कोणतेही कारण न सांगता कामातून अनासक्ती, असाच व्यवहार पाश्चिमात्य देशांमधील अनेक जोडपी आता नात्यांमध्ये दाखवत आहेत. याला शांततेत घेतलेला काडीमोड, असे म्हटले जाते.

यात जोडपी एकमेकांपासून भावनिकदृष्ट्या वेगळी होतात. ते एकमेकांशी कोणताही संवाद ठेवत नाहीत किंवा एकमेकांपासून कोणतीही अपेक्षा बाळगत नाहीत. न्यायालयात जाऊन घटस्फोट न घेता एकत्र राहणे, अशी जोडपी अनेक वर्षे एकत्र राहू शकतात. केवळ मुलांमुळे घटस्फोट घेऊ शकत नाहीत. दोघांपैकी एकाची आर्थिक स्थिती कमकुवत असणे किंवा दुसऱ्यावर अवलंबून असणे, अशा परिस्थितीमुळे न्यायालयात जाऊन घटस्फोट घेणे टाळून क्वाईट डिव्होर्स स्वीकारला जात आहे. यावरून मला हिंदी हास्य कवी सुरेंद्र शर्मा यांनी एका कार्यक्रमात सांगितलेला विनोद आठवतो. त्यांनी म्हटले होते की, माझ्या लग्नाचा ५० वा वाढदिवस आम्ही साजरा केला. अमेरिकेत असतो तर, ५० व्या लग्नाचा वाढदिवस साजरा केला असता. कारण, अमेरिकेत नवरा-बायको रस्त्यावर, बागेत, रेल्वेत, कारमध्ये कुठेही आणि वेळ मिळेल तेव्हा, प्रेम करतात. त्यामुळे त्यांचा प्रेमाचा कोटा लवकर पूर्ण होतो. त्यामुळे ते पटापट जोडीदार बदलतात. तर, भारतीय नवरा-बायकोला प्रेम करायला वेळच मिळत नाही. त्यामुळे त्यांचा प्रेमाचा कोटा पूर्णच होत नाही. त्यामुळे ते अनेक वर्षे सोबत राहतात. नवरा-बायकोचे भांडण झाले तर, बायको म्हणते की, मी तुम्हाला कधीचीच सोडून गेली असती पण, मुलांमुळे तसे करणे मला शक्य झाले नाही. याचा अर्थ भारतीय नवरा-बायको रेल्वे रुळाप्रमाणे असतात. सोबत चालतात पण, एकमेकांना भेटत नाहीत. तर, मुले त्यांच्यामधील स्लिपरचे काम करतात. नवरा-बायकोचे पटो अथवा न पटो पण, सोबत चालावेच लागते. भारतीय लोक पाश्चिमात्य संस्कृतीचे जाणते अजाणतेपणी अनुकरण करतात. त्यामुळे आपल्या देशात हा ट्रेंड येऊ नये, असे वाटते.

भारतात एकत्र कुटुंबपद्धती आहे. त्याचे प्रमाण हल्ली कमी होत असले तरीही आजही अनेक कुटुंबे एकत्र राहतात. एकत्र कुटुंबपद्धतीमध्ये परिवारात कोणीतरी एक वडील किंवा ज्येष्ठ व्यक्ती असते. तिच्या आदेशाचे सर्व सदस्य पालन करतात. कुटुंबात काही वाद झाल्यास ती ज्येष्ठ व्यक्ती वाद झालेल्या दोघांचीही समजूत काढून प्रसंगी कठोर भूमिका घेऊन त्यांच्यातील वाद मिटविला जातो. या उलट पाश्चिमात्य देशांमध्ये मुले ठरावीक वयानंतर घराबाहेर पडतात. स्वत: काही नोकरी, कामधंदा करून पैसे कमवितात, शिकतात, मित्र, मैत्रिणीसोबत रिलेशनशिपमध्ये राहतात. तसेच, कोणी कोणाला भेटायला एकमेकांच्या घरी अथवा बाहेर भेटायचे असल्यास अगोदर अपॉईंटमेंट घ्यावी लागते. अशी स्थिती भारतात नाही. भारतीय मुले-मुली शिक्षण होईपर्यंत आई-वडिलांसोबतच राहतात. बहुतांश मुलांचे लग्न झाल्यावरही ते आई-वडिलांसोबतच वास्तव्य करतात. मात्र, अलिकडच्या काळात मुले-मुली शिक्षण, नोकरीनिमित्ताने पुणे, मुंबई, बंगलोर इत्यादी मोठ्या शहरांमध्ये जात आहेत. तर, काही परदेशातही जात आहेत. तिकडे गेलेल्या मुलांकडून किंवा नोकरीच्या ठिकाणी विदेशात राहून आलेल्या मुला-मुलींच्या संपर्कात आलेल्या मुलांकडून पाश्चिमात्य देशातील संस्कृतीचे अनुकरण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. भारतीय संस्कृती टिकून राहण्याचे मूळ कारण, भारतीय कुटुंब व्यवस्था हे आहे. कुटुंबात मुला-मुलींवर जे संस्कार होतात किंवा केले जातात, ते जीवनभर त्यांच्यासोबत असतात. तेव्हा, कुटुंबव्यवस्था टिकावी, कुटुंबात सर्व सदस्यांमध्ये संवाद असावा, एकमेकांना सहकार्य करण्याची भावना कायम असावी. तेव्हा, भारतीय संस्कृती टिकण्यासाठी एकत्र कुटुंबव्यवस्था टिकणे अतिशय आवश्यक आहे.

८८०६००६१४९

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# नुसत्या बातम्यांवर गुजराण!

यांची उडी सकाळी पत्रकार परिषद घेणं, भोंगा वाजवणं, ट्विट करणं, फेसबुक लाईव्ह करण्याच्या पलीकडे जातच नाही. रस्त्यावर उतरून आंदोलनं करणं, मोर्चे काढणं हे तर फार लांब राहिलं. साधं निवडणूक प्रक्रियेतसुद्धा भाग घेत नाही आहेत. हे प्रचारालासुद्धा जात नाहीत इतके हे अहंकारी झाले आहेत. लोकांच्या दारात जाऊन मतं मागणं आता यांना कमीपणा वाटू लागलं आहे. सध्या यांचं अस्तित्व केवळ माध्यमांमध्ये आहे. यांचं बोलणं, बरळणं जनता मनावर घेत नाहीत, मात्र, माध्यमं यांना डोक्यावर घेतात. आणि केवळ आपली बातमी आली की बस झालं, यावर समाधान मानून... एवढ्या एका गोष्टीवर हे गुजराण करत आहेत.

मुळात जनतेने विरोधी पक्षात बसवले आहे. त्यामुळे जनतेचे प्रश्न पोटतिडकीने आणि ताकदीने उजागर करून सरकारला जाब विचारण्याचं काम सक्षम विरोधी पक्ष म्हणून विरोधी पक्षांनी केलं पाहिजे. जनहिताच्या व्यापक मुद्यावर बोलण्याऐवजी निरर्थक प्रश्नाला हवा देऊन, काहीही एक फायदा होणार नाही. हे अजूनही विरोधकांना कळले नसेल तर, यांचे भविष्य अंधारातच आहे.

केंद्रीय राज्यमंत्री जितेंद्र सिंह यांच्या आयआयटी बॉम्बेसंदर्भात केलेल्या वक्तव्याचा विपर्यास करत विरोधकांनी आपली राजकीय पोळी भाजण्याचा प्रयत्न चालवला आहे. अर्थात मुंबई महाराष्ट्रापासून तोडण्याचा डाव, बॉम्बे-मुंबई, मराठी माणूस असे सगळे मुद्दे हे ऐन निवडणुकीच्या तोंडावर यांना सुचतात, हा वेगळा भाग आहे. एक मात्र, येथे खरं आहे... मुंबईसाठी आणि मुंबईकरांसाठी शिवाय मराठी माणसासाठी या लोकांनी काहीही केलेलं नाही. प्रेतांच्या टाळूवरचं लोणी खाणारी ही जमात आहे. 'बॉम्बे'चे 'बम्बई' आणि मग 'मुंबई' करण्यामागे या पत्रकार परिषदवीरांचे काहीही एक योगदान नाही. 'बॉम्बे'चे 'बम्बई' आणि 'मुंबई' करण्यासाठी भाजपाचे ज्येष्ठ नेते राम नाईक यांनी हा संपूर्ण लढा दिला. संपूर्ण इतिहास माहीत नसलेल्या विरोधकांनी टीकेची झोड उठवून 'मुंबई'चे श्रेय लाटण्याचा आता ३० वर्षांनी प्रयत्न चालवला आहे. राम नाईक यांच्या सहा वर्षांच्या अविरत प्रयत्नांनंतर केंद्र सरकारने 'बॉम्बे' 'बम्बई'ऐवजी सर्व भाषांत 'मुंबई' हेच नाव वापरण्याचा अध्यादेश १५ डिसेंबर १९९५ रोजी जारी केला होता.

राम नाईक १९८९ मध्ये पहिल्यांदा लोकसभा सदस्य झाले त्यावेळी, हिंदी मसुद्यात त्यांचं नाव राम नायक (उत्तर बम्बई) असे लिहिले होते. ते बघून नाईक यांनी लोकसभा सभापतींना तत्काळ पत्र लिहिले व असे असता कामा नये, सर्वच भाषांत माझे नाव राम नाईक (उत्तर मुंबई) असेच लिहिले पाहिजे असे सुचविले. तत्कालीन लोकसभा सभापती रविराय यांच्याशी चर्चा झाली. विशेष नाव सर्व भाषांमध्ये सारखेच असले पाहिजे, त्यांचे भाषांतर होऊ शकत नाही, हे नाईक यांचे म्हणणे तत्त्वतः बरोबर आहे व निदान लोकसभेच्या कामकाजात तरी यापुढे सर्व भाषांमध्ये 'नाईक' आणि 'मुंबई' असेच लिहिले जाईल असा निर्णय लोकसभा सभापतींनी घेतला. इथून मग बॉम्बे, बम्बईचे मुंबई व्हावे यासाठीच्या प्रयत्नांची खरी सुरुवात झाली. नाईकांनी सर्व संबंधितांना पत्रे लिहिली, लोकसभेत प्रश्न उपस्थित केला. अखेर गाडी अडली ती तांत्रिक मुद्यावर. गावाचे किंवा शहराचे नाव बदलायचे तर त्याचा अधिकार महसुली नियमाप्रमाणे राज्य सरकारचा असतो. यासाठी राज्य सरकारकडून प्रस्ताव मंजूर होऊन मान्यतेसाठी केंद्र सरकारकडे यावा लागतो. महाराष्ट्रात शिवसेना-भाजपा युतीचे राज्य आल्यावर मुख्यमंत्री मनोहर जोशी यांना ही माहिती दिली. त्यांच्या मंत्रिमंडळाने एकमताने हा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविलाही पण पुन्हा गाडी अडली. तत्कालीन काँग्रेस सरकारने हा प्रस्ताव काहीही कारवाई न करता बासनात गुंडाळून ठेवला. मग पुन्हा केंद्र सरकारकडे सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर अखेर १५ डिसेंबर, १९९५ रोजी केंद्रानेही बॉम्बे, बम्बईऐवजी मुंबई हेच नाव वापरावे असा अध्यादेश जारी केला. अर्थात यातही एक छोटी चूक झाली. हिंदीत 'मुंबई' शब्द 'मुम्बई' असा लिहिला गेला. पुढे १९९९ मध्ये राम नाईक स्वतः केंद्रात राज्यमंत्री असताना जेव्हा त्यांच्याकडे गृहखात्याचाही अतिरिक्त भार दिला गेला, तेव्हा या संदर्भातील अंतिम सुधारित आदेश २८ मे, १९९९ रोजी काढून 'मुंबई' हेच नाव सर्व भाषांत केले. वर्षानुवर्षे पाठपुरावा केल्यानंतर महाराष्ट्राची अस्मिता राखण्याचा ऐतिहासिक निर्णय करण्याचे भाग्य सर्व श्रेय हे राम नाईकांना जाते. एवढंच नव्हे तर, नंतरच्याकाळात नाईक उत्तर प्रदेशचे राज्यपाल झाले तेव्हा, नाईक यांच्या आदेशानेच 'अलाहाबाद'चे 'प्रयागराज' व 'फैजाबाद'चे 'अयोध्या' असे नामांतरण झाले. आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी आयआयटी बॉम्बेचं नाव बदलण्यासाठी राज्य सरकार केंद्र सरकारकडे विनंती करणार असल्याचे सांगितले आहे. त्यामुळे जे लोक नावांच्या, प्रतीकांच्या, इतिहासांच्या खुणा जपण्यासाठी धडपडतात, पुसलेल्या खुणा परत आणण्यासाठी सर्व शक्ती पणाला लावतात, त्यांना यांच्यासारख्या ''आयत्या बिळात नागोबा''वाल्यांनी शहाणपणा शिकविण्याची गरज नाही.

जनतेचे प्रश्न सोडून साऱ्या गोष्टींचं भांडवल हे लोक करत असतात. त्यामुळे जनतेचे वारंवार फटके मिळत आहेत. आता येत्या निवडणुकीत जनता जर फटके मारून हाकलतील तर, अरे हे असं कसं झालं म्हणून विचार करत बसतील. पण तुम्ही जनतेत गेलाच नाही तर जनता तुम्हाला आपलंसं कसं करतील? अन्यवेळी तर सोडा नेमक्या बिहार निवडणुकीदरम्यान जनतेला, कार्यकर्त्यांना सोडून सगळे महत्त्वाचे, तिकीट वाटपाचे निर्णय घेण्याच्यावेळी राहुल गांधी कोलंबियाला गेले होते. बिहार निवडणुकीच्या निकालावेळी ते अबूधाबीला होते. असं केल्यानं कसं चालेल. तुमची जनतेशी नाळ तुटली आहे. पराभव जरी झाला असेल तरी, जनेतेला धन्यवाद दिले पाहिजेत. कार्यकर्त्यांना धीर दिला पाहिजे, त्यासाठी त्यांना भेटलं पाहिजे, भेटण्यासाठी उपलब्ध असले पाहिजे एवढं साधं जर कळत नसेल तर, केवळ एसीमध्ये बसून, फेसबुक लाईव्ह, पत्रकार परिषदा घेऊन जनता तुम्हाला मत देईल अशी अपेक्षा करत असाल तर, या गोड गैरसमजातून बाहेर निघून जमिनीवर काम करण्याची गरज आहे. आत्मपरीक्षणाची गरज आहे. किती दिवस, भाषावाद, प्रांतवादावर, नुसत्या बातम्यांवर गुजराण करणार? त्यातून काहीही उपलब्धी होणार नाही. निव्वळ तोंडाच्या वाफा दवडून कोणताही लाभ होणार नाही.

९२७०३३३८८६

## आजचे संघगीत-८७

शनिवार, २९ नोव्हेंबर २०२५

### चरण चालु दे सदा ध्येयमंदिराकडे

चरण चालु दे सदा ध्येयमंदिराकडे
अंतरात आमुच्या स्मृती तुझीच जागु दे ॥धृ.॥

गती मती द्युती तुझी आमुच्यात येउ दे
सुखात आणि संकटी तुझा मनास ध्यास दे
गतीस खंड त्या नको अम्ही असू सदा खडे ॥१॥

पाहुनी सभोवती दु:ख दैन्य आपदा
जाणुनी स्वयेच तू त्यागिलीस संपदा
दंभ मोह लाजले पाहता तुझ्याकडे ॥२॥

चरण धुंद चालु दे वेग त्यास येउ दे
ध्येयमंदिरावरी दृष्टि अढळ राहु दे
कवच घालुनी स्मृती सिद्ध संगरा खडे ॥३॥

धूलिच्या कणांतुनी घोष हा उठे महा
स्पर्श होउनी तुझा देह धन्य हो अहा
वाट पाहता युगे अशी विभूति सापडे ॥४॥

## वाचक पत्रे

### दत्त जयंतीचे महत्त्व

मार्गशीर्ष महिन्यातला महत्त्वाचा सण म्हणजे दत्त जयंती. मार्गशीर्ष पौर्णिमेच्या दिवशी मृग नक्षत्रावर संध्याकाळी दत्तांचा जन्म झाला, म्हणून या दिवशी सर्वत्र भगवान दत्तात्रेयांचा जन्मोत्सव साजरा केला जातो. दत्त जयंती या दिवशी दत्ततत्त्व हे पृथ्वीतलावर नेहमीच्या तुलनेत १००० पटीने कार्यरत असते. या दिवशी दत्ताची मनोभावे पूजा आणि नामजप केल्यास दत्त-तत्त्वाचा अधिकाधिक लाभ मिळण्यास मदत होते. बहुतांशी ठिकाणी त्रिमूर्ती म्हणजे त्रिमुखे असलेल्या स्वरूपात दत्ताची पूजा केली जाते. तर काही ठिकाणी एकमुखी दत्ताच्या मूर्तीचे पूजन केले जाते. दत्ताला 'अवधूत' असे देखील म्हटलं जातं. दत्ताचे चोवीस गुरू मानले जातात. आपल्या पुराणांमध्ये धार्मिक ग्रंथांमध्ये, त्यांचे वर्णन ब्रह्मा, विष्णू आणि शिव यांचा संगम किंवा या तिघांचा संयुक्त अवतार म्हणून केले आहे. महाराष्ट्र आणि कर्नाटक या राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर दत्तभक्ती पाहायला मिळते. यातही महाराष्ट्रात तर दत्त भगवानांचा सर्वांत मोठा प्रभाव पाहायला मिळतो. आपल्याकडे प्रत्येक गावात, शहरात दत्ताची लहान, मोठी अनेक मंदिरे आहेत. दत्तांचा जन्म मार्गशीर्ष महिन्यातील पौर्णिमेला झाला होता. या दिवशी दत्त जयंती साजरी केली जाते. मार्गशीर्ष महिन्याच्या पौर्णिमेला दत्त पूजा आणि दत्त दर्शन केल्याने भक्तांच्या सर्व मनोकामना पूर्ण होतात, अशी मान्यता आहे. हिंदू पौराणिक मान्यतेनुसार, देव दत्तात्रेयांमध्ये त्रिदेवाची शक्ती अस्तित्वात आहे, म्हणून त्यांची पूजा केल्याने लवकर लाभ होतो. भगवान दत्ताचे मंत्र अत्यंत प्रभावी आणि लवकर फळ देणारे मानले जातात. त्याच्या मंत्रांचा आदरपूर्वक जप केल्याने आणि प्रार्थना केल्याने व्यक्ती जीवनातील प्रत्येक समस्यापासून मुक्त होऊ शकते. भगवान दत्तात्रेयांची विशेष पूजा महाराष्ट्रात तसेच संपूर्ण भारतामध्ये केली जाते. विशेषतः महाराष्ट्रात दत्तात्रेय जयंती मोठ्या थाटामाटात साजरी केली जाते. दत्तात्रेयांच्या मंत्रांबद्दल बोलायचे तर तर त्यांच्या मंत्रांच्या वापराने शत्रूंच्या नाशाबरोबरच जीवनातील इतर अडथळेही दूर होतात.

**शंकर कुळकर्णी**/९७६४४६५५७०

### अन्नाचा आदर करा!

अन्नाला आपल्या शास्त्रांत 'पूर्ण ब्रह्म' म्हटले आहे. कारण अन्नातूनच शरीराला ऊर्जा (प्राण) मिळते. सात्त्विक अन्न केवळ पोट भरत नाही, तर मनालाही शांत आणि पवित्र बनवते. घरी भक्तिभावाने, भगवंताचे नामस्मरण करत बनवलेले अन्न हे खऱ्या अर्थाने सात्त्विक असते. मात्र, आजच्या धकाधकीच्या जीवनात वेळेअभावी आणि हौसेखातर उपाहारगृहात जेवण्याची प्रवृत्ती वाढत आहे. ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी अनेक मालक विविध योजना आणतात. त्यातीलच एक म्हणजे 'अनलिमिटेड थाळी' ही संकल्पना! २०-२५ पदार्थांनी सजलेली ही थाळी पाहण्यास आकर्षक असली, तरी एका व्यक्तीसाठी ती मुळीच आवश्यक नसते.

इतक्या पदार्थात सहजपणे पाच-सहा लोकांचे जेवण होऊ शकते. तरीही प्रत्येक व्यक्तीसाठी स्वतंत्र थाळी घेण्याची अट असते. उरलेले पदार्थ घरी नेता येत नाही. त्यामुळे उष्टे पदार्थ टाकून दिले जातात. हे दृश्य अत्यंत वेदनादायक आहे. कारण आपल्या देशात आजही हजारो लोक अर्धपोटी किंवा उपाशीपोटी झोपतात. अतिखाणे हे आरोग्यास हानिकारक आहेच, पण अशी नासाडी ही सामाजिकदृष्ट्याही अक्षम्य आहे. म्हणूनच 'किती खावे, काय खावे आणि कसे खावे' हे जरी व्यक्तिगत प्रश्न असले तरी उपाहारगृह चालवणाऱ्यांनी आणि ग्राहकांनी दोघांनीही याबाबत विवेकाने वागणे गरजेचे आहे. अन्नाची नासाडी म्हणजे, अन्नदात्याचा, शेतकऱ्याचा आणि निसर्गाचा अपमान आहे. अन्नाला ब्रह्म मानून, जितके आवश्यक आहे तितकेच घेणे आणि आदराने ग्रहण करणे हीच खरी संस्कृती आहे.

**रेणुका हरदास**/नागपूर

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९३७३४३८३५२ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

# उसाच्या बिलासाठी शेतकऱ्यांचा रस्तारोको

## सोलापूर-विजयपूर महामार्गावर मांडला ठिय्या; उसाला पहिली उचल ३,४०० देण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ नोव्हेंबर-**

ऊस गाळप हंगाम सुरू होऊन एक महिना होत आला.ऊस कायदा १९६६ नुसार ऊस गाळप झाल्यापासून १४ दिवसाच्या आत ऊसबिले जमा करणे बंधनकारक असताना, एक महिना झाला तरीही साखर कारखान्यांनी ऊस बिले जमा केलेली नाहीत. याच पार्श्वभूमीवर स्वाभिमानी शेतकरी संघटनेने शुक्रवार (दि. २८) नोव्हेंबर रोजी सकाळी अकरा वाजण्याच्या सुमारास सोलापूर विजापूर महामार्गावर व्हनमुर्गी फाटा (तेरामेंल) येथे रस्तारोको आंदोलन शासनाचे व प्रशासनाचे लक्ष वेधले.

यावेळी विविध घोषणा देत शेतकरी संघटनेने येत्या दोन दिवसात सकारात्मक निर्णय न घेतल्यास कर्नाटकमधील शेतकऱ्यांनी ज्याप्रमाणे उग्र आंदोलन केले. त्याप्रमाणे उग्र आंदोलन करू, वेळ पडल्यास कायदा हातात घेऊ असा निर्वाणीचा इशारा संघटनेचे जिल्हाध्यक्ष विजय रणदिवे यांनी यावेळी दिला.

दरम्यान, सोलापूर विजयपूर महामार्गावर शेतकऱ्यांनी रास्ता रोको आंदोलन केल्याने काही काळ सोलापूर विजापूर राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती. महामार्गावर वाहनाच्या लांबच लांब रांगा पहावयास मिळाल्या. प्रशासनाने तात्काळ आंदोलनकरते शेतकऱ्यांना महामार्ग वाहतुकीसाठी खुला करण्याची सूचना केल्यानंतर महामार्ग वाहतुकीसाठी सुरळीत करण्यात आला.

यावेळी आंदोलनात इकबाल मुजावर, मोहसीन पटेल,पप्पू पाटील, चाँदसो यादगिरे, बसवराज रामपुरे, कमलेश बाम गोंडे, तुकाराम शेटसंदी, जावेद आवटी, सिकंदर मकानदार, वसंत पाटील, यासिन मकानदार, नरेंद्र पाटील, अब्दुलराजाक मकानदार, विजय साठे, भागवत बिराजदार, सचिन मस्के आदींसह स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे पदाधिकारी कार्यकर्ते आणि शेतकरी उपस्थित होते.





### शेतकऱ्यांना कायदा हातात घेण्यास भाग पाडू नये

सोलापूर सोडून ईतर जिल्ह्यांमध्ये ऊसाला पहिली उचल म्हणून ३२०० ते ३६०० रुपये पर्यंत ऊस दर जाहीर केलेले आहेत. त्याचप्रमाणे सोलापूर जिल्ह्यामध्ये सुद्धा यावर्षी गाळप होणाऱ्या ऊसाला पहिली उचल ३४०० रुपये मिळावेत. या मागणीसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने शुक्रवार (दि. २८) नोव्हेंबर रोजी सकाळच्या सुमारास सोलापूर विजापूर महामार्गावर व्हनमुर्गी फाटा (तेरामेंल) येथे रस्तारोको आंदोलन केले आहे. सर्वसागर कारखाने सत्ताधारी तसेच विरोधक लोकप्रतिनिधी यांचीच आहेत. त्यामुळे लोकप्रतिनिधी शेतकऱ्यांना ऊसाला दर देत नाहीत. शासन आणि प्रशासनाने यावर तात्काळ सकारात्मक भूमिका घ्यावी. अन्यथा शेतकऱ्यांना कायदा हातात घेण्यास भाग पाडू नये, ज्याप्रमाणे कर्नाटक राज्यामध्ये शेतकऱ्यांनी आंदोलन केले. त्याच पद्धतीने उग्र आंदोलन राज्यभर पेटवले जाईल, असा ईशाराही श्री. रणदिवे यांनी दिला आहे.

## महत्वाचे...



सोलापूर : सोलापूर जिल्हा परिषदेचे सीईओ कुलदीप जंगम यांच्याशी भ्रमणध्वनीद्वारे खा. प्रणिती शिंदे यांनी संपर्क साधून उपोषणकर्ते रघुनाथ खजूरकर यांच्या मागण्याबाबत उपाययोजना करावी अशा सूचना दिल्या.



## खा. शिंदेंनी जाणून घेतल्या तिऱ्हे, शिंगोली, तरटगावला जोडणाऱ्या पुलाविषयीच्या समस्या

**सोलापूर, दि.२९ नोव्हेंबर-**

तिऱ्हे, शिंगोली, तरटगाव या गावांना जोडणारा जुना पूल सीना नदीला पूर आल्यानंतर नादुरुस्त पडझड झाला. पुलाची साईड रोलिंग व संरक्षक पाईप तोडफोड झाले तर काही पाण्यात वाहून गेले. पुलावर मोठमोठे खड्डे पडले. या पुलावरून वाहतूक धोक्याची झाले आहे. या सर्व समस्या खासदार प्रणिती शिंदे यांनी जाणून घेतल्या. गेल्या पंधरा दिवसांमध्ये या पुलावर तीन अपघात झाले. एक प्रवासी टमटम पुलावरुन पाण्यात पडले. यात सदर टमटम चालकाचा जीव कसाबसा वाचला. आणखीन एका अपघातात मोटरसायकलस्वार पायबंदी झाला. रस्ता नादुरुस्त असल्यामुळे एस.टी.बसही बंद झाली आहे. रस्ता दुरुस्तीबाबत सार्वजनिक बांधकाम खाते व राष्ट्रीय महामार्ग हे एकमेकांकडे बोट दाखवित आहेत, असे सांगण्यात आले. खासदार प्रणिती शिंदे यांनी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्याशी भ्रमणध्वनीद्वारे संपर्क साधत या भागातील नागरिकांच्या समस्या त्यांच्या कानी घातल्या. आणि सार्वजनिक बांधकाम विभाग व राष्ट्रीय महामार्ग यांची संयुक्त बैठक लावून तातडीने येथील रस्ता दुरुस्त करण्यात यावा, अशा सूचना दिल्या. याप्रसंगी उत्तर सोलापूर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष भारत जाधव, मोहोळ तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सुलेमान तांबोळी, राजेश पवार, सोमनाथ दावणे, कुंदन दावणे, राजू मोटे, रावसाहेब गायकवाड, महेश गायकवाड, बबलू रासेराव, राहुल भोई, चंद्रभान गायकवाड आदी उपस्थित होते.

## तक्रारींचा वेळेत निपटारा न करणाऱ्या मनपाच्या १० अधिकारी-कर्मचाऱ्यांना दंड

**सोलापूर, दि.२९ नोव्हेंबर-**

महापालिकेच्या पोर्टल/माय सोलापूर ॲपवरील नागरी तक्रारींचे वेळेत निपटारा न करणाऱ्या महापालिकेच्या १० अधिकारी-कर्मचाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. या सर्वांना मिळून एकूण तीन हजार १०० रुपयांचा दंड करण्यात आला आहे. महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांनी कारवाईचे आदेश काढले आहेत. शहरातील नागरीकांच्या समस्या तातडीने सोडविण्याच्या दृष्टीकोनातून ऑनलाईन तक्रार करण्याची सोय महापालिकेने पोर्टल/माय सोलापूर ॲपवर उपलब्ध केली आहे. या तकारीचे निराकरण संबंधित विभागाच्या अधिकारी/कर्मचारी यांच्या कडून मुदतीत पूर्ण करून, केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती संबंधित पोर्टल व ॲपवर अद्ययावत करण्याचे निर्देश सर्व अधिकारी कर्मचारी यांना वेळोवेळी देण्यात आले आहेत. या अनुषंगाने तक्रारीचा निपटारा मुदतीत न करणाऱ्या १० अधिकारी / कर्मचाऱ्यांना एकूण तीन हजार १०० रुपयांचा दंड करण्यात आला आहे.

**या अधिकारी व कर्मचाऱ्यांना झाला दंड**

अजिंक्य साळुंखे (विभागीय कार्यालय क्र.१), निलकंठ मठपती (नगररचना विभाग), दीपाली मेटकरी (नगररचना विभाग), मन्मत चांदोडे (मालमत्ता कर विभाग), धीरज वाघमोडे (घनकचरा व्यवस्थापन विभाग), अमोल कांबळे(घनकचरा व्यवस्थापन विभाग),निशात आख्तर कानकुर्ती (घनकचरा व्यवस्थापन विभाग),अनिकेत कांबळे (विभागीय कार्यालय क्र.३), अक्षय फुंदे (विभागीय कार्यालय क्र.७), अनिकेत कावळे (विभागीय कार्यालय क्र.२) असे दंडात्मक कारवाई झालेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची नावे आहेत.

## टेंभुर्णीत माढा तालुका मुलींच्या खो-खो स्पर्धा

**टेंभुर्णी, दि. २८ नोव्हेंबर-**

स्व.लोकनेते कृष्णातदादा बोबडे यांच्या स्मरणार्थ १४ वर्षांखालील गटाची मुलींची खोखो स्पर्धा शनिवार ६ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता श्री माऊली शिक्षण संस्था संचलित सनराईज स्पोर्ट्स क्लबने सनराईज इंग्लिश मिडीयम स्कुल टेंभुर्णी येथे आयोजित केली आहे. प्रथम पारितोषिक ७ हजार ३३, द्वितीय ५ हजार ३३, तृतीय ३ हजार ३३ व चतुर्थ २ हजार ३३ व चषक असे स्वरूप आहे. खेळाडूची जन्म तारीख १ जानेवारी २०१२ नंतरची असावी. संघानी अमर काळे ९१४६८९१३५५ अथवा सागर खुळे ८६२६०५८३७७. यांच्याशी संपर्क साधावा, असे क्लबचे प्रमुख अमर काळे यांनी केले.

# महिलांवरील अत्याचार रोखण्यास सरकार अपयशी

## मोहोळच्या प्रचार सभेत खासदार प्रणिती शिंदे यांचा आरोप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर-**

महिलावरील अत्याचार दिवसेंदिवस वाढत असून महिला वर्गा बरोबर लहान मुलीही अत्याचाराला बळी पडत असून याकडे प्रशासन गांभीर्याने दखल घेत नसल्याचे खंत खासदार प्रणितीताई शिंदे यांनी मोहोळ येथे नगरपरिषदेच्या निवडणुकीच्या संदर्भात प्रचार कार्यक्रमाच्या वेळी बोलताना केले.

गवत्या मारुती चौकातील या सभेस नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार, तालुकाध्यक्ष सुलेमान तांबोळी, जिल्हा उपाध्यक्ष राजेश पवार राज्य सचिव शाहिनताई शेख, नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार अँड. सोनल जानराव, सदस्य पदाचे उमेदवार संतोष शिंदे, कामिनी चोरमले,रोहित गावस्कर, शरयु आनंद गावडे,महमद जुबेर मुजावर आदी उपस्थित होते. स्वागत व प्रास्ताविक तालुकाध्यक्ष सुलेमान तांबोळी यांनी केले. मोहोळ तालुका अध्यक्ष सुलेमान तांबोळी यांनी आभार मानले.



खासदार शिंदे म्हणाल्या, सरकार वेगवेगळ्या योजना आणतात पण ते पूर्णत्वास नेत नाहीत. काँग्रेसने असे कधीच नव्हते. काँग्रेसने योजना आणल्या पण त्या योजनेचा लाभ शेवटपर्यंत सर्वसामान्य जनते पर्यंत पोचविला. सध्या देशातल्या नोकऱ्या गायब झालेल्या आहेत. बेरोजगारी वाढलेली आहे. महागाई शिंगेला पोहोचलेली आहे. आरोग्याच्या समस्या तशाच आहेत. महिला वरील अत्याचार वाढलेले आहेत. भ्रष्टाचारात वाढ झालेली आहे. अशा सरकारला पण निवडून देणार आहात का ? असा प्रतिप्रश्न करून काँग्रेस पक्षाला त्याग आणि बलिदानाचा इतिहास आहे. हा पक्ष भारतीय स्वातंत्र्य पूर्वीचा १४० वर्षाचा पक्ष आहे. त्यामुळे काँग्रेस पक्षाच्या उमेदवाराला निवडून आणून पक्ष बळकट करा, असे आवाहन त्यांनी केले. जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार म्हणाले, क आज देशाची लोकसंख्या १४० कोटी आहे. तरीही अन्नाचा तुटवडा आपल्याला पडत नाही. कारण ७० वर्षांमध्ये काँग्रेसने सगळे नियोजन करून ठेवले होते. औद्योगिक क्षेत्र असो,कृषीक्षेत्र असो, आरोग्य असो, शैक्षणिक असो या सर्वच क्षेत्रामध्ये भारत देश काँग्रेस पक्षाने प्रगतीपथावर आणला आहे. हे सर्व काँग्रेस पक्षाने केलेले आहे. हे लक्षात असू द्या. म्हणून या देशाला काँग्रेस शिवाय पर्याय नाही. यासाठी काँग्रेस पक्षाच्या उमेदवाराला भरघोष मतानी निवडून द्या. आम्ही मोहोळचा विकास करु. असे त्यांनी सांगितले.



सोलापूर : शहरात रोज रात्री थंडी वाढत आहे. या थंडीमुळे धुकेही वाढत आहे. हैदराबाद-पुणे बायपास महामार्गावर रात्रीच्या वेळी धुक्याचे टिपलेले छायाचित्र.



सोलापूर : माजी केंद्रीय मंत्री सुशीलकुमार शिंदे हे सोलापुरात आल्यावर त्यांचे उद्योजक विकी बनसोडे यांनी स्वागत केले. यावेळी चेतन नारोटे, रियाज निगेवान, ओंकार थोरात.


## IDFC FIRST Bank Limited

IDFC FIRST Bank

(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792
Registered Office: - KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

**वित्तीय मालमत्तेचे सुरक्षा आणि पुनर्बांधणी आणि सुरक्षा व्याज अंमलबजावणी कायदा, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना**

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वी कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे) कडून खाली नमूद केलेली सुरक्षित कर्जे घेतली. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणखताने सुरक्षित करण्यात आली आहेत. त्यांनी संबंधित कर्ज करारांच्या अटी आणि शर्तींचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यामुळे आणि अनियमित झाल्यामुळे, आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांचे कर्ज एनपीए म्हणून वर्गीकृत करण्यात आले. आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) यांना त्यांच्याकडून देय असलेल्या रकमा खालील तक्त्यात अधिक स्पष्टपणे वर्णन केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केल्या आहेत आणि त्या रकमेवरील पुढील व्याज देखील लागू असेल आणि ते त्यांच्या संबंधित तारखांपासून लागू होणाऱ्या कराराच्या दरानुसार आकारले जातील.

| अ. क्र. | कर्ज खाते क्रमांक | कर्जाचे प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना तारीख | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 93933602 | मालमत्तेवर कर्ज | १. तुकाराम रामचंद्र फुले<br>२. शोभा तुकाराम फुले | 04/10/2025 | रुपये 84,818.75/- |
| **मालमत्तेचा पत्ताः** मालेवाडी (अ) सर्व्हे क्रमांक ३/३/बी, क्षेत्रफळ ३७.00.00 आर, (३७00.00 चौ. मीटर) येथील निवासी मालमत्तेचा तो सर्व तुकडा आणि पार्सल, मालेवाडी (अ), तालुकाः माळशिरस, जिल्हाः सोलापूर, महाराष्ट्र-४१३१0१ येथे स्थित, आणि अशी सीमा आहे:- पूर्वः नामदेव बाबू फुले पश्चिमः तात्या नाना फुले उत्तरः श्री. जालिंदर अप्पा फुले यांची मालमत्ता दक्षिणः रस्ता | | | | | |

या प्रकाशनाच्या तारखेपासून ६0 दिवसांच्या आत तुम्हाला वरील तक्त्यात दाखवलेल्या तपशीलांनुसार आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) कडे रक्कम त्यांच्या संबंधित तारखांपासून आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींपासून करारबद्ध व्याजदरासह भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. असे न केल्यास, वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत, आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) देय रक्कम वसूल करण्यासाठी कार्यवाही सुरू करण्यास अधीन असेल. शिवाय, तुम्हाला सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत सदर सुरक्षित मालमत्ता विक्री/भाडेपट्टा किंवा इतर प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

दिनांक : २९/११/२०२५
ठिकाण : सोलापूर, महाराष्ट्र

सही/- अधिकृत अधिकारी
आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड
(पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झाली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाते)



## खरेदीपुर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन** : जिल्हा सोलापूर, **तालुका उत्तर सोलापूर पैकी शहर** सोलापूर महानगरपालिकेचे हद्दवाढ भाग नेहरु नगर मधील सदानंद नगर मधील **खुली प्लॉट जागा** यांसी **गट नं.३०/अ/१३** मधील प्लॉट नं. E-०९ याचे क्षेत्र ७९.८१ चौ.मी. किंवा ८६० चौ. फुट. यांसी चतुः सिमाः पुर्वेसः प्लॉट नं. ई-८, दक्षिणेसः प्लॉट नं. ई-१०, पश्चिमेसः रस्ता, उत्तरेसः लिहून देणार यांनी बांधलेला जोता.

येणेप्रमाणे वर खुलासा केलेली प्लॉटजागा ही **मारुती बेलप्पा तळभंडारे** यांचे मालकी व कब्जे वहिवाटीची असुन, त्यांनी सदरची प्लॉटजागा ही आमचे अशिल-**सागर शिवकुमार माळेकर** यांना खरेदी देण्याचे ठरवून, आमचे अशिलाकडून इसारा दाखल रक्कम स्विकारुन आमचे अशिलाचे नांवे कब्जापावती व करारपत्र आमचे अशिलांच्या नावे लिहून दिलेली आहे. सदर प्लॉट जागा ही निर्वेध व निजोखमी असल्याची हमी व खात्री सदर प्लॉटजागा मालकांनी आमचे अशिलास दिली आहे.

तरी वर नमूद प्लॉटजागेवर अन्य कोणाचा कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, अधिकार, टाच, साठेखत, गहाणखत वगैरे हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसाच्या आत त्यांचे हक्काचे पृष्ठयर्थ कागदपत्रासह त्यांची लेखी हरकत नोंदवावी. याप्रमाणे मुदतीत कोणी काही हक्काची जाणीव न दिल्यास, सदर प्लॉटजागा वर नमूद मालकांचे मालकीची असून ती निर्वेध व निजोखमी आहे, असे समजून आमचे अशिल सदर प्लॉटजागेचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील, त्यानंतर कोणाची कसलीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

ही खरेदीपुर्व जाहीर नोटीस दिली ता. २८/११/२०२५.

**सही/-**
**ॲड. विलास चं. गुदपे**
**एम.ए.एलएलबी.**
**रा. ब्लॉक नं.२४, सोनी नगर, मोतीबाग,**
**सोलापूर मो.नं. ९९७०१५५४१५**
**अशिल-सागर शिवकुमार माढेकर तर्फे ॲडव्होकेट**



## श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली., सोलापूर

६०/६१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर-४१३००२
फोन -०२१७-२६२२९३४४/२६२२९३३

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या नियम १०७ मधील तरतुदीनुसार स्थावर मालमत्तेचे फेरजाहीर लिलाव व विक्री नोटीस**

ज्या अर्थी सही करणार, विशेष वसुली व विक्री अधिकारी, श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली, सोलापूर हि संस्था महाराष्ट्र कायदा १९६१ अन्वये नोंदणीकृत संस्था असून, त्यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ व्या नियम १०७ मधील तरतुदीनुसार दिनांक ०६/०६/२०२३ रोजी मागणी नोटीस कर्जदार समर्थ श्रीशैल माळी प्रोप्रा श्रीशैल शरणप्पा माळी रा. प्लॉट नं. २१०/११/३. हेरीटेज मनिधारी एम्पायर, अक्कलकोट रोड, सोलापूर व जामीनदार १) कुंडलिक झुंबर खंडागळे रा. खंडागळे वस्ती, उळे, दक्षिण सोलापूर २) लक्ष्मण ज्योती जोगदनकर रा. खंडोबाची वाडी. सावरगाव ता. तुळजापूर जि. उस्मानाबाद ३) गीतांजली श्रीशैल माळी रा. प्लॉट न.२१०/११/३, हेरीटेज मनिधारी एम्पायर, अक्कलकोट रोड, सोलापूर यांना पाठवून रक्कम रुपये ३८.९२,०५८/- या वर दि.१७/११/२०२२ पासून पुढे ही सर्व रक्कम परतफेड होईपर्यंत द.सा.द.शे. १४% दराने होणाऱ्या व्याजाची रक्कमेची मागणी केलेली होती व आहे. सदर नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून थकबाकीदार यांनी सदर थकीत रक्कम जमा करण्यास कसूर केलेला आहे. तरी बँकेने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या नियम १०७ मधील तरतुदीनुसार पुढील कारवाई करत, सदर स्थावर मिळकतीचे कायदेशीररित्या ताबा घेतलेले आहे. तरी सदर वर नमूद थकीत कर्ज रक्कमेपोटी बँकेने या खाली नमूद केलेले स्थावर मालमत्तेचा जाहीर लिलाव **जेथे आहेत व जैसे आहेत** अशा त्या त्या मिळकती त्या त्या परीस्थिती मध्ये विक्री करणार आहेत

**जाहिर लिलाव व विक्री करण्यात येणाऱ्या मालमत्तेचे वर्णन पुढील प्रमाणे असे**

| मिळकतदाराचे नाव | मिळकतीचे वर्णन | | पूर्व | दक्षिण | पश्चिम | उत्तर | राखीव किंमत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| श्रीशैल शरणप्पा माळी | डि व सब डि सोलापुर पैकी ता. दक्षिण सोलापूर, मौजे मुळेगांव, धवल नगर गट नं. १०६/अ+ब/३ (ऑनलाईन उतारा प्रमाणे गट नं. १०६/अ/ब/३) | प्लॉट नं.१३०. क्षेत्र ९२.९३ चौ.मी. | गट नं.१०६/४ | प्लॉट नं. १३१ | ले आ रस्ता | प्लॉट नं. १२९ | रु. ३,००,०००/- |
| | | प्लॉट नं.१३२ क्षेत्र ९२.९३ चौ.मी. | गट नं.१०६/४ | प्लॉट नं. १३२ | ले आ रस्ता | प्लॉट नं. १३१ | रु. ३,००,०००/- |
| | | प्लॉट नं.१३३ क्षेत्र ९२.९३ चौ.मी. | गट नं.१०६/४ | प्लॉट नं. १३४ | ले आ रस्ता | प्लॉट नं. १३२ | रु. ३,००,०००/- |
| | | प्लॉट नं.१३४ क्षेत्र ९२.८१ चौ.मी. | गट नं.१०६/४ | प्लॉट नं. १३५ | ले आ रस्ता | प्लॉट नं. १३३ | रु. २,९०,०००/- |
| | | प्लॉट नं.१३५ क्षेत्र ९२.९३ चौ.मी. | गट नं.१०६/४ | प्लॉट नं. १३६ | ले आ रस्ता | प्लॉट नं. १३४ | रु. ३,००,०००/- |
| | | प्लॉट नं.१३६ क्षेत्र ९२.९३ चौ.मी. | गट नं.१०६/४ | प्लॉट नं. १३७ | ले आ रस्ता | प्लॉट नं. १३५ | रु. ३,००,०००/- |
| | | प्लॉट नं.१३७ क्षेत्र १३७.५४ चौ.मी. | गट नं.१०६/४ | ले आ रस्ता | ले आ रस्ता | प्लॉट नं. १३६ | रु. ४,२५,०००/- |
| लिलावाचे ठिकाण तारीख व वेळ | | श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली, सोलापूर<br>६०/६१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर-४१३००२<br>**बंद लिफाफ्यात निविदा सादर करणेचे दि. १५/१२/२०२५**<br>वेळ - सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत<br>**निविदा उघडण्याची तारीख व वेळ दि. १६/१२/२०२५ सायं. ५:०० वा** | | | | | |
| १७/११/२०२२ अखेर येणेबाकी | | रु. ३८.९२,०५८/- दि. १८.११.२०२२ पासून होणारे व्याज, दंड व्याज व इतर खर्च | | | | | |

**टिप-** लिलावात भाग घेणार यांनी राखीव किमतीच्या १०% बयाणा रक्कम दि.१२/१२/२०२५ पूर्वी दुपारी ३:०० वाजेपर्यंत डिमांड ड्राफ्ट अथवा पे ऑर्डर, आर.टी.जी.एस ने भरणा करावी. बयाणा रक्कम भरणा केल्याशिवाय लिलावात भाग घेता येणार नाही. २. लिलावाच्या अटी व शर्ती लिलावाच्या दिवशी लिलावापूर्वी वाचून दाखविण्यात येईल आणि त्या बँकेच्या सूचना पत्रकामध्ये दिले जातील. ३. लिलावापूर्वी थकबाकीदाराने रक्कम भरल्यास लिलाव रद्द करण्यात येईल. ४. लिलाव मिळकतीसंबंधी अधिक माहिती पाहिजे असल्यास बँकेच्या प्रधान कार्यालयात संपर्क साधावा.

**दिनांक - २७/११/२०२५**
**स्थळ - सोलापूर**

**सही-**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी,**
**श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली. सोलापूर**

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### तन्वी, प्रबोध राज्यस्तरावर चमकले



**वाशीम** : बारामती येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय शालेय कराटे स्पर्धेत वाशीमच्या शोतोकॉन कराटे ॲकॅडमीचे विद्यार्थी तन्वी श्रीकिसन खेलपाडे आणि प्रबोध माधव अढाव या दोन विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी केली. या स्पर्धेत सर्वोत्तम कामगिरी करणारी तन्वी ही राज्यातून दुसरी तर प्रबोध हा राज्यातून तिसरा आला. या विजयामुळे आता तन्वी आणि प्रबोध हे दोन्ही खेळाडू शासकीय सेवेमध्ये खेळाडूंसाठी जे पाच टक्के राखीव असतात, त्यासाठी आता ते पात्र ठरले आहेत. प्रशिक्षक सेन्सेई निखिल देशमुख यांनी या खेळाडूंना मार्गदर्शन केले. मागील वर्षी चैतन्य बबन डाखोरे याने राज्यस्तरावर प्रथम क्रमांक मिळवून लुधियाना येथे राष्ट्रीय स्पर्धेसाठी त्याची निवड झाली होती. ■

### पुणे ग्रॅण्ड टूर सायकल रोड रेस १९ जानेवारीपासून

**नवी दिल्ली** : देशातील पहिली युनियन सायकलिस्ट इंटरनॅशनल २.२ श्रेणी रोड रेस, पुणे ग्रॅण्ड टूरची पहिली आवृत्ती १९ ते २३ जानेवारी दरम्यान आयोजित केली जाणार आहे. यजमान भारत दोन संघांना मैदानात उतरवणार आहे. सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडियातर्फे (सीएफआय) २ ते ६ डिसेंबर दरम्यान ओडिशातील संबलपूर येथे राष्ट्रीय अजिंक्यपद आणि निवड चाचण्या आयोजित करण्यात येणार आहे. निवडलेल्या खेळाडूंचे मूल्यांकन २८ डिसेंबर रोजी पुण्यात होणाऱ्या राष्ट्रीय रोड रेसद्वारे केले जाईल. भारत अ आणि भारत ब या दोन भारतीय संघांची उपस्थिती, उदयोन्मुख आणि अनुभवी सायकलपटूंना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर आपले कौशल्य दाखवण्यासाठी एक व्यापक व्यासपीठ प्रदान करेल. बजाज पुणे ग्रॅण्ड टूर हा भारताचा प्रमुख कार्यक्रम आहे, या कार्यक्रमाचा उद्देश युनियन सायकलिस्ट इंटरनॅशनलच्या (यूसीआय) जागतिक कॅलेंडरमध्ये पुणे सायकल रोड रेससाठी नियमित स्थान मिळवणे आहे. पहिल्या आवृत्तीत उच्चभ्रू आंतरराष्ट्रीय सायकलपटू सहभागी होतील, त्यामुळे ही स्पर्धा चुरशीची आणि जागतिक दर्जाची होईल असा विश्वासआहे. या टूरमध्ये पुणे जिल्ह्यातील निसर्गरम्य भागातून जाणारे चार टप्प्यांचे ४३७ कि.मी.चे आव्हानात्मक मार्ग असतील.

### वनरक्षक नीलेश धोंगडे यांची ऐतिहासिक कामगिरी

**अहेरी** : नांदेड येथील विष्णुपुरी प्रकल्पात पार पडलेल्या १२ व्या राष्ट्रीय ड्रॅगन बोट



अजिंक्यपद स्पर्धेत महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या खेळाडूंनी चमकदार कामगिरी केली. विशेष म्हणजे, आलापल्ली (गडचिरोली) येथील वन विकास महामंडळात कार्यरत असणारे वनरक्षक नीलेश किशोरराव धोंगडे यांनी वरिष्ठ गटात ऐतिहासिक यश मिळवले. पुरुष डीबी २२ - ५०० मीटर या क्रीडा प्रकारात नीलेश धोंगडे यांनी कांस्यपदक जिंकून केवळ महाराष्ट्राचेच नव्हे, तर गडचिरोली परिसराचे नाव राष्ट्रीय स्तरावर उंचावले आहे. या स्पर्धेचे महत्त्व अधिक होते. कारण यातील कामगिरीच्या आधारावरच सान्या हैनान, चीन येथे २०२६ मध्ये होणाऱ्या ६ व्या आशियाई बीच गेम्ससाठी भारतीय ड्रॅगन बोट संघाची निवड होणार आहे. नीलेश धोंगडे यांच्या या उत्कृष्ट कामगिरीमुळे त्यांची भारतीय संभाव्य संघात निवड होण्याची शक्यता बळावली आहे. या अभूतपूर्व यशाबद्दल वनरक्षक नीलेश धोंगडे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. ■


# भारताचे वन-डेवर लक्ष केंद्रित : मॉर्केल

◆ **रांची, २८ नोव्हेंबर**

कसोटी मालिकेतील पराभवातून बाहेर पडून भारतीय संघाला लवकरात लवकर वन-डे क्रिकेटवर लक्ष केंद्रित करावे लागेल. धोकादायक, आत्मविश्वासू दक्षिण आफ्रिकेच्या संघाचा सामना करण्यासाठी भारतीय संघाला पुन्हा गती मिळवणे अत्यावश्यक आहे, असे भारतीय संघाचे गोलंदाजी प्रशिक्षक मोर्ने मॉर्केल म्हणाले.

कोलकाता आणि गुवाहाटी येथे दक्षिण आफ्रिकेविरुद्ध ०-२ असा लाजिरवाणा क्लीन स्विप व कसोटी पराभवानंतर भारत तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेत येत आहे.रविवार ३० नोव्हेंबर रोजी रांची येथे भारत व दक्षिण आफ्रिकेदरम्यान पहिला दिवस-रात्र काळात एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामना खेळला जाणार आहे.

कसोटीपासून वन-डे क्रिकेटकडे वळणे मानसिकदृष्ट्या कठीण आहे, परंतु संघ त्या बदलासाठी दृढनिश्चयी आहे. आमच्यासाठी दोन आठवडे निराशाजनक होते, परंतु आता आमच्याकडे विचार



करण्यासाठी काही दिवस आहे. आता महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपली सर्व ऊर्जा वन-डे क्रिकेट संघात घालणे आहे, असे मोर्केल म्हणाले.

**मजबूत सुरुवात करणे आवश्यक**

दक्षिण आफ्रिका संघ आपल्या कसोटी मालिकेतील विजयानंतर ताजातवाना व उत्साही असेल. रंगीत कपडे परिधान करणे व चेंडू बदलणे वेगळी ऊर्जा आणते. दक्षिण आफ्रिकेकडे गती आहे, तेव्हा भारतीय संघासाठी पुढील एक किंवा दोन आठवड्यात चांगली मजबूत सुरुवात करणे महत्वाचे आहे, असा इशारा मॉर्केलने दिला.

२०२६ चा टी-२० विश्वचषक स्पर्धेची तयारी म्हणून एकदिवसीय मालिका वापरण्याचा विचार त्यांनी फेटाळून लावला.

माझ्यासाठी निराशाजनक दोन आठवड्यांनंतर भारतीय संघात पुन्हा गती आणणे हे लक्ष केंद्रित आहे आणि ते करण्याचा मार्ग म्हणजे चांगले, भक्कम वन-डे क्रिकेट खेळणे आहे. रोहित शर्मा व विराट कोहलीसारखे अनुभवी खेळाडू संघात परत आल्यामुळे आपण उत्साहित आहे, असे ते म्हणाले.

केएल राहुल व ऋषभ पंत दोघेही संघात एकत्र खेळतील का असे विचारले असता, मॉर्केलने निवडीच्या बाबींबद्दल काहीही सांगितले नाही. माझा विभाग गोलंदाजी आहे, मी निवडीत सहभागी होत नाही. आमच्याकडे निवडकर्त्यांकडे ते हाताळण्याची जबाबदारी आहे, असे ते म्हणाले.

**रांचीच्या वातावरणाचे मूल्यांकन करणे आवश्यक**

रांचीतील सामने प्रकाशझोतात असल्यामुळे तेथील परिस्थितीचे काळजीपूर्वक मूल्यांकन करणे आवश्यक आहे, असे मॉर्केल म्हणाले.

काल जेव्हा मी विमानातून उतरलो तेव्हा ते खूपच थंड होते. सायंकाळी चेंडू काय करतो हे पाहणे मनोरंजक असेल. आज आम्ही प्रकाशझोतात सराव करत आहोत, त्यामुळे आम्हाला चांगले संकेत मिळतील, असे ते म्हणाले.

खेळपट्टी खूप चांगली दिसते. संघबांधणीवर चर्चा आज रात्री होईल. सरावानंतर आपल्याला वाट पहावी लागेल, असे ते म्हणाले.

**गिल, अय्यर बरे होताय**

शुभमन गिल व श्रेयस अय्यर दुखापतींमधून सावरत आहे. ते बरे होत आहे, असे त्यांनी सांगितले.

मी दोन दिवसांपूर्वी शुभमनशी केवळ चौकशी करण्यासाठी बोललो आणि तो बरा होत आहे. श्रेयसने आपले पुनर्वसन सुरू केले आहे व तो उत्तम आहे. आम्ही त्यांचे स्वागत करण्यास उत्सुक आहोत. ते निरोगी आहेत आणि संघात परतण्याची तयारी करत आहेत, असे त्यांनी सांगितले.ॉ

**युवा गोलंदाजांसाठी मोठी संधी**

अनेक वरिष्ठ खेळाडूंना विश्रांती देण्यात आल्यामुळे, एकदिवसीय मालिकेने अर्शदीप सिंग, हर्षित राणा व प्रसिध कृष्णा सारख्या दुसऱ्या फळीतील वेगवान गोलंदाजांसाठी एक महत्त्वाची संधी आहे. हे तिघेही एका दर्जेदार फलंदाजी विभागाविरुद्ध खेळणार आहेत. त्या सर्वांनी भरपूर वन-डे क्रिकेट खेळले आहे, हे एक आक्रमक ब्रॅण्डचे क्रिकेट आहे, असे मॉर्केल म्हणाले. ◀(वृत्तसंस्था)

# पाकिस्तानला नमवून श्रीलंका अंतिम फेरीत

**टी-२० तिरंगी क्रिकेट मालिका** ● **दुष्मंथ चमिराचे ४ बळी**



दुष्मंथ चमिराचे अभिनंदन करताना श्रीलंकेचे खेळाडू

◆ **रावळपिंडी, २८ नोव्हेंबर**

वेगवान गोलंदाज दुष्मंथ चमिराने २० धावांत टिपलेल्या ४ बळींच्या बळावर श्रीलंकेने पाकिस्तानवर ६ धावांनी रोमहर्षक विजय नोंदवून टी-२० तिरंगी मालिकेच्या अंतिम फेरीत धडक मारली. या तिरंगी मालिकेतील तिसरा संघ झिम्बाब्वे बाहेर झाला आहे. आता शनिवारी याच मैदानावर पाकिस्तान आणि श्रीलंका यांच्यादरम्यान अंतिम सामना खेळला जाणार आहे.

प्रथम फलंदाजी करणाऱ्या श्रीलंकेने मर्यादित २० षटकांत ५ बाद १८४ धावा उभारल्या आणि पाकिस्तानसमोर विजयासाठी १८५ धावांचे लक्ष्य ठेवले, परंतु धावांचा पाठलाग करताना पाकिस्तानला ७ बाद १७८ धावांपर्यंत मजल मारता आली.

सलग तीन विजयांसह शनिवारी अंतिम फेरीत पोहोचलेल्या पाकिस्तानचा कर्णधार सलमान अली आगाची कारकिर्दीतील सर्वोत्तम नाबाद ६३ धावांची खेळी व्यर्थ ठरली.

श्रीलंकेकडून सलामीवीर कामिल मिश्राने ४८ चेंडूंत ६ चौकार व ३ षट्कारसह ७६ धावांची आकर्षक खेळी केली. कुसल मेंडिसने ४० धावांची व जनित लियानगेने नाबाद २४ धावांची भर घातली.

विजयासाठी पाकिस्तानच्या कर्णधझार सलमान आगासह उस्मान ख्वाजा (३३), सईम अयुब (२७) व मोहम्मद नवाजने (२७) शर्थीचे प्रयत्न केले, परंतु पॉवर प्लेमध्ये ३ धावांत ३ बळी अशा आकड्यांसह दुष्मंथ चमीराने पाकिस्तानचा पाठलाग रोखला. पाकिस्तानला विजयासाठी १० धावांची आवश्यकता असताना केवळ तीन धावा दिल्या.

सर्वांनी योगदान दिले, अर्थातच चमीराने जागतिक दर्जाची गोलंदाजी केली, याचा अभिमान आहे, असे श्रीलंकेचा कर्णधार दासुन शनाका म्हणाला. ◀(वृत्तसंस्था)

# एस.पी.एम. स्कूलमध्ये क्रीडा सप्ताह उत्साहात

**सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर-**

एस.पी.एम.इंग्लिश स्कूलमध्ये क्रीडा सप्ताह उत्साहात पार पडला. याचे उद्घाटन संगमेश्वर महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक डॉ. आनंद चव्हाण यांच्या हस्ते झाले. मुख्याध्यापिका संगीता कोळी यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी क्रीडा शिक्षक प्रकाश कंपली, पालक शिक्षक संघटनेच्या अध्यक्षा गितांजली मुळे उपस्थित होते. पाहुण्यांचा परिचय अनुराधा इंगळे यांनी केला. कार्यक्रमाचे सूत्र संचलन विद्यार्थ्यांनी गार्विक मुळे, वेदिका गौतमे, गार्गी कमठाणकर यांनी केले. स्वरा क्षीरसागर हिने आभार मानले. शाळा समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.



# ए. जी. पाटील अभियांत्रिकीत आंतर विभागीय बॅडमिंटन व टेबल टेनिस स्पर्धा उत्साहात

**सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर-**

ए. जी. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ लोणेरे अंतर्गत आंतर विभागीय बॅडमिंटन आणि टेबल टेनिस स्पर्धा उत्साहात पार पडली. या स्पर्धेचे उद्घाटन महाविद्यालयाचे कॅम्पस डायरेक्टर डॉ. एम. ए. चौगुले, प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. पोतदार, विद्यापीठ सहाय्यक क्रीडा समन्व्यक प्रा. बालाजी फुलचवाड, संजय वाईकर, सोलापूर झोन सचिव प्रा. सचिन गायकवाड, निवड समिती सदस्य प्रा.अमित वडवेराव, प्रा. गणेश बागल यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. टेबल टेनिस स्पर्धा प्रमुख पंच झेड. एम. पुणेकर, बॅडमिंटन स्पर्धा अमित नह्ला, सोनिया चंकेश्वरा यांच्या सहकार्याने पार पडली. स्पर्धेचे संयोजन क्रीडा विभाग प्रमुख प्रा. शिवशरण कोरे व क्रीडा समन्व्यक यांनी केले. सर्वांगीण विकासासाठी संस्था अध्यक्ष एस. ए. पाटील व संस्था सचिव शिवानंद पाटील यांनी प्रोत्साहन दिले.




# जिल्हा शुटींग बॉल संघाच्या कर्णधारपदी बेगमपुरे, गरगडे

**सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर-**

सोलापूर जिल्हा शुटींग बॉल संघाच्या कर्णधारपदी शोएब बेगमपुरे व कार्तिका गरगडे यांची निवड करण्यात आली. परभणी येथे होणाऱ्या ३८व्या राज्य स्पर्धेसाठी त्रिस्त्रीय निवड समितीने निवडलेला सोलापूर जिल्हाचा पुरुष व महिला संघ असोसिएशनचे सचिव फैजअहमद बेगमपुरे यांनी जाहीर केला.

सोलापूर शहर व जिल्हा शुटींग बॉल असोसिएशन व समृद्धी स्पोर्ट्स क्लबच्या वतीने पुरुष व महिला अजिंक्यपद व निवड चाचणी स्पर्धा पार पडली. त्यातून हे संघ निवडले. समृद्धी स्पोर्ट्स क्लबचे उपाध्यक्ष रामचंद्र दत्तू यांनी पुरुष व महिला संघांना किट दिले.

दोन्ही संघांचे समृद्धी सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष तथा असोसिएशनचे अध्यक्ष संजय सावंत, उपाध्यक्ष अलीम शेख, सचिव फैजअहमद बेगमपूरे, रशीद बागवान, मेहमूद मडकी, सलीम करणकोट, इकबाल दलाल, तौसिफ बागवान, आमीर कुमठे व कलीम करणकोट यांनी अभिनंदन केले.

**संघ : पुरुष** : शोएब बेगमपुरे, अमीर काझी, हिरो शेख, गणेश मोरे, अजय कांबळे, फैजान इनामदार, अमन शेख, जुनैद कुरेशी, विनायक नाळे, फरहान लालकोट, सिद्धार्थ कांबळे, ओंकार चक्रनरायण. प्रशिक्षक: श्रीनिवास कामूर्ती, संघ व्यवस्थापक: रफी दिवाण.

**महिला** : कार्तिका गरगडे, अनम रंगरेज, वैष्णवी आदलिंगे, नौशिन चांदा, श्रावणी खताड, फिरदौस शेख, संचिता माडी, सानिया सय्यद, मानसी अलदर, अदीबा शेख, राणी लोभटे, आफिया शेख. प्रशिक्षक: अब्दुल हमीद हिरोली, संघ व्यवस्थापक: विष्णू तळभंडारे.

# बार्शीच्या कुणाल लोखंडेचा जलतरण स्पर्धेत षटकार

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि. २८ नोव्हेंबर-**

विधी महाविद्यालयातील कुणाल लोखंडे याने महाविद्यालयानी जलतरण स्पर्धेतील ५० व १०० मीटर फ्री स्टाईल, ५० व १०० मी बॅक स्ट्रोक आणि ५० व १०० मी ब्रेस्ट स्ट्रोक या सहा प्रकारात प्रथम क्रमांक पटकाविला.

कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२३ व्या जयंतीनिमित्त कर्मवीर जलतरण तलावात श्री. शिक्षण शास्त्र महाविद्यालय ही स्पर्धा आयोजित केली होती. कुणालला शारीरिक शिक्षण संचालक डॉ. दत्तप्रसाद प्रेमलता व मनोहर सोनटक्के यांनी मार्गदर्शन केले. त्याचा



महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. वाय. सोनकांबळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी प्रा. शिकारे एम. पी., प्रा.मिठा एम.एस., प्रा.साखरे दीपिका, प्रा. सुरवसे मॅडम, प्रा. समाधान काळे, प्रा.वडणे सर, प्रा.खोत सर, गव्हाणे एस.एस., कोळी के. वी., कोल्हे ए.जी., वाघे आर. जी., माने एम.एम., कृष्णा सातपुते, ठोंबरे एस.के., शेळके एस.एम. उपस्थित होते. त्याचे श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ.बी. वाय. यादव, उपाध्यक्ष नंदन जगदाळे, जनरल सेक्रेटरी पी.टी.पाटील, खजिनदार जयकुमार शितोळे, सहसचिव अरुण देबडवार आदींनी अभिनंदन केले.



# कै.वि.मो.मेहता प्राथमिक शाळेत क्रीडा सप्ताहास सुरुवात

## खेळामुळे शरीर आणि मन उत्साही व आनंदी राहते

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर-**

जुळे सोलापूर येथील कै. वि.मो.मेहता प्राथमिक शाळेच्या मैदानावर क्रीडा सप्ताहास सुरवात झाली.

हवेत फुगे सोडून या स्पर्धेचे उद्घाटन पोलीस उपनिरीक्षक मोहन पवार, उदयसिंह साळुंखे याच्या हस्ते झाले. सुरवातीस क्रीडा ज्योतीचे जल्लोषात आगमन झाले. इ.३री व ४थीच्या विद्यार्थ्यांनी शिस्तबद्धरीत्या संचलन करुन प्रमुख अतिथींना मानवंदना दिली. स्वरा कुलकर्णी हिने सर्व विद्यार्थ्यांना क्रीडा शपथ दिली १ली ते ४थी च्या सर्व विद्यार्थ्यांनी साहित्य कवायत प्रकार सादर केले. संचलनातील सर्व विद्यार्थ्यांना क्रीडाप्रमुख रोहिणी माशाळकर व गणेश माने यांचे मार्गदर्शन लाभले. इ. ३री च्या विद्यार्थ्यांनी बहारदार नृत्य सादर केले. त्यांना सुनेत्रा मोहोळकर यांनी मार्गदर्शन केले. संस्थेचे राजेश पटवर्धन यांनी सर्व विद्यार्थ्यांना क्रीडा स्पर्धेच्या शुभेच्छा दिल्या. त्यानंतर क्रीडामैदानाचे पूजन करुन व टॉस उडवून इ.२री च्या रस्सीखेच सांघिक सामन्याचे उद्घाटन करण्यात आले. मुख्याध्यापिका सीमा कोरवलीकर यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोहिणी माशाळकर यांनी केले. शीतल जालीमिंचे यांनी आभार मानले.

### भारत-श्रीलंका महिला टी-२० मालिका २१ डिसेंबरपासून

**नवी दिल्ली, २८ नोव्हेंबर**

आगामी २१ डिसेंबरपासून भारतात श्रीलंका महिला संघ भारताविरुद्ध पाच सामन्यांची टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट मालिका खेळणार आहे. २१ ते ३० डिसेंबर दरम्यान विशाखापट्टणम् आणि त्रिवेंद्रम येथे मालिकेतील पाच सामने खेळले जाणार आहे, असे बीसीसीआयने शुक्रवारी सांगितले. दोन्ही देशांमधील राजकीय तणावा मुळे बांगलादेशविरुद्धचा नियोजित सामना पुढे ढकलण्यात आला होता. या वर्षाच्या सुरुवातीला एकदिवसीय विश्वचषक जिंकल्यानंतर भारतीय महिला संघाचा हा पहिलाच सामना असेल. भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय) पुढील महिन्यात पाच सामन्यांच्या सामन्यांसाठी श्रीलंकेचे यजमानपद भूषवणार असल्याने आगामी महिला टी-२० मालिकेचे वेळापत्रक जाहीर करत आहे.



# विश्वविजेती दिव्यांग क्रिकेटपटू गंगा कदम रविवारी सोलापुरात

## दमाणी अंध शाळेच्या वतीने विमानतळापासून दमाणीनगरपर्यंत रॅली

### मुख्यमंत्र्याकडून १६ डिसेंबरला सन्मान

**सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर-**

दिव्यांग (अंध) महिलांच्या पहिल्या विश्वचषक टी-२० क्रिकेट स्पर्धेत भारताने विजेतेपद पटकाविले. त्या संघात उपकर्णधार गंगा कदम हिचा समावेश होता. ती सोलापुरात विमानाने रविवारी दुपारी दोन वाजता येणार आहे. सोलापुर विमानतळावर भैरूरतन दमाणी अंध शाळेच्या वतीने तिचे स्वागत करण्यात येणार आहे. विमानतळापासून ते दमाणी नगरपर्यंत भव्य रॅली काढण्यात येणार आहे. भैरूरतन दमाणी अंधशाळेत या रॅलीची सांगता होणार आहे.

तरी सोलापुरातील क्रीडा प्रेमींनी उपस्थित राहून तिला प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन तिचे प्रशिक्षक राज शेळके यांनी केले आहे.

विजेत्या महिला संघाचा सन्मान १६ डिसेंबर रोजी करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री कार्यालयाकडून निरोप आला असल्याचेही श्री. शेळके यांनी सांगितले.

# तलाठी भाऊसाहेबांनी पळापळी केल्याने दीड लाख शेतकऱ्यांची झाली 'ई-केवायसी'

- अजूनही २५ हजार शेतकऱ्यांची ई-केवायसी पेंडिंग
- साडेपाच लाख शेतकऱ्यांच्या खात्यावर ६६५ कोटी जमा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर-**
अतिवृष्टी आणि पूर स्थितीमुळे जिल्ह्यातील बाधित ७ लाख ६४ हजार १७३ शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईसाठी ८६७ कोटी ३७ लाख ६३ हजार ८५५ रूपयांची मागणी अहवालाद्वारे केली आणि यातील सर्वच रक्कम मंजूर झाली आहे. यातील ५ लाख ९९ हजार ६६१ शेतकऱ्यांसाठी आजतागायत ७३२ कोटी ०४ लाख ४५ हजार ४४० रूपये मंजूर झाले असून, त्यापैकी ५ लाख ५१ हजार ५२७ शेतकऱ्यांच्या खात्यावर आजतागायत ६६५ कोटी ०२ लाख ९९ हजार ५७१ रूपये झाले जमा झाले आहेत आणि ईकेवायसीअभावी, फार्मर आयडीअभावी २४ हजार २९४ शेतकऱ्यांचे २६ कोटी ५६ लाख २९ हजार ३३७ रूपये पेंडिंग पडले आहेत. दरम्यान, जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश मिळताच जिल्ह्यातील तलाठी भाऊसाहेबांनी पळापळी केल्याने १५ दिवसांत दीड लाख शेतकऱ्यांची ई-केवायसी होवून त्यांच्या खात्यावर पैसेही जमा झाले.

अतिवृष्टी होवून दीड महिना झाले तरी अजून २४ हजार २९४ शेतकऱ्यांच्या खात्यावर दमडीही पडली नसल्याने त्यांना रब्बी हंगामाचे बि-बियाणे, खते घेण्यासाठी अडचण आली. शासनाच्या पोर्टलवर ही रक्कम अदा झालेली दिसत आहे मात्र केवळ ई-केवायसी, फार्मर आयडीमुळे ही रक्कम लटकली आहे. जिल्हा प्रशासनाकडून ही रक्कम अदा करण्यासाठी धडपड चालू आहे. गावनिहाय कॅम्प सुरू केले आहेत. आता ई-केवायसी शेतकऱ्यांसाठी गरजेची आहे. यामुळे जाणकार शेतकरी आपला फार्मर आयडी, ई-केवायसी ई-महासेवा केंद्र आणि प्रशासनाच्या शिबिरात जावून काढू लागले आहेत. मात्र अनेक अडाणी शेतकऱ्यांना या कामात यश येत नाही. यामुळे अशाच शेतकऱ्यांचे हे पैसे बँकांत पडले आहेत.

जिल्ह्यातील १०३ महसूल मंडलात अतिवृष्टी झाली होती; २१ ते २३ सप्टेंबरपर्यंत महापुराचे मोठे संकटही ६ तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांवर ओढवले होते. राज्य सरकारने भरपाईसाठी तीन हेक्टरपर्यंत मदत देण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी ३२ हजार कोटींचे पॅकेज जाहीर करण्यात आले. शेतकऱ्यांच्या खात्यावर सध्या थेट रक्कम जमा होवू लागली असून, ॲग्रीस्टॅक केलेल्या सर्वच शेतकऱ्यांना थेट मदत मिळत आहे. ही रक्कम मिळविण्यासाठी आता ई-केवायसीचीही गरज आहे. यामुळे शेतकऱ्यांनी ई-केवायसी करून नुकसान भरपाई आपल्या बँक खात्यावर पाडून घ्यावी, असेही आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले आहे. या महापुरात अनेकांची शेती खरडून गेली आहे; अनेकांच्या ऊस व फळबागा वाहून गेल्या आहेत; विहिरी बुजल्या आहेत, अशा शेतकऱ्यांना येत्या काही दिवसात पैसे मिळणार आहेत. अतिवृष्टीची नुकसान भरपाई झाल्यावर या शेतकऱ्यांना शासनाकडून मदतीचा हात मिळणार असल्याचेही जिल्हा प्रशासनाने स्पष्ट केले आहे. गावोगाव शिबिरे घेवून त्या शेतकऱ्यांची ई-केवायसी, ॲग्रीस्टॅक करून घेतले जात आहे. अतिवृष्टी व पूर परिस्थितीमुळे जिल्ह्यातील विविध भागात झालेल्या शेती, पायाभूत सुविधा व सार्वजनिक मालमत्तेच्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी नुकताच केंद्रीय पथकाने सोलापूर जिल्ह्यात दौरा केला आहे. त्याचेही अहवाल केंद्राकडे जाणार आहेत.

त्या काळात महापूर आणि अतिवृष्टीने जिल्ह्यातील १२ हजार ५० हेक्टर क्षेत्रावरील माती खरडून गेली. त्यामुळे या जमिनी कसण्यायोग्य राहिल्या नाहीत. यासाठी राज्य शासनाकडे ५७ कोटी रुपयांची मागणी केल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी दिली. अतिवृष्टीने बाधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याचे काम सध्या सुरु आहे. फॉर्मर आयडी असलेल्या शेतकऱ्यांपर्यंत मदत पोहोचत आहे. मात्र ज्या शेतकऱ्यांचे फॉर्मर आयडी नाहीत, अशा शेतकऱ्यांची ई केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी गाव पातळीवर शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे. यासाठी तलाठी यांना आदेश देण्यात आले आहेत; अशीही माहिती जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिली. अतिवृष्टीने जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांच्या विहीरी ढासळून त्यात गाळ पडला आहे. या विहिरीच्या दुरुस्तीचेही नियोजन आखण्यात येत आहे. यासाठी रोजगार हमी योजनेतून शेतकऱ्यांना मदत करण्यात येत असल्याचेही जिल्हाधिकारी यांनी सांगितले.

## सोलापूरच्या केंद्रिय विद्यालयातील रविंद्र आठवलेंचा आज निरोप समारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ नोव्हेंबर-**
येथील मध्य रेल्वेच्या पी.एम. श्री केंद्रीय विद्यालयातील कर्तव्यनिष्ठ कर्मचारी रवींद्र लक्ष्मण आठवले (सब स्टाफ) हे केंद्रीय विद्यालयातील ३५ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त होत आहेत. त्यानिमित्त दि. २९ नोव्हेंबर रोजी मोदी येथील पी.एम. केंद्रीय विद्यालय येथे निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला मध्य रेल्वे सोलापूर विभागाचे वरिष्ठ अधिकारी, सहकारी कर्मचारी स्टाफ आणि रवींद्र आठवले यांचे कुटुंबिय व आठवले मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. आठवले यांनी ३६ वर्षांच्या सेवाकाळात नेहमीच कामाला प्राधान्य दिले. त्यांनी विद्यालयाच्या विविध जबाबदाऱ्या उत्कृष्टपणे पार पाडल्या. २१ जुलै १९९० मध्ये रेल्वे सेवेत रुजू झालेले आठवले यांनी आपल्या कारकिर्दीत अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या पार पाडल्या. विशेषतः पी.एम. केंद्रीय विद्यालय मध्य रेल्वे येथे सब स्टाफ म्हणून काम करताना त्यांनी अत्यंत महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांनी आजपर्यंत प्रामाणिकपणे आपली सेवा पार पाडली.

**३६ वर्षांच्या समर्पित सेवेनंतर आज होणार सेवानिवृत्त**



## महत्वाचे...

### मुख्यमंत्री फडणवीस यांच्या सभेची तयारी

**अक्कलकोट दि.२८ नोव्हेंबर**
अक्कलकोट, मैंदर्गी आणि दुधनी नगरपरिषद निवडणुकीच्या प्रचारार्थ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची जाहीर सभा आयोजित केली असून यानिमित्त मंगरूळे हायस्कूल शेजारील पटांगण येथे वाटरप्रूफ मंडप उभारण्याच्या कामाची जय्यत तयार करण्यात येत आहे. अक्कलकोटमध्ये भाजपकडून नगराध्यक्षपदासाठी मिलन कल्याणशेट्टी, मैंदर्गीमध्ये अंजली बाजारमठ आणि दुधनीमध्ये अतुल मेळकुंदे यांच्या प्रचारानिमित्त अक्कलकोट येथील मंगरुळे प्रशालेजवळ मैदानामध्ये सकाळी साडेदहा वाजता ही जाहीर सभा होणार आहे. अक्कलकोट तालुक्याच्या विकासाचा दृढ संकल्प आणि भारतीय जनता पक्षाचे विकासाचे धोरण नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी ही सभा महत्त्वपूर्ण ठरणार आहे. त्यामुळे सर्वांनी मोठ्या संख्येने या जाहीर सभेस उपस्थित राहावे असे आवाहन आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी केले आहे.





### सांगोल्यात ५८ जणांचे रक्तदान

**सांगोला, दि.२८ नोव्हेंबर**
सांगोल्यातील शहीद जवान सामाजिक संस्थेच्या वतीने २६/११ दिन व संविधान दिनाच्या निमित्ताने शहरातील नेहरू चौक येथे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात ५८ रक्तदात्यांनी रक्तदान करून शहिदांना श्रद्धांजली अर्पण केली. रक्तदान शिबिराचे उद्घाटन वीरपत्नी शितल वाघमोडे, मंगल आदलिंगे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शहीद जवानांच्या प्रतिमेचे पूजन बापूसाहेब ठोकळे, माजी सैनिक उत्तम चौगुले, संगिता चौगुले, माजी सैनिक निम्रगे, आनंद व्हटे, रमेश फुले, अरविंद केदार, शिवाजी इंगोले, राजेंद्र यादव, वसंतराव फुले यांच्या उपस्थित करण्यात आले. याप्रसंगी अमर रहे अमर रहे, वीर जवान अमर रहे, भारत माता की जय, वंदे मातरम अशा घोषणा देऊन शहीदांचे स्मरण करण्यात आले. यावेळी सांगोला तालुक्यातील शहीद झालेले जवान व सर्व महापुरुषांचे फलक लावण्यात आले होते. रक्तदान शिबिर प्रसंगी गजानन बनकर, सोमेश यावलकर, सुरेश माळी, सुरेश फुले, माजी सैनिक संस्थेचे अध्यक्ष रवींद्र मराळ, संतोष ऐवळे, विश्वजीत फुले, दत्तात्रय नवले, रावसाहेब गायकवाड, सिताराम महिमकर, प्रसाद फुले, महेश बनकर यांनी भेटी देवून संस्थेच्या कार्याचे कौतुक केले. प्रास्ताविक अच्युत फुले व आभार प्रदर्शन बिरुदेव मासाळ यांनी केले. सदर शिबिर यशस्वी करण्यासाठी संतोष महिमकर, महादेव दिवटे, आभिषेक फुले, आजित जाधव यांनी परिश्रम घेतले.

## निधन वार्ता...

### ज्ञानेश्वर सावंत



**सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर-**
येथील धर्मशी लाईन एसटी स्टँड जवळील रहिवासी ज्ञानेश्वर रघुनाथ सावंत (वय ६८) यांचे गुरुवारी दुपारी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, नातवंडे, भाऊ, बहीण असा मोठा परिवार आहे. सोलापूर जिल्हा न्यायालयजवळील राम कृष्ण हरी टायपिंग सेंटरचे ते मालक होते. त्यांच्या पार्थिवावर पुणे नाका येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

### ॲड.विलास काळे



**सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर-**
केंद्र शासनाच्या खादी ग्रामोद्योग विभागातील सेवानिवृत्त अधिकारी व कासेगाव (ता.दक्षिण सोलापूर) येथील रहिवाशी ॲड. विलास नारायण काळे (वय-६५) यांचे सोमवारी दि.२४ नोव्हेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, विवाहीत मुलगी, जावई, नातवंडे, भाऊ, बहिण असा परिवार आहे.

### रमेश पावले



**सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर-**
राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ते राहुल रमेश पावले यांचे वडील रमेश पावले (वय ६८) यांचे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सायंकाळी लिंगायत स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

## प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी भाजपाला विजयी करा : भीमराव शेळके

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि २८ नोव्हेंबर**
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली अक्कलकोट शहराच्या विकासाची मोठी कामे चालू आहेत. तीर्थक्षेत्र विकासाचे स्वप्न पुर्ण करण्यासाठी अक्कलकोट शहराच्या विकासासह प्रभाग क्रमांक एकच्या सर्वांगीण विकासासाठी भाजपा नगराध्यक्षपदाचे उमेदवार मिलन कल्याणशेट्टी प्रभाग १ चो उमेदवार सुनंदा स्वामी व भिमराव उर्फ तम्मा शेळके यांना प्रचंड मताने विजयी करावे असे आवाहन भाजपाचे उमेदवार भीमराव उर्फ तम्मा शेळके यांनी केले आहे. प्रभाग क्रमांक एक मधून भाजपाने भीमराव उर्फ तम्मामामा शेळके व सुनंदा स्वामी यांना उमेदवारी दिली आहे. भाजपाचे उमेदवार भीमराव शेळके यांनी आवाहन करताना म्हणाले की, अक्कलकोट शहराचा विकास हा झपाट्याने सुरू आहे.



आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी अथक परिश्रम करून शासनाकडून कोट्यावधी रुपयांचा निधी आणला आहे. शहरात नवीन पाण्याची पाईपलाईन टाकणे, ड्रेनेजची नवीन पाईप टाकणे, बस स्थानकाची नूतन इमारत बांधणे, श्री मल्लिकार्जुन मंदिराची उभारणी, रस्ते विकास ही कामे सुरू आहेत. अक्कलकोट शहराच्या सर्वांगीण विकासासाठी भाजपाचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार मिलन कल्याणशेट्टी तसेच प्रभाग क्रमांक एक मधील भाजपाचा उमेदवार म्हणून मी उभा आहे. तसेच सुनंदा स्वामी या प्रभाग क्रमांक एक अ मधून उभ्या आहेत. प्रभाग क्रमांक एकच्या सर्वांगीण विकासासाठी भाजपाला मत देऊन विजयी करावे असे आवाहन भीमराव उर्फ तम्मामामा शेळके यांनी केले.

## बस वाहकाला मारहाण; दोघांविरुध्द गुन्हा

**बार्शी, दि.२८ नोव्हेंबर-**
बार्शी बसस्थानक परिसरात गुरुवारी दुपारी राज्य परिवहनच्या बसमधील वाहकाला प्रवाशांकडून मारहाण, शिवीगाळ व धमकावल्याची घटना घडली. याबाबत बार्शी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

फिर्यादी मधुकर विष्णू बागुल (वय ३१, नोकरी-वाहक, नारायणगाव एस.टी. आगार) यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे, नारायणगाव बार्शी-नारायणगाव या नियमित फेऱ्यांमध्ये एमएच १४ एलएक्स ८८५१ या बसने सेवा देत असताना बार्शी एस. टी. स्टॅण्ड येथे प्रवासी उतरत असतानाच दोन इसमांनी फिर्यादीस शिवीगाळ करुन मारहाण केली. प्रवासी चढताना लांब जाणाऱ्या प्रवाशांना प्रथम बसू द्या, असे सांगितल्यावर, सोमनाथ चंद्रशेखर खुडे (रा. लहुजी चौक, सुभाषनगर, बार्शी) व सूरज चंद्रशेखर खुडे (रा. माजीवाडा, साईनाथनगर, ठाणे वेस्ट) यांनी फिर्यादी वाहकाला अर्वाच्च शिवीगाळ करत हाताने चापट मारली, धक्काबुक्की केली व तुझे हातपाय काढीन, तू महाराष्ट्रात कशी नोकरी करतोस ते बघतो, अशी धमकी दिली.

घटनेदरम्यान प्रवाशांकडून गोळा केलेल्या तिकीट रकमेतील ३००० रुपयांची रक्कम गहाळ झाल्याची नोंद फिर्यादीने केली आहे. कंट्रोल रूमवरील काथवटे यांनी दोन्ही संशयित आरोपी प्रवाशांना समजावण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांचा अरेरावीपणा कायम राहिल्याने एस.टी. स्टॅण्डवरील ड्युटीवरील पोलिसांना बोलविण्यात आले. वरिष्ठांशी चर्चा करून फिर्यादी वाहकाने तक्रार नोंदवली असून तपास बार्शी पोलिसांकडून सुरु आहे.

## विकासासाठी वंचित बहुजन आघाडीला विजयी करा : आंबेडकर

**अक्कलकोट, दि.२८ नोव्हेंबर-**
स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका या राजकीय कारकीर्दी ची सुरवात असते. निवडणुकीत निवडून येणारे प्रतिनिधी हे खऱ्या अर्थाने जनतेची सेवा करत असतात. यामुळे या निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने विजयी करावे जनतेची सेवा करण्याची संधी द्यावी असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते सुजात आंबेडकर यांनी केले. वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवार प्रियांका मडीखांबे आणि संजाबाई ठोंबरे यांच्या प्रचारार्थ भिमनगर अक्कलकोट येथे त्यांची जाहीर सभा झाली. यावेळी ते बोलत होते.





यावेळी राष्ट्रीय कार्यकारणी सदस्य डॉ. नितीन ढेपे, राज्य उपाध्यक्ष व जिल्हा निरीक्षक सोमनाथ साळुंखे, जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर मडीखांबे, युवक तालुकाध्यक्ष शिलामणी बनसोडे, तालुकाध्यक्ष विशाल ठोंबरे, कामगार संघटनेचे तालुकाध्यक्ष सिद्धार्थ बनसोडे, सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे रविराज पोटे, आतिश बनसोडे, सोलापूर शहराध्यक्ष प्रशांत गोणेवार, महासचिव विनोद इंगळे उपस्थित होते. पुढे बोलताना आंबेडकर म्हणाले, आपण निवडून दिलेले आमदार खासदार हे वर्षातून एकदाही मतदारांना तोंड दाखवीत नाहीत. जितका विकास आमदार खासदार करू शकत नाहीत तितका विकास हे स्थानिक स्वराज्य संस्थेमधील नगरसेवक करत असतात. आपल्या प्रभागातील विविध विकास कामे ही प्रामुख्याने नगरसेवकच करतात.

त्यामुळे येथे आपल्या विचाराचे उमेदवार असणे गरजेचे आहे. लबाड, चोरी करणाऱ्यांना घरी बसवास असे आवाहन त्यांनी केले. यावेळी डॉ. ढेपे, जिल्हाध्यक्ष मडीखांबे, राज्य उपाध्यक्ष साळुंखे यांचेही भाषण झाले.

## अकलूज बाजार समितीत मक्याला २४०० रु.हमीभाव; तर खासगी व्यापारी देतात फक्त १८०० रुपये

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव दि.२८ नोव्हेंबर-**
माळशिरस तालुक्यातील अकलूज येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये २४०० रुपये प्रतिक्विंटल या हमीभावाने मका खरेदी सुरू करण्यात आली आहे. तर खाजगी व्यापरी मात्र केवळ १८०० रूपये दर देत असल्याने शेतकऱ्यातून नाराजी व्यक्त होत आहे.

बाजार समितीसाठी शेतकऱ्यांनी ७,१२ उताऱ्यावर पिकाची नोंदणी व त्यावर क्षेत्रफळ, आधार कार्ड झेरॉक्स, आधार कार्ड लिंक असलेले बॅक खाते पासबुक झेरॉक्स, फार्मर आयडी, बायोमेट्रिक करण्यासाठी स्वत: शेतकऱ्यांनी हजर राहणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांचा मोबाईल नंबर तर शासनाने ठरवुन दिलेल्या निकषानुसारच एफ.ए.क्यु दर्जाची मका खरेदी करण्यात येणार आहे. बाजार समीतीने उपकेंद्र पिलीव, माळशिरस व तालुक्यातील इतर मोठ्या गावात सदरची हमीभाव मका खरेदी केंद्रे सुरू करुन न्याय द्यावा अशी मागणी मका उत्पादक शेतकऱ्यांमधुन होत आहे. दरम्यान शासनाचा मकेचा हमीभाव हा २४०० रुपये आहे. यामुळेच खाजगी व्यापाऱ्यांचे पितळ उघडे पडले आहे. पिलीव येथील व्यापारी सध्या चांगल्या प्रतीची मका फक्त १८०० रुपये क्विंटल या दराने खरेदी करीत आहेत. क्विंटल मागे ६०० रुपयांची लूट खाजगी व्यापारी करत आहेत. किती मोठी दराबाबत तफावत मग शासनानेच यावर तोडगा काढून बाजार समितीमार्फत तालुक्यातील सर्व मोठ्या गावात सदरची मका हमीभाव केंद्रे सुरू करुन शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अशी मागणी तालुक्यातील मका उत्पादक शेतकऱ्यांमधुन होत आहे. बाजार समितीने फक्त अकलूज येथे हमीभावाने मका खरेदी न करता तालुक्यातील त्यांच्या पिलीव, माळशिरस, नातेपुते, वेळापूर, माळीनगर, श्रीपुर याठिकाणी जर सदरची मका हमीभाव केंद्रे सुरू केली तर शेतकऱ्यांचा चांगला फायदा होईल तसेच खाजगी व्यापाऱ्याकडून होणारी लुट थांबुन शेतकऱ्यांना चांगला दर मिळेल.

> माळशिरस तालुक्यात मका हमीभाव केंद्र नसल्यामुळे खाजगी व्यापाऱ्याकडून शेतकऱ्यांची अक्षरश लुट केली जात आहे. यामुळे दरातील तफावत लक्षात येईल तसेच शेतकऱ्यांना दराबाबत न्याय मिळेल.
> **- सुखदेव लेंगरे, मका उत्पादक शेतकरी, कुसमोड.**

## अक्कलकोट नगरपरिषद नगराध्यक्षपदासाठी सहा उमेदवार रिंगणात













**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२८ नोव्हेंबर-**
अक्कलकोट नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीत नगरसेवक पदासाठीच्या २५ जागांपैकी अकरा जागा महिला प्रवर्गासाठी आरक्षण असून ४० महिला उमेदवार हे निवडणुकीत नशीब आजमावित आहेत. थेट नगराध्यक्ष पदासाठी सहा उमेदवार रिंगणात असून एकही महिला उमेदवाराचा समावेश नाही.

अक्कलकोट नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत एकूण बारा प्रभाग असून नगरसेवक पदाच्या २५ जागा आहेत. यातील ११ जागा या ओबीसी, एससी, खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी राखीव आहेत. नगरसेवक पदासाठी एकूण ७६ उमेदवार हे निवडणुकीच्या रिंगणात आहेत.थेट नगराध्यक्ष पदासाठी सहा जण हे निवडणूक लढवत आहेत. विविध प्रभागातील ११ जागांसाठी विविध पक्षांकडून ४० महिला उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. तर नगराध्यक्ष पदासाठी भारतीय जनता पार्टी तर्फे मिलन कल्याणशेट्टी, काँग्रेस कडून अशपाक बळोर्गी, शिवसेना शिंदे गटातर्फे रईस टिनवाला, शिवसेना ठाकरे गटातर्फे बाबासाहेब जाधव, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटातर्फे इक्रार शेख, अपक्ष म्हणून नागनाथ उमदी हे निवडणुकीच्या मैदानात आहेत.

अक्कलकोट नगरपरिषद **प्रभाग क्रमांक एक अ** सुनंदा स्वामी (भारतीय जनता पार्टी) कौसर नदाफ (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस) राजश्री बोलदे (शिवसेना शिंदे गट) **प्रभाग क्रमांक एक ब** भीमराव शेळके (भारतीय जनता पार्टी) गुरुपादप्पा गुब्याड (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस) राहुल चव्हाण (शिवसेना शिंदे गट) सिकंदर चाऊस (अपक्ष) **प्रभाग क्रमांक दोन अ** कस्तुरा चौगुले (भारतीय जनता पार्टी) विजयालक्ष्मी आळवीकर (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस) शकुंतला चौगुले (शिवसेना शिंदे गट) **प्रभाग क्रमांक दोन ब** लक्ष्मीकांत धनशेट्टी (भारतीय जनता पार्टी) श्रीशैल गंगनगोंडा (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस) मंगेश जाधव (शिवसेना शिंदे गट) **प्रभाग क्रमांक तीन अ** मुस्तफा गवंडी (भारतीय जनता पार्टी) मुस्तफा बळोरगी (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस) **प्रभाग क्रमांक तीन ब** रेश्मा शेख (भारतीय जनता पार्टी)जाहिराबी शेख (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस) पुतळाबाई शिरसागर (शिवसेना शिंदे गट) **प्रभाग क्रमांक चार अ** अविनाश मडीखांबे (भारतीय जनता पार्टी) राहुल मोरे (शिवसेना शिंदे गट) नागेश हरवाळकर (अपक्ष) **प्रभाग क्रमांक चार ब** मंजना कामनूरकर (भारतीय जनता पार्टी) रखमाबाई शापवाले (शिवसेना शिंदे गट) विद्या माळी (अपक्ष) **प्रभाग क्रमांक पाच अ** रेणुका राठोड (भारतीय जनता पार्टी )सुस्मिता अळोळी (शिवसेना शिंदे गट)नसरीन बागवान (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी)**प्रभाग क्रमांक पाच ब** रमेश कापसे (भारतीय जनता पार्टी) सय्यद मुजम्मिल पाशा पिरजादे (शिवसेना शिंदे गट) सौरभ लांडगे (राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट) सैपन शेख (एम आय एम) **प्रभाग क्रमांक सहा अ** अपर्णा शिंदे (भारतीय जनता पार्टी) जयश्री फुलारी (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस) गंगाबाई इसापुरे (शिवसेना शिंदे गट ) **प्रभाग क्रमांक सहा ब** यशवंत धोंगडे ( भारतीय जनता पार्टी )सिद्धाराम आळगी (शिवसेना शिंदे गट) **प्रभाग क्रमांक सात अ** नवीद डांगे (भारतीय जनता पार्टी) रजाक बागवान (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस) नुरूद्दीन बागवान (शिवसेना शिंदे गट ) **प्रभाग क्रमांक सात ब** अमृता शिंदे (भारतीय जनता पार्टी) मीनाक्षी सूर्यवंशी (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस) फरियाशाजनीन टिनवाला (शिवसेना शिंदे गट) जन्नतबी बागवान (अपक्ष) **प्रभाग क्रमांक आठ अ** शैला स्वामी (भारतीय जनता पार्टी) शोभा इचगे ( शिवसेना शिंदे गट) **प्रभाग क्रमांक आठ ब** महेश हिंडोळे (भारतीय जनता पार्टी) आकाश शिंदे (शिवसेना शिंदे गट) रवींद्र डोके (शिवसेना ठाकरे गट) **प्रभाग क्रमांक ९ अ** स्नेहा खवळे (भारतीय जनता पार्टी) आरती पारखे (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस) पुतळाबाई शिरसागर (शिवसेना शिंदे गट) नाजीन होटकर (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी) संजाबाई ठोंबरे (वंचित बहुजन आघाडी) **प्रभाग क्रमांक ९ ब** सद्दाम हुसेन शेरीकर (भारतीय जनता पार्टी )शकील खिस्तके (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस) राहुल भकरे (शिवसेना शिंदे गट )देवेंद्र शिंदे (शिवसेना ठाकरे गट) **प्रभाग क्रमांक दहा अ** सोनाली शिंदे (भारतीय जनता पार्टी) हर्षदा पाटील (शिवसेना शिंदे गट) **प्रभाग क्रमांक दहा ब** देविदास कवटगी (भारतीय जनता पार्टी ) सिद्धलिंग लाळशेरी ( शिवसेना शिंदे गट ) अक्षय सोमवंशी (अपक्ष) **प्रभाग क्रमांक ११ अ** आरती गायकवाड (भारतीय जनता पार्टी) सरिता कुरले ( शिवसेना शिंदे गट) प्रियांका मडीखांबे (वंचित बहुजन आघाडी) **प्रभाग क्रमांक ११ ब** महेश इंगळे (भारतीय जनता पार्टी) मुबारक कोरबू (शिवसेना शिंदे गट) किरण किरात (शिवसेना ठाकरे गट) **प्रभाग क्रमांक १२ अ** ऋतुराज राठोड (भारतीय जनता पार्टी) अशितोष राठोड (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस) **प्रभाग क्रमांक १२ ब** भागुबाई कुंभार (भारतीय जनता पार्टी) कमलाबाई राठोड (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस) ताराबाई कुंभार (शिवसेना शिंदे गट) **प्रभाग क्रमांक बारा क** अल्फिया कोरबू (भारतीय जनता पार्टी) सायराबानू कोरबू (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस ) रवीना राठोड (शिवसेना शिंदे गट) अक्कलकोट नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत थेट नगराध्यक्ष पदासाठी बहुरंगी लढत आहे. तर २५ नगरसेवक पदांसाठी विविध ठिकाणी दुरंगी तर काही ठिकाणी तिरंगी लढत आहे. या निवडणुकीची चर्चा चांगलीच रंगली असून विविध पक्षाच्या उमेदवाराने प्रचारासाठी कंबर कसल्याचे दिसून येत आहे.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# रा.स्व.संघाचे ज्येष्ठ मार्गदर्शक सदाशिव देवधर यांनी केले ‘राष्ट्रयज्ञ के सौ वर्ष’ या विशेषांकाचे मुक्तकंठाने कौतुक

## दै.तरुण भारतच्या वतीने करण्यात आले प्रकाशित

**तभा वृत्तसेवा | महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर,दि.२८ नोव्हेंबर-**

रा.स्व.संघ अर्थात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कारकीर्दीस शंभर वर्षे पूर्ण झाल्याबद्दल दैनिक सोलापूर तरुण भारतच्या वतीने नुकताच राष्ट्रयज्ञ के सौ वर्ष या विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले. रा.स्व. संघाचे राष्ट्रीय पातळीवरील ज्येष्ठ मार्गदर्शक श्री.सदाशिव उर्फ सदुभाऊ देवधर यांनी या विशेषांकाचे मुक्तकंठाने कौतुक केले.

दैनिक सोलापूर तरुण भारतचे संपादक प्रशांत माने यांनी शुक्रवारी (ता.२८) श्रीक्षेत्र पंढरपूर येथील सदाशिव देवधर यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. या भेटीत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शंभर वर्षाच्या कारकिर्दीवर चर्चा झाली. या शंभर वर्षाच्या कार्यकाळातील काही जुन्या आठवणींना श्री.देवधर यांनी उजाळा दिला. राष्ट्रीय स्वयंसवेक संघातील सुरुवातीच्या काळापासून ज्या ज्या ठिकाणी सेवाकार्य करण्याची संधी मिळाली. त्या त्या ठिकाणी त्या त्या काळात ज्या ज्या महान व्यक्तींचा सहवास लाभला. त्या-त्या वेळी आलेले अडचणी आणि त्या त्या अडचणींवर मात करत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची पाळेमुळे रुजविण्यात आलेले अनुभवही त्यांनी कथन केले.


याप्रसंगी दैनिक सोलापूर तरुण भारतचे विपणन विभागाचे मुख्य प्रबंधक मनोहर बायनी, वितरण विभागाचे प्रमुख नागसेन शिवशरण, पंढरपूर विभागाचे प्रतिनिधी महेश भंडारकवठेकर, दैनिक सोलापूर तरुण भारतचे पंढरपूर येथील एजंट संतोष कुलकर्णी यांच्यासह देवधर परिवार आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक उपस्थित होते.

### साधी राहणी अन् संघाविषयीची निष्ठा

रा.स्व.संघाचे ज्येष्ठ मार्गदर्शक श्री.सदाशिव उर्फ सदुभाऊ देवधर यांची अत्यंत साधी राहणी असून केलेल्या कामाबद्दलचा त्यांना कोणताही अहंभाव नाही. या वयात देखील रा.स्व.संघाविषयीची निष्ठा, आत्मियता, प्रेम आणि तल्लखबुध्दी तसेच त्यांच्याकडे असलेला माहिती खजिना अवर्णनीय म्हणावा लागेल.

### नियमितपणे घेत असतात माहिती

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे राष्ट्रीय पातळीवरील ज्येष्ठ मार्गदर्शक सदुभाऊ देवधर हे वृध्दापकाळाने आता पंढरपूर येथील निवासस्थानीच वास्तव्यास असतात. तब्येतीच्या कारणामुळे पहिल्यासारखे झोकून देवून कार्य होत नाही. मात्र रा.स्व.संघाच्या रोजच्या घडामोडींची माहिती ते नियमितपणे घेत असतात.



### विशेषांकाच्या निर्मितीबद्दल धन्यवाद

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आपली शंभर वर्षाची वाटचाल पुढच्या वर्षी पूर्ण करीत आहे. त्यानिमित्त दैनिक सोलापूर तरुण भारतच्या वतीने राष्ट्रयज्ञ के सौ वर्ष या नावाने विशेषांक काढण्यात आला. सदर विशेषांक श्री.सदाशिव देवधर यांना दिले असता त्यांनी कुतुहलाने पाहणी करुन विशेषांकाच्या निर्मितीबद्दल दैनिक सोलापूर तरुण भारत व्यवस्थापनास धन्यवाद दिले.

### देशभरातील कार्यकर्ते पंढरीत येत असतात

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, भारतीय जनता पार्टी यांसह संघ परिवारातील विविध संस्था-संघटनांचे देशभरातील पदाधिकारी, कार्यकर्ते हे ज्येष्ठ मार्गदर्शक सदाशिव देवधर यांच्या पंढरपूर येथील निवासस्थानी भेट घेण्यासाठी आवर्जून येत असतात.

### पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही घेतली आवर्जून भेट

मध्यंतरीच्या काळात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ज्येष्ठ मार्गदर्शक श्री.सदाशिव देवधर यांना दिल्ली येथे खास निमंत्रण पाठवुन बोलावून घेऊन आवर्जुन त्यांची भेट घेतली होती. या भेटी दरम्यान पंतप्रधानांनी श्री.देवधर यांच्या तब्येतीची विचारपूस करुन त्यांच्या बरोबर विविध विषयांवर चर्चा देखील केलेली होती.

### चरणस्पर्श आणि निमंत्रण

रा.स्व.संघाचे ज्येष्ठ मार्गदर्शक श्री.सदाशिव देवधर हे महनीय व्यक्ती म्हणून गणले जातात. अशा महनीय व्यक्तींच्या भेटीमुळे आपण धन्य झालो, असे सांगत दैनिक सोलापूर तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने यांनी श्री.देवधरांचे चरणस्पर्श करुन दर्शन घेतले. तसेच सोलापूर येथील दैनिक तरुण भारतच्या नवीन कार्यालयास भेट देण्याविषयी आग्रहाचे निमंत्रण दिले.

---

नगरपालिका निवडणुकीची धामधुम

## पक्षप्रमुखांच्या वक्तव्यांविषयीच्या चर्चांना उधाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ नोव्हेंबर-**

सोलापूर जिल्ह्यातील अनगरसह मोहोळ, बार्शी, अक्कलकोट, पंढरपूर, मंगळवेढा, करमाळा, अकलूज, मैंदर्गी, दुधनी, सांगोला, कुर्डुवाडी या नगरपालिकांच्या निवडणुकीची धामधुम सुरु आहे. तर दुसरीकडे त्या त्या पक्षसंघटनेचे स्थानिक पातळीवरील नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते करीत असलेल्या विविध वक्तव्यांविषयीच्या चर्चांना वाड्यावस्त्यांवरील गप्पांमधून उधाण आले आहे. दैनिक सोलापूर तरुण भारतने सोलापूर जिल्ह्यातील विविध पक्षसंघटनांच्या प्रमुखांना बोलते करण्याचा प्रयत्न केला. त्यानुसार कालरोजी भाजपाचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष वसंतनाना देशमुख यांच्या मुलाखती छापण्यात आल्या. आजरोजी शिवसेना शिंदे गटाचे अमोल शिंदे, शिवसेना उबाठाचे संतोष पाटील, दत्तात्रय गणेशकर यांच्या प्रतिक्रिया जाणून घेण्यात आल्या.

## दुर्दैवाने प्रमुख लढत ही भाजपसोबतच

**तभा वृत्तसेवा | मकरंद ढोबळे**
**सोलापूर, दि.२८ नोव्हेंबर-**



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा नुकताच सोलापूर जिल्हा दौरा झाला. या दौऱ्यामुळे नगरपालिका निवडणुक लढण्यासाठी आम्हाला मोठी ताकद मिळाली आहे. मोहोळ मतदार संघात नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत शिवसेना जिंकेल. सांगोला, करमाळा याठिकाणी एकहाती निवडणूक जिंकू. दुधनी हा माजी मंत्री सिध्दाराम म्हेत्रे यांचा बालेकिल्ला आहे. त्यामुळे तीही निवडणूक जिंकू. अक्कलकोटमध्ये जोरदार लढत असली तरी शंभर टक्के निवडणूक आम्हीच जिंकू. काही ठिकाणी आम्ही भाजपबरोबर असलो तरी दुर्दैवाने आमची प्रमुख लढत ही ज्यांचं काम लोकसभेत केलं. त्या भारतीय जनता पार्टीशी आहे. लाडक्या बहिणींचा भाऊ, एकनाथ शिंदे यांनी केलेलं काम हे त्यांच्या लक्षात आहे. एकनाथ शिंदेंचा धाडसीपणा, निर्णय घेण्याची क्षमता या सर्वांचा फायदा शिवसेनेच्या उमेदवाराला होईल, असे शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अमोल शिंदे यांनी सांगितले.

## शिवसेना उबाठाला चांगले वातावरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ नोव्हेंबर -**



मंगळवेढा, बार्शी, मोहोळ, अक्कलकोटमध्ये शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार निवडून येतील. नगरपालिका निवडणुकीमध्ये प्रमुख लढत ही भाजपाबरोबर आहे. बार्शी, कुर्डुवाडी आणि मोहोळ या तीन नगरपंचायतींवर भगवा फडकेल. शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाला वातावरण चांगले आहे. आमच्या पक्षाचे उमेदवार निवडून येतील, असा विश्वास शिवसेना उबाठा गटाचे उपजिल्हाप्रमुख दत्तात्रय गणेशकर यांनी व्यक्त केला.

## धनदांडग्या उमेदवारांच्या विरोधात लढाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ नोव्हेंबर-**



सध्या सत्ताधाऱ्यांच्या विरोधात वातावरण आहे. अक्कलकोटचा विकास ज्या पध्दतीने व्हायला पाहिजे तसा झाला नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये मोठा रोष आहे. त्याचाच फायदा शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाला होईल. धनदांडग्या उमेदवारांच्या विरोधात शिवसैनिकांची लढाई आहे. शिवसेना उबाठा पक्षाची प्रमुख लढत ही भारतीय जनता पार्टी बरोबरच आहे, असे शिवसेना उबाठाचे जिल्हाप्रमुख संतोष पाटील यांनी सांगितले.

---




| अ. क्र. | विद्यार्थ्यांची नावे | शाळेचे नाव |
|---|---|---|
| १ | सोम्या सराटी | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| २ | आलिया नदाफ | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ३ | प्रथमेश कदम | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ४ | मधुमाला घोडके | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ५ | कार्तिकी फुलमाळी | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ६ | आयुष अंकुशे | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ७ | भूषण इंगळे | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ८ | परिवर्तन मस्के | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ९ | श्रीकाश वलपा | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| १० | स्नेहा बिराजदार | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ११ | गौरी गायकवाड | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| १२ | योगिराज स्वामी | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| १३ | रूद्र राठोड | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| १४ | परिक्षित कोरचगाव | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| १५ | दुर्वा भोसले | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| १६ | श्रीनिधी शिंपी | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| १७ | प्रिया हांडे | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| १८ | सुहानी तानवडे | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| १९ | ऋतुजा हांडे | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| २० | यशराज सूर्यवंशी | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| २१ | जय कापसे | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| २२ | वरद बडगू | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| २३ | रूपेश अवधूत | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| २४ | अनिकेत तळभंडारे | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| २५ | शाहिश्री शेरखाने | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |

| अ. क्र. | विद्यार्थ्यांची नावे | शाळेचे नाव |
|---|---|---|
| २६ | भुषण राजकुमार | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| २७ | शौर्य राठोड | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| २८ | पृथ्वी पवार | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| २९ | असद मुजीद | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ३० | राजवीर खांडेकर | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ३१ | अमेय काटकर | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ३२ | सिद्धी जखनाईक | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ३३ | यश काकडे | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ३४ | अथर्व हुक्कीरे | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ३५ | अथर्व पाटील | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ३६ | सार्थक शिंदे | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ३७ | श्रीनाथ सुरवसे | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ३८ | श्रेयस नवले | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ३९ | तेजश्री भोसले | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ४० | श्रीनिवास कोळी | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ४१ | मेघराज बिराजदार | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ४२ | विवान राठोड | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ४३ | देवयानी वाघमोडे | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ४४ | चिन्मय नागुरे | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ४५ | अनुष्का क्षीरसागर | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ४६ | प्रांजल पाटील | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ४७ | प्रज्ञा माने | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ४८ | सेजल माळी | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ४९ | नारायणी बाबर | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ५० | विनायक मोहिते | भारती विद्यापीठ, सोलापूर |

| अ. क्र. | विद्यार्थ्यांची नावे | शाळेचे नाव |
|---|---|---|
| ५१ | समर्थ राठोड | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ५२ | आदित्य वाघमोडे | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ५३ | यश मनोरे | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ५४ | अथर्व जाधव | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ५५ | समर्थ हुळ्ळे | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ५६ | आरुषी कोळी | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ५७ | त्रिशा उंबरजे | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ५८ | रुतिका तुरुप | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ५९ | अभय शिंदे | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ६० | सुजित रोडगे | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ६१ | अनिकेत प्रधान | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ६२ | श्रीयश प्रधान | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ६३ | संस्कार शेळवणे | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ६४ | मोहम्मद शेख | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ६५ | आर्यन माळी | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ६६ | सार्थक राठोड | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ६७ | प्रणव करकंटी | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ६८ | आर्यन राठोड | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ६९ | ईशानी राठोड | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ७० | आरोही बंडगर | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ७१ | दुर्वा भोसले | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ७२ | श्रीनिधी शिंपी | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ७३ | प्रिया हांडे | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ७४ | सुहानी तानवडे | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ७५ | ऋतुजा हांडे | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |

| अ. क्र. | विद्यार्थ्यांची नावे | शाळेचे नाव |
|---|---|---|
| ७६ | युवराज कानघंट्टी | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ७७ | श्रेयश मडिवाळ | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ७८ | अनुज आरकेल | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ७९ | विवेक केत | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ८० | मनोज चौखंडे | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ८१ | आनंदी बंडगर | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ८२ | पौर्णिमा भडंगे | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ८३ | सुमित गायगवळी | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ८४ | माधुरी देशमुख | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ८५ | चनबसप्पा स्वामी | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ८६ | पुनम भांडेकर | जयभवानी प्रशाला, सोलापूर. |
| ८७ | मानसी शहापुरे | जयभवानी प्रशाला, सोलापूर. |
| ८८ | रोहन गायकवाड | जयभवानी प्रशाला, सोलापूर. |
| ८९ | संध्या पवार | जयभवानी प्रशाला, सोलापूर. |
| ९० | आलिया इनामदार | जयभवानी प्रशाला, सोलापूर. |
| ९१ | विद्या कापरे | जयभवानी प्रशाला, सोलापूर. |
| ९२ | दिशा बंदपट्टे | जयभवानी प्रशाला, सोलापूर. |
| ९३ | श्रद्धा पवार | जयभवानी प्रशाला, सोलापूर. |
| ९४ | तेजस्विनी बंदपट्टे | जयभवानी प्रशाला, सोलापूर. |
| ९५ | तेजस्वी भांडेकर | जयभवानी प्रशाला, सोलापूर. |
| ९६ | मधु कांबळे | जयभवानी प्रशाला, सोलापूर. |
| ९७ | स्नेहल सूर्यवंशी | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ९८ | मनोज कानगंटी | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ९९ | शिवप्रताप चिणवर | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| १०० | ओम डोळ्ळे | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## करजगाव शिवारात १३ वर्षीय मुलाचे अपहरण

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.२८ नोव्हेंबर -**

करजगाव शिवारात ३ ऑक्टोबर २०२५ रोजी अल्पवयीन मुलाचे अपहरण केल्याप्रकरणी लोहारा पोलीस ठाण्यात पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी बाळू वसंत भोजराव (वय ५२, रा. हिप्परगा सय्यद) यांनी २७ नोव्हेंबर रोजी तक्रार दाखल केली.



याबाबत माहिती अशी की, फिर्यादींच्या तक्रारीनुसार, त्यांच्या १३ वर्षीय मुलाला सागर बाळू भोजराव नागु पवार यांच्या शेतातील गोठ्यातून आरोपींनी जबरदस्तीने गाडीत बसवून नेले. आमच्या सोबत चल, नाहीतर जिवे मारू, अशी धमकी देत मुलाचे अपहरण करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे.

या प्रकरणी आरोपी नवनाथ कदम, शुभम नवनाथ कदम, सुमित्रा नवनाथ कदम (रा. सिरसदेवी, ता. गेवराई, जि. बीड), अभिषेक अशोक म्हस्के (रा. राक्षसभुवन, जि. बीड) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## संक्षिप्त वृत्त...



### तांदुळवाडी येथे महात्मा फुले स्मृती दिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम

**कळंब, दि.२८ नोव्हेंबर -**

कळंब तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, तांदुळवाडी येथे क्रांतीसूर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या १७५ व्या स्मृतीदिनानिमित्त कार्यक्रम आयोजित करून अभिवादन करण्यात आले. शाळेचे मुख्याध्यापक व राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक महासंघाचे राज्य सरचिटणीस संतोष भोजने यांनी महात्मा फुले यांच्या बहुआयामी कार्याची ओळख विद्यार्थ्यांना अत्यंत सोप्या शब्दांत करून दिली. सहशिक्षक संतोष मोहिते व आशा पवार यांनीही मार्गदर्शन केले. ऋजुता मोरे हिने फुले यांच्यावरील गीत सादर केले, तर संघरत्न राऊत आणि सार्थक धाबेकर यांनी भाषणे केली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सयाजी शिंदे, रसिका आगरकर आणि युवा प्रशिक्षणार्थी सुजाता कदम यांचे सहकार्य लाभले.



### पोदार इंटरनॅशनल स्कूलमध्ये वार्षिक क्रीडा दिन उत्साहात

**धाराशिव, दि.२८ नोव्हेंबर -**

पोदार इंटरनॅशनल स्कूल, धाराशिव येथे वार्षिक क्रीडा दिन मोठ्या उत्साहात साजरा झाला. प्रमुख पाहुणे सौम्यश्री किर्ती पुजार व पोदार हब लातूरचे जनरल मॅनेजर प्रसाद पोंक्षे यांचे ढोल-लेझीमच्या तालावर स्वागत करण्यात आले. प्राचार्य डॉ. वाल्मिक सोमासे यांच्या मार्गदर्शनाखाली टॉर्च रन व ध्वजारोहणाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. विद्यार्थ्यांनी धावणे, अडथळा शर्यत, स्लो सायकल अशा विविध स्पर्धांमध्ये सहभाग घेत कौशल्याचे प्रदर्शन केले. विजेत्यांना प्रशस्तीपत्रे व बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे नियोजन कार्यक्रमाधिकारी अंकुश दीपक यांनी, तर सूत्रसंचालन स्वाती वाकेकर यांनी केले. क्रीडाशिक्षक विवेक महाजन, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व बस स्टाफ यांनी उत्साहाने योगदान दिले. पालकांची उपस्थितीही लक्षणीय होती.



### महात्मा फुले युवा मंचतर्फे स्मृतीदिन साजरा

**लोहारा, दि.२८ नोव्हेंबर -**

लोहारा शहरातील शिवनगर येथे महात्मा फुले युवा मंच, लोहारा यांच्या वतीने क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांचा १३५ वा स्मृतीदिन श्रद्धापूर्वक साजरा करण्यात आला. सेवानिवृत्त शिक्षक अशोक माळी हिप्परगा यांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाला नगरसेवक अविनाश माळी, व्हा. चेअरमन राम क्षिरसागर, संजय देरेकर, सतिश माळी, माजी नगरसेवक श्रीनिवास माळी, माजी ग्रा.प. सदस्य पंडित क्षिरसागर तसेच महात्मा फुले युवा मंचाचे अध्यक्ष सचिन माळी यांसह मोठ्या संख्येने समाज बांधव उपस्थित होते.



### डॉ. शिवाजी जेटीथोर यांचा सत्कार

**तुळजापूर, दि.२८ नोव्हेंबर -**

येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. शिवाजी जेटीथोर मार्गदर्शक म्हणून उत्कृष्ट काम करत असल्यामुळे बालाघाट शिक्षण संस्थेचे सचिव उल्हास बोरगावकर यांच्या हस्ते शाल, बुके देऊन सत्कार करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर अंतर्गत विद्यार्थी डॉ. सचिन मोहनराव घाटे (प्राणीशास्त्र) आणि शिवतेज संभाजीराव भोसले (राज्यशास्त्र) या विषयात पीएच.डी. पदवी संपादन केली. याविषयी डॉ. शिवाजी जेटीथोर यांनी विशेष मार्गदर्शन केले होते. सत्कार प्रसंगी उपप्राचार्य डॉ. प्रविण भाले, प्रा.जी.व्ही. पाटील, प्रा. संभाजी भोसले, प्रा.डॉ. अमोद जोशी यांची उपस्थिती होती.

### नळदुर्ग परिसरात अज्ञात पुरुषाचा खून

**नळदुर्ग, दि.२८ नोव्हेंबर -**

फुलवाडी शिवारातील पोगल सुतमील इमारतीलगत असलेल्या शंकरराव बोरकर यांच्या पडिक शेतात अनोळखी पुरुषाचा (वय अंदाजे ३५-४० वर्षे) अर्धवट जळालेला मृतदेह आढळला. हि घटना दि. १९ नोव्हेंबर रोजी ११ वा. पूर्वी घडली असून, अज्ञात आरोपीने त्या व्यक्तीच्या डोक्यात मारहाण करून खून केला व पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह जाळल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. याबाबतची फिर्याद दिलीप राठोड यांनी दि.२७ नोव्हेंबर रोजी नोंदवली आहे.

### तुळजापूर नगर परिषद निवडणूकीत राजकीय वातावरण तापले...

# प्रचारात काँग्रेसच्या उमेदवार अमर मगर यांचा डिजिटल बॅनर फाडला




**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२८ नोव्हेंबर -**

तुळजापूर नगरपरिषद निवडणुकीच्या प्रचाराला वेग येत असताना काँग्रेसचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार अमर अशोकराव मगर यांच्या प्रचाराचे डिजिटल बॅनर फाडल्याची घटना समोर आली आहे. या संदर्भात ऋषिकेश मगर यांनी पोलीस निरीक्षक अण्णासाहेब मांजरे यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे.

तक्रारीत त्यांनी म्हटले आहे की, प्रभाग क्र. ६ आराधवाडी परिसरात उमेदवार अमर मगर यांचा प्रचारासाठी लावण्यात आलेला डिजिटल बॅनर अज्ञात व्यक्तीने

### हेतुपुरस्सर बॅनर फाडल्याचा विरोधांवर आरोप...

मुद्दाम फाडल्याचे आढळून आले. निवडणूक प्रचाराच्या पार्श्वभूमीवर ही कृती हेतुपुरस्सर करण्यात आल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा त्वरीत तपास करून बॅनर फाडणाऱ्या अज्ञात व्यक्तीचा शोध घेऊन त्याच्यावर कडक कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी महाविकास आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी केली आहे. निवडणुकीच्या काळात घटनेमुळे परिसरातही संतापाची भावना व्यक्त होत असून, प्रचारात मतभेद असले तरी अशी विध्वंसक कृती लोकशाही प्रक्रियेला बाधा आणणारी असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

तक्रार दाखल झाल्यानंतर पोलीसांनी घटनास्थळाला भेट देऊन पाहणी केली असून परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्याचे काम सुरू केले आहे. प्रशासनाकडून निष्पक्ष तपास होईल व दोषींवर योग्य ती कारवाई केली जाईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## सिमुरगव्हाणमध्ये ४ डिसेंबरला श्री दत्तजयंती वारी उत्सव; सोहळ्याची तयारी पूर्ण

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२८ नोव्हेंबर -**

सिमुरगव्हाण (जि. परभणी) येथे राम ानंदाचार्यांच्या दक्षिणपीठ नाणीजधामच्या उपपीठावर दि.४ डिसेंबर २०२५ रोजी श्री दत्तजयंती वारी उत्सवाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. मराठवाडा पीठ प्रमुख जयप्रकाश लोणारी, सहप्रमुख विजय देशपांडे आणि व्यवस्थापक सुरेश मोरे यांनी प्रसिध्दी प्रमुख विलास मुळीक यांच्या मार्फत ही माहिती दिली.

संस्थानामार्फत ग्रामस्वच्छता, मोफत इंग्रजी माध्यम शाळा, वेदपाठशाळा, मोफत दवाखाना, देहदान-अवयवदान प्रबोधन, ५३ रुग्णवाहिकांची मोफत सेवा, महिलांसाठी सक्षमीकरण उपक्रम, कायदेविषयक शिबिरे, रक्तदान मोहिमा आणि वृक्षारोपण अशा अनेक सामाजिक उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी केली जाते. यंदा उत्सवानिमित्त गरीब विद्यार्थ्यांना मोफत सायकल वाटप करण्यात येणार आहे.

संध्याकाळी जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांचे अमृतमय प्रवचन आयोजित असून भाविकांसाठी २४ तास महाप्रसादाची सोय केली आहे. सर्व पदाधिकारी, साधक, भक्त व नागरिकांनी कुटुंबासह उपस्थित राहून दर्शन व प्रवचनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन समितीने केले आहे.

## सैराट फेम 'परश्या' तुळजाभवानीच्या चरणी

### आकाश ठोसरने घेतले आई तुळजाभवानीचे दर्शन...

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२८ नोव्हेंबर -**

संपूर्ण महाराष्ट्राला आपल्या अभिनयाने वेड लावणारा 'सैराट' फेम अभिनेता आकाश ठोसर याने आज (शुक्रवारी) सकाळी महाराष्ट्राची कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी मातेचे दर्शन घेतले. 'परश्या' म्हणून घराघरात पोहोचलेल्या आकाशने देवीच्या चरणी नतमस्तक होत आशीर्वाद घेतले.



आकाश ठोसर याने आज सकाळी मंदिरात जाऊन परंपरेनुसार श्री तुळजाभवानी देवीची ओटी भरली. तसेच अतिशय मनोभावे आरती करत देवीचे दर्शन घेतले. यावेळी त्याच्यासोबत त्याचे सहकारी आणि चाहते उपस्थित होते. दर्शनानंतर श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या वतीने आकाश ठोसर यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

मंदिर संस्थानचे सहायक जनसंपर्क अधिकारी उमाकांत क्षीरसागर यांनी आकाशला श्री तुळजाभवानी देवीची प्रतिमा आणि प्रसाद देऊन त्याचा सत्कार केला. यावेळी मंदिर संस्थानचे कर्मचारी उपस्थित होते.

## शिवसेना शिंदे गटाचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार जाकिरभाई सौदागर यांच्यासह इतर उमदेवारांना मदारी समाजाचा जाहीर पाठिंबा



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२८ नोव्हेंबर -**

परंडा नगरपरिषद निवडणूक अंतिम टप्प्यात पोहोचली असून चुरशीची लढत रंगतदार होण्याचे संकेत मिळत आहेत. २८ नोव्हेंबर रोजी शिवसेना शिंदे गटाचे नगराध्यक्ष पदाचे अधिकृत उमेदवार जाकिरभाई सौदागर तसेच १० प्रभागातील नगरसेवक पदाचे उमेदवार यांना अखिल भारतीय मदारी समाज सामाजिक संघटनेचा जाहीर पाठिंबा घोषित करण्यात आला.

मदारी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी, पारदर्शक प्रशासनासाठी आणि सर्वसमावेशक कार्यपद्धतीसाठी सौदागर यांच्या नेतृत्वावर समाजाचा पूर्ण विश्वास असल्याचे यावेळी सांगण्यात आले. त्यांच्या पुढाकारातून अनेक प्रश्न मार्गी लागले असून उर्वरित प्रश्नही तेच सोडवू शकतील, असा विश्वास मदारी समाजाने व्यक्त केला.

या समर्थन जाहीर कार्यक्रम ाला उपस्थित मोठ्या मान्यवरांमध्ये अध्यक्ष मौलाना समीर मदारी, उपाध्यक्ष नर्मदारी, सदस्य अज्जू मदारी, अख्तर मदारी, अशफाक मदारी, रियाज मदारी, हसन मदारी, बुरहान मदारी, रफीक मदारी, जुबेर मदारी, याकूब मदारी, मुस्तफा मदारी, उस्मान मदारी, मुजहिद मदारी, मोहम्मद मदारी, रज्जाक मदारी, गुलाम मदारी, आसिफ मदारी, जिलानी मदारी, अफजल मदारी, रेहान मदारी, अली मदारी यांच्यासह आदिचा यामध्ये मोठा समावेश होता.

मदारी समाजाच्या या जाहीर पाठिंब्यामुळे परंडा नगरपरिषद निवडणुकीत नवे समीकरण निर्माण झाले आहे.

## १ डिसेंबर रात्री १० नंतर प्रचारबंदी; निवडणूक आयोगाचे कडक आदेश

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२८ नोव्हेंबर -**

नळदुर्ग नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर राज्य निवडणूक आयोगाने कडक निर्देश जारी केले असून १ डिसेंबर रोजी रात्री १० वाजेपर्यंतच प्रचारास परवानगी देण्यात आली आहे. त्यानंतर सभा, मोर्चे, ध्वनीक्षेपक वापर, तसेच कोणतीही जाहिरात किंवा प्रसारमाध्यमांद्वारे प्रचार संपूर्णपणे बंद राहणार असल्याचे आदेश आयोगाने स्पष्ट केले आहेत.

या आदेशाचे पालन करून प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन न.पा. मुख्याधिकारी रामकृष्ण जाधवर यांनी केले आहे. दरम्यान, सामान्य प्रशासन विभागाने १ डिसेंबरला नळदुर्ग न.पा. क्षेत्रात सार्वजनिक सुटी जाहीर केली आहे. आवश्यक सर्व यंत्रणा सतर्क ठेवण्यात आल्याची माहितीही मुख्याधिकारी जाधवर यांनी दिली.

मुख्याधिकाऱ्यांनी सर्व राजकीय पक्ष, उमेदवार आणि नागरिकांनी आचारसंहितेचे काटेकोर पालन करून निवडणूक प्रक्रिया शांततेत पार पाडण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन केले आहे.

## नारंगवाडी येथे अयोध्येतील धर्मध्वजा उभारणीचा आनंदोत्सव



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२८ नोव्हेंबर -**

अयोध्येतील प्रभू श्रीराम मंदिरातील धर्मध्वजा उभारणीच्या आनंदोत्सवाचा उत्साह नारंगवाडी येथेही भक्तीभावाने अनुभवला गेला. छत्रपती शिवाजी महाराज चौक, मुख्य बाजारपेठ आणि पाटी परिसरात स्थानिक नागरिक, कार्यकर्ते आणि तरुणांच्या पुढाकारातून जल्लोषात हा उत्सव साजरा झाला.

हिंदू अस्मितेचे प्रतीक असलेला धर्मध्वज जवळपास ५०० वर्षांनंतर पुन्हा उभारण्यात आला आहे. मंदिरातील उर्वरित कामे पूर्ण झाल्यामुळे भगवा धर्मध्वज हा ऐतिहासिक क्षण म्हणून देशभरात आनंदोत्सव साजरा केला जात आहे.

कार्यक्रमात अविनाश देशमुख, नागेश घंटे, राहुल देशमुख, संतोष पवार, किरण मुगळे, सुधाकर आबा पवार, राजेंद्र पवार, राम मुळे, निखिल सूर्यवंशी, महेश देशमुख यांसह अनेक तरुण सहभागी झाले.

यासोबतच भारत माता सायम शाखा, भारतीय जनता पार्टी शाखा आणि परिसरातील हिंदुत्ववादी तरुणांनीही उत्साहात सहभाग नोंदवला.

## महात्मा जोतिबा फुले आधुनिक युगाचे शिल्पकार : प्रा. यशवंत चंदनशिवे

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.२८ नोव्हेंबर -**

जिजाऊ मेमोरियल प्रशासकीय सेवा महाविद्यालयात २८ नोव्हेंबर २०२५ रोजी क्रांतिसूर्य महात्मा जोतिबा फुले यांची पुण्यतिथी श्रद्धापूर्वक साजरी करण्यात आली. महाविद्यालयाच्या प्राचार्या अनुष्का देसाई यांच्या हस्ते प्रतिमापूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.



प्रा. यशवंत चंदनशिवे यांनी महात्मा फुले यांच्या कार्यावर प्रकाश टाकताना सांगितले की, अठराव्या शतकातही त्यांचे विचार एकविसाव्या शतकाइतके प्रगत होते. ते समाजसुधारक, कुशल राजकर्ते आणि उद्योजक होते. स्त्रीशिक्षणाला प्रोत्साहन देत स्त्रीला चूल-मुलांच्या चौकटीत न ठेवता नेतृत्वक्षम बनविण्याचे कार्य त्यांनी केले. जातीयता लवचिक होऊन मनुष्याची ओळख कर्तृत्वावर आधारित असावी, यासाठी त्यांनी आयुष्य समर्पित केले.

शेतकरी, कष्टकरी व एकल महिलांसाठी त्यांनी भरीव कार्य केले असून पुणे महापौर म्हणून औद्योगिक व राजकीय क्षेत्रात आदर्श घालून दिला. त्यामुळेच ते आधुनिक युगातील तरुणांचे प्रेरणास्थान ठरतात.

कार्यक्रमासाठी वैष्णवी लोहार आणि राणी माटे यांनी परिश्रम घेतले. महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते.

## ढोकी शिवारात अज्ञात महिलेचा खून; मृतदेह जाळण्याचा प्रयत्न

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२८ नोव्हेंबर -**

धाराशिव तालुक्यातील ढोकी शिवारातील शेत गट नंबर ५३२ जवळ, ढोकी-धाराशिव रोडच्या उजव्या बाजूस रेल्वे पटरीपासून सुमारे ३०० मीटर अंतरावर एका अनोळखी महिलेचा (वय अंदाजे १८-२३ वर्षे) मृतदेह अर्धवट जळालेल्या अवस्थेत आढळला.

दि.२७ नोव्हेंबर रोजी ६ वा. पूर्वी, अज्ञात आरोपीने महिलेच्या डोक्यात धारदार शस्त्राने वार करून खून केला व पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह जाळण्याचा प्रयत्न केल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे. याप्रकरणी गुन्हा नोंदवला असून, अज्ञात आरोपीचा शोध सुरू आहे.

## शेलगाव (दि.) येथील चार शिक्षकांचा देहदान संकल्प

### जन्मतः अंध असलेल्या वैशाली गुरव यांचाही सहभाग

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.२८ नोव्हेंबर -**

कळंब तालुक्यातील शेलगाव (दि.) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील चार शिक्षकांनी समाजातील जागरूकता आणि जबाबदारीची जाणीव ठेवत देहदानाचा प्रेरणादायी संकल्प केला आहे. शिक्षक हणमंत पडवळ, श्रीमती सुवर्णा शिनगारे, माधवी पवार आणि स्वाती जगताप यांनी देहदानाची अधिकृत नोंदणीही पूर्ण केली असून त्यांच्या निर्णयाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

विशेष म्हणजे, जि.प. शाळेजवळ राहणारे सेवानिवृत्त शिक्षक वसंत गुरव यांच्या कन्या वैशाली वसंत गुरव यांनीही देहदानाचा संकल्प करून या उपक्रमाला वेगळी उंची दिली आहे.

वैशाली या जन्मतः अंध असून, त्यांच्याकडे एक अवयव कमी असतानाही त्यांनी समाजहितासाठी देहदानाचा निर्णय घेत इतरांसाठी अनुकरणीय उदाहरण निर्माण केले आहे.

देहदान म्हणजे मृत्यूनंतर आपले शरीर वैद्यकीय शिक्षण व संशोधनासाठी दान करणे.

भविष्यातील डॉक्टरांना प्रत्यक्ष शिक्षणासाठी याचा मोठा उपयोग होतो.



त्यामुळे हा उपक्रम समाजासाठी अत्यंत मोलाचा मानला जातो.

समाजाला घडवणारा घटक म्हणजे शिक्षक. शेलगाव येथील शिक्षकांनी सामूहिकरीत्या अशी समाजोपयोगी भूमिका निभावत इतर शिक्षकांसह संपूर्ण समाजाला प्रेरणा दिली आहे. सध्या हे सर्व शिक्षक बदलीमुळे वेगवेगळ्या शाळांमध्ये कार्यरत असले तरी सामाजिक जाणिवेची वाट मात्र त्यांनी एकत्रितपणे निवडली आहे.

या उपक्रमाचे सर्वत्र अभिनंदन होत असले तरी या प्रेरणादायी निर्णयाचे अनुकरण करणेच खरी समाजसेवा ठरेल, असे स्थानिकांचे मत आहे.

# ग्रामस्थांकडून पुकारलेल्या बंदला शंभर टक्के प्रतिसाद



## साकोळ एसटी बस तोडफोड प्रकरण; पोलिसांनी काढली आरोपीची गावातून धिंड

**त.भा. वृत्तसेवा,**

**शिरूर अनंतपाळ, २८ नोव्हेंबर :** शिरूर अनंतपाळ तालुक्यातील साकोळ येथे दिनांक २६ नोव्हेंबर २०२५ रोजीच्या मध्य रात्री अज्ञात व्यक्तींकडून उदगीर आगाराच्या साकोळ उदगीर बसच्या काचा फोडून मोठ्याप्रमाणात नुकसान केले होते.या अज्ञात आरोपीला जोपर्यंत अटक होत नाही तोपर्यंत साकोळ ग्रामस्थांकडून बेमुदत बंद पुकारण्यात आला होता. पण पोलीस प्रशासनांकडून आरोपीचा शोध घेण्याकरिता जलदगतीने तपासाची सुत्रे फिरवल्याने एका आरोपीस बारा तासांच्या आत अटक करण्यात पोलिसांना यश आलेले आहे.

तालुक्यातील सर्वात मोठे गाव असलेल्या साकोळ गावात एस.टी. महामंडळाच्या विविध आगारांकडुन ५० फेऱ्या एस.टी.बस करत असतात. त्यामध्ये उदगीर आगाराची एस.टी.बस गेल्या तीस वर्षापासून साकोळ गावांसाठी सेवा देत आहे. याच एस.टी.बसचा दररोज संध्याकाळी साकोळ येथे मुक्काम असतो पण गेल्या तीस वर्षांत या बसवर काही समाजकंटकांनी दोन चार वेळा दगडफेक करून मोठ्याप्रमाणात नुकसान केलेले आहे.

त्यामध्येच या बसवर गेल्या दोन महिन्यापुर्वी अज्ञात व्यक्तींकडून दगडफेक करून बसचे मोठे नुकसान केले असताना आरोपीचा शोध लागलेला नाही तोपर्यंतच दिनांक २६ नोव्हेंबर २०२५ रोजी परत त्याच एस.टी. बसवर पुन्हा दगडफेक करून मोठ्याप्रमाणात नुकसान करण्यात आल्यामुळे साकोळकर जाम चिडून गेले व एस.टी. बसची तोडफोड करणाऱ्या आरोपीस जोपर्यंत अटक होत नाही तोपर्यंत ग्रामस्थांकडून बेमुदत गाव बंदची हाक दिली होती.

त्या अनुषंगानेच काल साकोळ येथील बाजारपेठ सकाळी दहा ते बारा वाजेपर्यंत कडकडीत बंद ठेवून एस.टी.बस फोडतोड करणाऱ्या आरोपीचा जाहीर निषेध व्यक्त करण्यात आला.

दरम्यान शिरूर अनंतपाळ पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अनंत भंडे यांच्या मार्गदर्शनाखाली येथील बीट जमादार राजेंद्र कांबळे यांनी आरोपींच्या तपासाची चक्र फिरवत अवघ्या बारा तासांत एका आरोपीस अटक करून त्याची साकोळ गावात घुडग्यावर चालवत धींड काढून अटक केल्याबद्दल बीट जमादार राजेंद्र कांबळे यांचे येथील आंदोलक अशिष धुमाळे, सुर्यकांत उमाटे, शिवाजी पाटील, शिवाभाऊ डोंगरे, अब्दुल अजीज मुल्ला, मनोज वाघमारे, महेश तिवारी, सिद्धेश्र्वर मोरे, इरफान शेख, अनंत शिंदे यांच्यासह गावातील व तालुक्यातील शेकडो नागरिकांकडून बीट जमादार राजेंद्र कांबळे यांचे कौतुक केले जात आहे.

# अल्पसंख्याकांच्या विकासाला सर्वाधिक चालना भाजपच्या काळातच : इद्रीस मुलतानी

**त.भा. वृत्तसेवा,**

**औसा, २८ नोव्हेंबर :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टीच्या काळात अल्पसंख्यांक मुस्लिम समाजाच्या सर्वांगीण विकासाला मोठ्या प्रमाणात चालना मिळाली आहे.या काळातील शासनाच्या बहुतेक लोककल्याणकारी योजना अल्पसंख्यांक बांधवांपर्यंत प्रामाणिकपणे पोहोचविण्यातही भाजपने महत्त्वाची भूमिका बजावली असल्याचे मत भाजप अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष इंद्रीस मुलतानी यांनी व्यक्त केले.

औसा येथे नगरपरिषद निवडणूकीच्या प्रचार सभेत अध्यक्ष इंद्रीस मुलतानी बोलत होते. आमदार अभिमन्यू पवार, वक्फ बोर्डाचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष समीर काजी,नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार डॉ. ज्योतीताई बनसुडे, अक्रम खान, निसार कुरेशी,जिलानी बागवान, सुनील उटगे, सोमनाथ इळेकर, लिंबराज जाधव, कल्पना डांगे, सुवर्णा नाईक, शहराध्यक्ष शिवरुद्र मुर्गे आणि भाजप-शिवसेना -रिपाई युतीचे सर्व उमेदवार उपस्थित होते.

अल्पसंख्यांक आयोगाचे अध्यक्ष मुलतानी म्हणाले, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने अल्पसंख्यांक समाजाचे मोठे नुकसान केले आहे. लोकसभा निवडणुकांमध्ये मुस्लिम समाजाच्या मनात भीती निर्माण करण्याचा विषारी प्रयत्न करून नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यास मुस्लिम समाजावर संकट येईल असा खोटा प्रचार केला. प्रत्यक्षात मात्र भाजपनेच अल्पसंख्यांकांना सर्वाधिक प्रतिनिधित्व दिले आहे. औसा नगर परिषदेमध्ये आमदार अभिमन्यू पवार यांनी सात अल्पसंख्यांक उमेदवारांना संधी देऊन जातीय सलोखा आणि सामाजिक ऐक्य दृढ केले आहे.

प्रधानमंत्री आवास योजना, उज्वला गॅस, लाडकी बहीण योजना, मोफत अन्नधान्य, मुद्रा व कौशल्य विकास, महिला सक्षमीकरण योजना, महात्मा फुले जनआरोग्य योजना, आयुष्यमान भारतमधील पाच लाखांपर्यंत मोफत उपचार अशा अनेक योजनांचा सर्वाधिक लाभ अल्पसंख्यांक समाजाला झाला आहे. सरकार कोणतीही



योजना जात किंवा धर्म पाहून देत नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**विरोधकांनी विकासावर बोलावे : आ. अभिमन्यू पवार**

औसा नगरपरिषद निवडणुकीत विकास हाच एकमेव मुद्दा असला पाहिजे. परंतु विरोधकांकडे विकासाचे कोणतेही ठोस काम किंवा मुद्दा नसल्याने ते या निवडणुकीला जाणीवपूर्वक धार्मिक रंग देण्याचा प्रयत्न करीत आहेत. अशी टीका आमदार अभिमन्यू पवार यांनी सभेत बोलताना केली. पुढे म्हणाले की, औशाची जनता सुजाण आहे. शहरात करण्यात आलेली पायाभूत कामे, पाणीपुरवठा, रस्ते, शैक्षणिक-सांस्कृतिक सुविधा आणि सर्वसमावेशक विकास यामुळे नागरिकांची भाजपा-शिवसेना-रिपाई युतीवर ठाम श्रद्धा आहे. विकासाच्या नावावर एकही उदाहरण देता न आल्याने विरोधक धार्मिक विभाजनाची भाषा बोलून जनतेची दिशाभूल करण्याचा निष्फळ प्रयत्न करत आहेत. औसा शहराने विकासाचा मार्ग स्वीकारला आहे आणि पुढेही तोच मार्ग निवडतील असा विश्वास आ. पवार यांनी यावेळी व्यक्त केला.



# मतिमंद मुलांना ब्लँकेट वाटप

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, २८ नोव्हेंबर :** उदगीर येथील जमीयत उलमा- -ए-हिंद या संघटनेतर्फे जीवन विकास निवासी मतिमंद कर्मशाळेतील सर्व प्रवेशितांना ब्लँकेट चे वाटप करण्यात आले. सर्व मुलांना व्हॅसलींन ची एक एक डब्बी व खाऊ वाटप करण्यात आले. या कार्यक्रम प्रसंगी जमियत उलमाय हिंद मराठवाडाचे अध्यक्ष कारी शमशूल हक्क खूरेशी, मौलाना ताहेर मेहमूद , मौलाना अजीजूर रहमान , मौलाना उस्मान, हाफिज शब्बीर देशमुख , हाजी याहूब आदी मान्यवर उपस्थित होते.

# अतिक्रमणधारकांच्या पीक पेऱ्याची नोंद रजिस्टरला घ्या

**त.भा. वृत्तसेवा,**

**रेणापूर, २८ नोव्हेंबर :** इ.सन १९८० पासुन रेणापुर तालुक्यातील विविध गावातील अनुसुचित जातीच्या भुमिहिनांनी कुंटूबाच्या उदरनिर्वाहा करिता सरकारी गायरान जमिनीवर अतिक्रमण करून लागवडी खाली आणल्या आहेत.त्या जमिनीवर पेरणी केलेल्या पिकांचा पंचनामा करून १ ई रजिस्टरला पेऱ्याची नोंद घ्यावी या मागणी करीता वंचीत हक्क अंदोलन महाराष्ट्रच्या वतीने गुरुवार (दि.२७ ) रोजी रेणापूर तहसीलदारांना निवेदन दिले आहे. रेणापूर तालुक्यतील मौ.पानगाव, तत्तापुर, गरसुळी, आरजखेडा, डिघोळ देशमुख, पोहरेगाव, बावची, मोटेगाव या गावातील सरकारी गायराण जमिनीवर सन १९८० पासुन अ.जा. जातीलचे कुटूंबीय पिक घेवुन आपली उपजिवीका भागवित आहेत. त्यांच्या ताब्यात असलेल्या जमीनी त्यांचे उपजिवीकेचे मुध्य साधन आहे. सदरील जमीनीच्या महसुल दप्तीरी नोंद या त्यांच्या नावे असणे गरजेचे आहे.

# प्रभाग क्र. ७, ८ मध्ये भाजप उमेदवारांची प्रचार रॅली

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, २८ नोव्हेंबर :** नगर परिषद निवडणुकीच्या प्रचाराच्या निमित्ताने भारतीय जनता पक्ष व राष्ट्रवादी काँग्रेस युतीच्या अध्यक्षपदाच्या उमेदवार स्वाती सचिन हुडे यांच्या व प्रभाग क्रमांक ०७ मधील प्रचाराच्या निमित्ताने भव्य प्रचार रॅली काढण्यात आली.

प्रभाग क्रमांक सात मधील काळा मारुती मंदिरात माजी मंत्री आमदार संजय बनसोडे व नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ.स्वाती सचिन हुडे यांच्या हस्ते आरती करून रॅलीची सुरुवात करण्यात आली. यावेळी माजी मंत्री आमदार संजय बनसोडे व स्वाती सचिन हुडे यांनी उपस्थित महिलांची संवाद साधला.

उदगीरच्या विकासासाठी आपण गेली पाच वर्ष सातत्याने झटत असून विकासाची ही गती कायम राहण्यासाठी नगर परिषद युतीच्या ताब्यात राहणे गरजेचे आहे. प्रभागातील नागरिकांच्या मूलभूत समस्या सोडविण्यासाठी केवळ युतीचे उमेदवार सक्षम असून या निवडणुकीत मतदारांनी आपली ताकद युतीच्या पाठीशी भक्कमपणे उभी करावी असे आवाहन यावेळी माजी मंत्री आमदार संजय बनसोडे यांनी केले. नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार स्वाती सचिन हुडे यांनी महिला मतदारांशी संवाद साधताना महिलांच्या प्रश्नावर आपण काम करणार असल्याचे सांगितले.

यावेळी माजी आमदार गोविंद केंद्रे, माजी जि. प. अध्यक्ष राहुल केंद्रे, भाजपाचे तालुकाध्यक्ष सुनील सावळे, बापूराव राठोड, सचिन हूडे, माजी नगराध्यक्ष बसवराज बागबंदे, प्रभाग क्र. ०७ चे उमेदवार मनोज पुदाले, छाया बागबंदे, प्रभाग ८ चे उमेदवार राजकुमार हुडगे व निकिता अंबरखाने, उमेश पाटील देवणीकर, अनिल पुदाले, अमोल अनकल्ले, अमोल पाटील कौळखेडकर, वीरेंद्र अंबरखाने, रवी मलगे, सतीश धोंडगे, सरोजा वारकरे,बबीता पांढरे, उषा माने, मनोज धावडे, मिलिंद मुक्कावार, व्यंकट काकरे, शिवानंद हैबतपुरे, सुमित बागबंदे, नागेश आंबेगावे, आनंद बुंदे यांच्यासह कार्यकर्ते, महिला मोठया संख्येनी सहभागी झाले होते.



# लिंबन रेशमेंना दादापीर, पीरपाशा, निळकंठेश्वराचा आशीर्वाद

**त.भा. वृत्तसेवा,**

**निलंगा, २८ नोव्हेंबर :** निलंगा नगर परिषद निवडणुकीतील उबाठा शिवसेना व शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या आघाडीचे उमेदवार लिंबन रेशमे यांची ग्रामदैवत निळकंठेश्र्वर, दादापीर व पीरपाशा दर्गा यावर अपार श्रद्धा व भक्ती आहे. यामुळे सामाजिक सलोखा जोपासण्याचे कार्य करणाऱ्या लिंबन रेशमे यांना या तिन्ही दैवतांचा आशीर्वाद असल्याचे मत दादापीर दर्ग्याचे सज्जादे सय्यदशहा हैदरवली नबीरा कादरी यांनी व्यक्त केले.

निलंगा नगर परिषद निवडणुकीतील प्रचारादरम्यान उबाठा शिवसेना उमेदवार लिंबन महाराज रेशमे यांनी शुक्रवारच्या नमाज अदा करण्यासाठी दादापीर दर्गा येथे जमा झालेल्या मुस्लिम समाज बांधवांशी संवाद साधून दादापीर दर्ग्याचे आशीर्वाद घेतले.

यावेळी दादापीर दर्ग्याचे सज्जादे



सय्यदशहा हैदरवली नबीरा कादरी म्हणाले की, धार्मिक परंपरा असलेल्या रेशमे परिवाराचे मुस्लिम समाज बांधवांशी अनेक पिढ्यांपासून भावनिक नाते आहे. सर्वसामान्य जनतेच्या मदतीला धावून जाणारे लिंबन महाराज रेशमे यांनी विविध जाती धर्मांना सोबत घेऊन त्यांनी सामाजिक कार्य केले आहेत. विविध जाती धर्मात सामाजिक सलोखा जोपासण्याचे कार्य करणाऱ्या लिंबन महाराज रेशमे यांना आमचा आशीर्वाद असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी बोलताना लिंबन महाराज रेशमे म्हणाले, मी कधीही जातीपातीचे राजकारण केले नाही. सर्व समाज बांधवांशी माझे वैयक्तिक स्नेहाचे व प्रेमाचे संबंध आहेत. प्रचारादरम्यान विविध प्रभागातून मला शहरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद भेटत आहे. जनतेचा माझ्यावर प्रेम व विश्र्वास असून जनतेच्या आशीर्वादाच्या बळावर मी निवडून येणार याबद्दल मला खात्री असल्याचे ते म्हणाले. यावेळी शिवाजी रेशमे गुरुजी, डॉ. शोभाताई बेंजरगे, अविनाश रेशमे, यांच्यासह उमेदवार व शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी उपस्थित होते.

माझ्यावर जनतेचा विश्र्वास असल्याने जनता मला या निवडणुकीत भरभरून साथ देत आहे प्रचार दौऱ्यात मला शहरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद भेटत असून जनतेच्या आशीर्वादाच्या बळावर मी निवडून येणार याबद्दल मला खात्री आहे असे ते म्हणाले

# धनगर समाजाच्या विकासासाठी फडणवीस कटिबद्ध : डॉ. महात्मे



**त.भा. वृत्तसेवा,**

**औसा, २६ नोव्हेंबर :** मागासलेल्या धनगर समाजाचे विविध प्रश्र्न प्रलंबित असून या प्रश्र्नांची सोडवणूक करण्यासाठी भाजपा सरकार कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन राज्यसभेचे माजी खासदार, पद्मश्री डॉ. विकास महात्मे यांनी केले.

औसा येथील अहिल्यादेवी होळकर सांस्कृतिक सभागृहात नगरपरिषद निवडणूक प्रचारसभेत माजी खा. डा. विकास महात्मे बोलत होते.पुढे म्हणाले,

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशभरात प्रभावी कामकाज सुरू असून महाराष्ट्रात धनगर समाजाच्या प्रश्र्नांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सातत्याने प्रयत्नशील आहेत. लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा सन्मान राखत, त्यांच्या जन्मभूमीतील जिल्ह्याचे नाव अहिल्यानगर करण्यात आले. तसेच सोलापूर विद्यापीठाला पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर नाव देऊन समाजाचा गौरव केला असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.औसा विधानसभा मतदारसंघाच्या विकासाला गती देणारे सक्षम नेतृत्व आमदार अभिमन्यू पवार यांच्या रूपाने लाभले आहे. नगराध्यक्ष पदासाठी उच्चशिक्षित डॉक्टर ज्योती बनसोडे यांची केलेली निवड विकासाभिमुख दृष्टीकोनाचे द्योतक असून मतदारांनी स्वतः मतदान करून अधिकाधिक मतदारांना मतदान केंद्रापर्यंत घेऊन जावून विजयाचे शिल्पकार व्हावे, असे आवाहन माजी खा. डॉं. विकास महात्मे यांनी केले.

आमदार अभिमन्यू पवार, नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार डॉ. ज्योती बनसोडे, मल्हारी युद्धे, अनिल गोयकर, अनिल पुजारी, माजी नगरसेवक गोपाळ धानोरे, बंडू कोदरे, कल्पना डांगे, लता घायाळ, चंद्रकांत हजारे, पियुष मेहत्रे, शिल्पा कुलकर्णी आदी मान्यवरांसह शेकडो धनगर समाज बांधव व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.कार्यक्रमाच्या प्रारंभी भाजपा ओबीसी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष सुधीर पोतदार यांनी प्रास्ताविक केले. या सभेत धनगर समाजाच्या वतीने डॉ. ज्योतीताई बनसोडे आणि भाजपा-शिवसेना युतीच्या उमेदवारांना अधिकृत समर्थनपत्रही देण्यात आले.

# संकटसमयी आर्थिक मदतीचे पाठबळ; वाढवणा पाटी व्हाट्सअप ग्रुपच उपक्रम

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, २८ नोव्हेंबर :** वाढवणा पाटी व्हाट्सअप ग्रुपच्या वतीने वाढवणा बु (ता. उदगीर) येथील दोन कुटुंबांना आर्थिक मदतीचा हात देण्यात आला.

वाढवणा बु येथील राम यादवराव पुंड हे किडणी या आजाराने त्रस्त होते या कुटुंबाची आर्थिक स्थिती बिकट असल्याने उपचारासाठी पैसे नसल्याची माहिती मिळाली आणि आपल्या ग्रुपणे त्यांणा ५०,००० रु मदत करण्यात आली.

वाढवणा येथील कै रमेश शंकर राव गायकवाड हे क्यॉंसर या आजाराने मरण पावले त्यांच्या कुटुंबातील करता मानुस गेल्याने घरची परीस्थिती हालाकीकीची झाली असल्याने त्यांच्या कुटुंबाला २०,५०० रु मदत करन्यात आली. या वेळी संतोष सोमासे, थोंटे नागेश, बालाजी बामणे, सोमा पाटील, रितेश राजमाणे, भगवान गोटमुकले, सोनु मठपती, बबन भांगे, व्यंकट मुंडकर, मठपती साई, हारणाळे आक्षय, मारोती भांगे, सचीन बामणे उपस्थित होते. ग्रुपच्या सदस्यांनी सहकार्य केल्याबद्दल ग्रुपच्या सहकार्याचे मनापासुन आभार मानले.





# शिरूर ताजबंद येथे संविधान दिन मोठ्या उत्साहात साजरा

**त.भा. वृत्तसेवा,**

**शिरूर ताजबंद, २६ नोव्हेंबर :** २६ नोव्हेंबर अर्थातच संविधान दिन अहमदपूर तालुक्यातील शिरूर ताजबंद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात भारतीय संविधान दिनाच्या निमित्ताने जगाला शांतीचा संदेश देणारे विश्र्ववंदनीय तथागत भगवान गौतम बुद्ध व बोधिसत्व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व त्रिशरण पंचशील ग्रहण करून संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन करत संविधान दिन साजरा करण्यात आला.

ह्यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीचे मार्गदर्शक माधव सरवदे, अध्यक्ष बुद्धभूषण मोरे, उपाध्यक्ष विकी सरवदे, धर्मपाल सरवदे, मारुती सरवदे, नागेश सरवदे, पँथर नेते भगवान दादा कांबळे, शिवाजी बनसोडे, अशोक वाघमारे, संमेक सरवदे, प्रतीक सरवदे, गजानन गायकवाड त्यांच्यासह आदींची उपस्थिती होती. तर ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच मच्छिंद्र वाघमारे यांच्या शुभहस्ते संविधान निर्माते महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून संविधान दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी सरपंच मच्छिंद्र वाघमारे, ग्रामपंचायत सदस्य रणधीर पाटील, किशन कापसे, किशोर वाघमारे, ग्रामपंचायत अधिकारी प्रशांत घुगे, शिवसेनेचे नेते अनिल लामतुरे, लिपिक तोफीक किनिवाले, धर्मपाल सरवदे, गंगाधर बैकरे, मारोती सरवदे, लक्ष्मीबाई वाघमारे यांच्या सह आदींची उपस्थिती होती. तर अहमदपूर येथील नालंदा केंद्रीय निवासी इंग्रजी प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन करत भारतीय संविधान दिन साजरा करण्यात आला.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, धाराशिव, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त...



### कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे जयंतीनिमित्त कार्यक्रम

**येरमाळा, दि.२८ नोव्हेंबर -**

कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२३ व्या जयंतीनिमित्त येडशी येथील जनता विद्यालयात उच्च माध्यमिक गटाच्या विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. निबंध, वक्तृत्व, हस्ताक्षर, चित्रकला, रांगोळी, समूह व वैयक्तिक गीत गायन अशा स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून कार्यक्रमाला विशेष उजाळा दिला. स्पर्धांचे उद्घाटन व्यसनमुक्ती केंद्राचे सर्वेसर्वा डॉ. संदीप तांबारे, युवा उद्योजक तानाजी जाधव आणि श्री साई कॉम्प्युटरचे संचालक श्रीमंत नवले यांच्या उपस्थितीत करण्यात आले. सोहळ्याचे अध्यक्षस्थानी येडशी सरपंच डॉ. सोनिया पवार होत्या. स्पर्धांचे परीक्षण लवटे, लाड, शशिकांत लांडगे, भूषण देवकर, शंकर लाखे, जाधव, थोडसरे, नंदकुमार खोत व मुळीक यांनी पारदर्शकपणे केले. विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन सर्व मान्यवरांनी त्यांचे कौतुक केले. कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य चंद्रकांत नलावडे, उपप्राचार्य कांबळे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी यशस्वीपणे केले. सूत्रसंचालन प्रमोद जाधव यांनी तर आभारप्रदर्शन महानंदा बनसोडे यांनी केले.



### जयप्रकाश विद्यालयाचे माजी विद्यार्थ्यांची भारतीय सैन्य दलात निवड

**धाराशिव, दि.२८ नोव्हेंबर -**

जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे माजी विद्यार्थी अजिंक्य सुरवसे आणि ओम भोरे यांची भारतीय सैन्यात निवड झाल्याबद्दल विद्यालयात सत्कार करण्यात आला. मान्यवरांच्या हस्ते त्यांना पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले गेले. दोघांनीही पाचव्या इयत्तेपासून जयप्रकाश विद्यालयात शिक्षण घेतले असून, लहानपणापासून देशसेवेची जिद्द बाळगून सातत्यपूर्ण मेहनतीने त्यांनी आपले स्वप्न साकार केले. कार्यक्रमास डॉ. आंबेडकर बाल शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुभाषदादा कोळगे, रामदास कोळगे, राजनारायण कोळगे, प्राचार्य जयप्रकाश कोळगे, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तीन म्हशी चोरीप्रकरणी तिघे अटकेत; पिकअपसह ७.३० लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२८ नोव्हेंबर -**

चोरीस गेलेल्या तीन म्हशींसह पिकअप वाहन जप्त केले आहे. आरोपी रविंद्र उर्फ बुठा ठकसेन रायते व त्याचे साथीदार ऋषीकेश बिंटु जगताप आणि राहुल सुभाष सपकाळ यांना ताब्यात घेतले. रविंद्रने चौकशीदरम्यान गुन्हा केल्याचे कबूल केले आणि चोरीस गेलेल्या म्हशी घराजवळील झाडीत बांधून ठेवले असल्याचे सांगितले. जप्त केलेला मुद्देमाल एकूण ७ लाख ३० हजार रुपये किंमतीचा आहे. या यशस्वी कारवाईसाठी स्थानिक गुन्हे शाखेच्या संपूर्ण पथकाने सहभाग घेतला.



स्थानिक गुन्हे शाखेचे पथक धाराशिव जिल्ह्यात पेट्रोलींग करत असताना तांत्रिक विश्लेषण व गुप्त माहितीच्या आधारे पोलीस ठाणे वाशी गु.र.नं. ३९०/२०२५, कलम ३०३(२) बीएनएस मधील चोरी प्रकरणातील आरोपींचा शोध घेण्यात आला. गुन्ह्यातील संशयित रविंद्र उर्फ बुठा ठकसेन रायते (वय ३३) रा. कणसेवस्ती, गुणवरे, ता. फलटन, जि. सातारा हा सापडल्याने त्याची चौकशी करण्यात आली.

सुरुवातीस त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली; मात्र विश्वासात घेऊन केलेल्या चौकशीत त्याने ऋषीकेश बिंटू जगताप (रा. गोखली, ता. फलटन, जि. सातारा), राहुल सुभाष सपकाळ (रा. सोनगाव, ता. बारामती, जि. पुणे) या दोघांसह मिळून चोरी केल्याची कबुली दिली. पथकाने तत्काळ दोन्ही आरोपींनाही ताब्यात घेतले.



चोरीस गेलेल्या तीन म्हशी कुठे ठेवण्यात आल्या आहेत. याबाबत चौकशी केली असता, त्या रविंद्र रायते यांच्या घरासमोरील झाडीत बांधून ठेवून, त्या बारामती बाजारात विक्रीस नेण्याचा त्यांचा मनसुबा असल्याचे समोर आले. यानंतर पथकाने गुणवरे येथे छापा मारून चोरीस गेलेल्या ३ म्हशी, एक पिकअप वाहन (गुन्ह्यात वापरलेले) असे मिळून एकूण ७ लाख ३० हजार रूपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला.

पथकाच्या या धडाकेबाज कामगिरीमुळे चोरीप्रकरणातील तीनही आरोपी अटकेत असून, पुढील तपास स्थानिक गुन्हे शाखेमार्फत सुरू आहे.

# मंत्री जयकुमार गोरे यांच्या उपस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२८ नोव्हेंबर -**

संविधान दिनाच्या औचित्याने महाराष्ट्राचे ग्रामविकास मंत्री ना. श्री. जयकुमारजी गोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून संविधान दिन साजरा करण्यात आला.

या प्रसंगी समता, बंधुता, स्वातंत्र्य आणि न्याय या भारतीय संविधानाच्या मूलभूत मूल्यांची पुन्हा एकदा आठवण करून देत लोकशाहीच्या भक्कम परंपरेला दृढ करण्याचा संकल्प उपस्थितांनी व्यक्त केला. समाजातील प्रत्येक घटकाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी कार्य करणे हीच डॉ. आंबेडकरांना अभिवादन करण्याची खरी भावना असल्याचे प्रतिपादनही यावेळी करण्यात आले.

कार्यक्रमाला आ. राणाजगजितसिंह पाटील, माजी आमदार सुजितसिंह ठाकूर, दत्ताभाऊ कुलकर्णी, नितीन काळे, संताजी चालुक्य, उद्धवबाबा पाटील, रामदास कोळगे, नितीन भोसले, युवराज नळे, नितीन शेरखाने तसेच धाराशिव नगरपरिषदेतील भाजपाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार नेहा राहुल काकडे यांच्यासह इतर सर्व उमेदवार आणि कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

उपस्थित मान्यवर, कार्यकर्ते आणि नागरिकांनी संविधान दिन साजरा करत देशभावना, लोकशाही मूल्ये आणि सामाजिक न्याय यांप्रती निष्ठा व्यक्त केली.

# नवीन पेट्रोल पंप देण्याचे आमिष दाखवून ३७.९९ लाखांची ऑनलाइन फसवणूक

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२८ नोव्हेंबर -**

नवीन पेट्रोल पंप मिळवून देण्याचे आमिष दाखवून तब्बल ३७ लाख ९९ हजार ५०० रूपयांची ऑनलाइन फसवणूक झाल्याची तक्रार तांबेवाडी (ता. भुम) येथील आकाश नानासाहेब शिंदे (वय ५५) यांनी सायबर पोलीस ठाण्यात दाखल केली आहे.

याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, तक्रारीनुसार, आरोपीने मोबाईल क्रमांक ७३६२९४९३२९ वरून संपर्क साधत तसेच बँक खाते क्रमांक ०७०९०१०००००३४५५५ आणि ८४९६१०११११११३४६७ यांच्या माध्यमातून १५ सप्टेंबर ते १५ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत विविध ऑनलाईन व्यवहार करवून घेतले. फोन-पे आणि आरटीजीएसद्वारे पैसे पाठवण्यास सांगून पीडित व्यक्तीकडून जवळपास ३८ लाख रुपये लाटण्यात आले. या प्रकरणी सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# टिईटी व पेन्शनच्या मागणीसाठी जंतरमंतरवर लाखो शिक्षकांचे धरणे

## धाराशिव जिल्हाध्यक्ष बशीर तांबोळी यांच्या नेतृत्वात शिक्षकांचा आंदोलनात सहभाग...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ नोव्हेंबर -**

टिईटी अनिवार्यतेसंबधी झालेले नवीन संशोधन रद्द करून शिक्षण अधिकार कायदा लागू होण्यापुर्वी च्या शिक्षकांना सेवेत संरक्षण द्यावे तसेच जुनी पेन्शन योजना लागू करावी या दोनच मागण्यांसाठी देशभरातील लाखो शिक्षकांनी दिल्लीतील ऐतिहासिक जंतरमंतरवर धरणे आंदोलन केले.

जे टिईटी पात्र आहेत त्यांना



पेन्शन नाही.ज्यांना पेन्शन आहे ते टिईटी नाही म्हणून नौकरीतून शासन काढत आहे या शासनाच्या परस्परविरोधी भूमिकेचा त्यांनी निषेध केला. भारत सरकारने यावर तोडगा काढला नाही तर फेब्रुवारी मध्ये रामलीला वर आक्रोश मोर्चा व संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान संसदेचा घेराव करण्याचा इशारा राष्ट्रीय अध्यक्ष बसवराज गुरीकर यांनी दिला.

अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाचे धाराशिव जिल्हाध्यक्ष बशीर तांबोळी यांच्या नेतृत्वात अनेक शिक्षकांनी या आंदोलनात सहभाग नोंदविला.

# कळंब नगरपालिका निवडणूक: सौंसाठी पतीराजांची दमछाक..!

**तभा वृत्तसेवा**
**खामसवाडी, दि.२८ नोव्हेंबर -**

कळंब नगरपालिका निवडणूक सध्या वेगळ्या राजकीय वळणावर आली आहे. प्रत्येक राजकीय पक्षाचा उमेदवार आपल्या मतदारांशी थेट संपर्क साधत, गल्ली-गल्ली घरोघरी भेटीवर आहे.

या निवडणुकीत नगराध्यक्ष पद विशेषतः महिलांसाठी सुटलेले असल्यामुळे अनेक दिग्गज नेत्यांच्या पत्नी राजकीय रिंगणात आहेत. परिणामी, पतीराज आपल्या पत्नीच्या प्रचारासाठी दमछाक करत फिरताना दिसत आहेत.

नगराध्यक्ष पदासाठी सहा महिला उमेदवार उभ्या आहेत. शिंदे शिवसेनेकडून राणी (सुनंदा) शिवाजी कापसे, राष्ट्रवादी काँग्रेसकडून मिनाक्षी श्रीधर भवर, तर शिवसेना (उद्धव ठाकरे गट)कडून रश्मी संजय मुंदडा या प्रमुख फाईटमध्ये आहेत. या नेत्यांच्या पत्नी असल्यामुळे निवडणूक वेगळ्या वळणावर आली आहे.

अपक्ष उमेदवारांमध्ये कविता निवृत्ती गोरे, मनीषा सतपाल बनसोडे, शेख सेहनाज अनिस यांचा समावेश असून, त्यांचे पती देखील प्रचारात सक्रिय आहेत.

भाजपचे नेते आणि आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी शिंदे शिवसेना-भाजपा युतीसाठी कार्यकर्त्यांना प्रत्यक्ष भेटीवर भर देण्याचे सुत्र दिले. तसेच शिंदे शिवसेनेचे नेते अजित पिंगळे, शिवसेना (उभाठा) नेते व आमदार कैलास पाटील, काँग्रेस नेते पांडुरंग कुंभार हेही पक्षाच्या प्रचारात सक्रिय आहेत.

या निवडणुकीत नगरसेवक पदासाठी अनेक उच्चशिक्षित महिला व पुरुष उमेदवारही उभे आहेत. स्थानिक समस्या, शहराचा विकास, रस्ते, नाले, विज-लाईट व्यवस्थापन यांसारख्या मुद्यांवरून राजकीय वातावरण तापले आहे.

सद्यस्थितीत कळंब नगरपालिकेचे राजकीय वातावरण ढवळून निघाले असून, नगराध्यक्ष पदासाठी पतीराजांची प्रतिष्ठेची दमछाक ही निवडणुकीची खास वैशिष्ट्ये ठरत आहेत.

# नळदुर्ग : नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी प्रशासनाची सर्व तयारी पूर्ण

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२८ नोव्हेंबर -**

नळदुर्ग नगरपालिकेच्या २ डिसेंबर रोजी होणाऱ्या निवडणुकीसाठी प्रशासनाच्यावतीने व्यापक तयारी करण्यात आली आहे. निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी एकूण १७ कक्ष स्थापन करण्यात आले असून सुमारे २७५ अधिकारी व कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. पाटबंधारे विभाग, शिक्षण विभाग, ग्रामपंचायत, कृषी विभाग तसेच नगरपालिकेतील अधिकारी-कर्मचारी निवडणूक कामकाजात सहभागी आहेत.

निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून अप्पर तहसीलदार प्रमोद गायकवाड, तर सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नगरपालिका मुख्याधिकारी रामकृष्ण जाधवर व



पल्लवी पाटील काम पाहत आहेत.

तसेच विविध कक्षांसाठी अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. नामनिर्देशन, निवडणूक कक्ष, दैनंदिन अहवाल कक्ष प्रमुखपदाची जबाबदारी कर निर्धारण अधिकारी पल्लवी पाटील यांच्याकडे आहे. मतदान केंद्र सुविधा, संपर्क आराखडा, सेक्टर कक्ष व ईव्हीएम कक्ष प्रमुखपदाची जबाबदारी नगर अभियंता रत्नाकर पिचे यांच्याकडे आहे.

क्षेत्रीय अधिकारी म्हणून सहाय्यक अभियंता रमेश टोकलवाड, स्थापत्य अभियंता व्ही. पी. माने, राखीव अधिकारी म्हणून धरित्री विद्यालयाचे मुख्याध्यापक अनिल धामशेट्टी नियुक्त आहेत. वाहन, निवडणूक साहित्य, ओळखपत्र, पोष्टल बॅलेट, दिव्यांग सोई, कर्मचारी नेमणूक, मतदार जनजागृती व मीडीया कक्षासाठी संबंधित अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत.

निवडणुकीदरम्यान स्थिर व भरारी पथके, तसेच पोलिस बंदोबस्ताचीही व्यवस्था करण्यात आली आहे.

मतपेटी व ईव्हीएम सिलिंगसाठी २० अधिकारी-कर्मचारी नियुक्त असून प्रत्येक बूथवर एक अधिकारी व पाच कर्मचारी तैनात करण्यात येणार आहेत. निवडणूक सुरळीत पार पडावी यासाठी प्रशासन सतर्क असून सर्व तयारी पूर्ण करण्यात आली आहे.

# दहिफळ येथील श्री खंडोबा चंपा षष्टी यात्रेनिमित्त कुस्तीची दंगल

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.२८ नोव्हेंबर -**

कळंब तालुक्यातील दहिफळ येथील ग्रामदैवत श्री खंडोबा चंपा षष्टी यात्रेनिमित्त शुक्रवारी पारंपरिक कुस्ती दंगल उत्साहात पार पडली. परिसरातील आणि जिल्ह्यातील नामवंत मल्लांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून ग्रामीण कुस्ती परंपरेला उजाळा दिला.

दंगल पाहण्यासाठी सोलापूर, बार्शी, उंबरगे, करमाळा, माढा, आगळगाव, उमरगा, आळणी, तेरखेडा, रुई इत्यादी ठिकाणांमधून मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. दोनशेहून अधिक मल्लांनी सहभाग घेतला, तर दिवसभरात अडीच हजार ते तीन हजार रुपयांच्या ३०-४० कुस्ती, पाच हजार रुपयांच्या ३० कुस्ती आणि



प्रतिष्ठेच्या ११,०५१ रुपयांच्या अंतिम कुस्ती रंगल्या. एकूण सुमारे तीन लाख रुपयांचे बक्षीस वाटप करण्यात आले.

अंतिम फेरी ११,०५१ रुपयांच्या कुस्तीचा निकाल गौर येथील लखन लंगडे व शिराढोणच्या विजय ठोंबरे यांच्यात अटीतटीचा सामना रंगला. दोन्ही मल्लांनी उत्कृष्ट चालींचा वापर करत प्रेक्षकांची दाद मिळवली. निर्णायक क्षणी प्रभावी झोक देत लखन लंगडे यांनी विजय संपादन केला. दुसऱ्या दहा हजार रुपयांच्या बक्षीसाची कुस्ती आगळगावचे राम दरपणे व दत्ता मेटे यांच्यात पार पडली.

तांत्रिक कौशल्य व दमदार खेळ करत राम दरपणे यांनी हा सामना जिंकला. दंगलाचा शुभारंभ गावातील एका लहान मल्लाच्या हस्ते करण्यात आला, ज्याचे उपस्थितांनी कौतुक केले. कार्यक्रमास यात्रा पंचकमिटी अध्यक्ष अभिनंदन मते, सरपंच चरनेश्वर पाटील, समाधान मते, सुधीर मते, अमरसिंह भातलवंडे आणि देवस्थान यात्रा समितीचे पदाधिकारी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

चंपा षष्टी यात्रेनिमित्त झालेल्या या कुस्ती दंगलाने पारंपरिक ग्रामीण क्रीडा संस्कृतीची जपणूक करत, गावकऱ्यांचा उत्साह आणि मल्लांची दमदार कामगिरी प्रदर्शित केली. उपस्थितांमध्ये ही दंगल अत्यंत यशस्वी ठरल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

# पत्रकार बांधवांचा सत्कार; रोकडेश्वरी देवस्थान ट्रस्टच्या वतीने गौरव सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**खामसवाडी, दि.२८ नोव्हेंबर -**

लोकशाहीच्या चार स्तंभांपैकी पत्रकार हा एक मुख्य स्तंभ मानला जातो. स्वतःच्या सुरक्षिततेची पर्वा न करता सत्य व न्यायासाठी कार्य करणाऱ्या पत्रकारांचा सत्कार करणे म्हणजे त्यांच्या कार्याला नवी ऊर्जा देण्यासारखे आहे.

या उद्देशाने कळंब तालुक्यातील खामसवाडी येथील रोकडेश्वरी देवस्थान ट्रस्टच्या सभागृहात पत्रकारांचा गौरव सोहळा पार पडला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष होते रोकडेश्वरी देवस्थान ट्रस्टचे उपाध्यक्ष प्रभाकर शेळके, तर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते धाराशिव जिल्हा परिषदेच्या मा. सदस्य राधाताई दिपक ताटे आणि समाजसेवक तथा भापसे पार्टीचे अध्यक्ष दिपक ताटे.

यावेळी शिवसेना (उबाठा)चे गणप्रमुख दिनेश खुणे, दादा कोळी, भारत मगर, युवराज कराड, बप्पा शेळके, राजाभाऊ शेळके, बाबासाहेब पाटुळे, संजय गरड तसेच भापसे पार्टीचे युवा नेते महादेव सुतार यांची प्रमुख उपस्थिती होती.

सन्मानित पत्रकारांमध्ये लक्ष्मण शिंदे-पाटील, सुशिलकुमार पाटील, सुनिल पाटील, शिवाजी बोबडे, हनुमंत पाटुळे, अविनाश सावंत यांचा समावेश होता. त्यांचा भापसे पार्टीच्या वतीने मान्यवरांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ, लेखणी-पेन व पत्रकार डायरी देऊन सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महादेव सुतार यांनी केले, तर आभार प्रदर्शन शिवाजी बोबडे यांनी केले.

# पवन ऊर्जा प्रकल्पात खंडणी, मारहाणीची थेट तक्रार करा, कारवाई करु : एस.पी. रितू खोकर


## पवन ऊर्जा प्रकल्पांना पोलिसांचे पूर्ण सहकार्य आणि संरक्षण...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२८ नोव्हेंबर -**

धाराशिव जिल्ह्यातील पवन चक्की ऊर्जा प्रकल्प उभारणीचे काम मोठ्या प्रमाणात सुरू आहे. या प्रकल्पावर मोठ्या प्रमाणात कामाची अडवणूक करणे, खंडणी, मारहाण करणे, विजेच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण करणे, साहित्य चोरणे असे प्रकार मोठ्या प्रमाणात घडत आहेत. पवन ऊर्जा प्रकल्प कर्मचाऱ्यांना मोठ्या प्रमाणात धमकी देऊन कोणी खंडणी मागत मागत असल्यास त्यांनी पोलीस प्रशासनाकडील तक्रारीनंतरच कारवाई करण्यात येईल. अशी माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक रितू खोखर यांनी दिली.

जिल्ह्यातील आठही तालुक्यात पवन उर्जा प्रकल्पाची कामे सुरु आहेत. जिल्ह्यातील मोठ्या प्रमाणात नापीक जमिन असून अशा जमिनीचा वापर पवन व सौर ऊर्जा प्रकल्पासाठी होत असून त्याचा आर्थिक फायदा या भागातील शेतकऱ्यांना होत आहे. हे प्रकल्प शेत शिवार, माळरानावर असतात. मात्र, हे प्रकल्प उभारताना रात्रीच्या वेळी चोरीचे प्रमाण वाढले आहे. अनेक किंमती साहित्य चोरीला जाण्याच्या घटना वारंवार घडत आहेत.

या पवन व सौर ऊर्जा कंपन्या जिल्ह्यात प्रकल्प उभारणीसाठीआल्यानंतर त्यांना स्थानिक गावगुंडा कडून मोठ्या प्रमाणात अडवणूक करून खंडणी मागितली जात आहे. १५ दिवसांपूर्वी वाशी तालुक्यामध्ये पवन ऊर्जा प्रकल्पांची वाहने अडवून ९ लाख रुपयांची खंडणी मागितली. या प्रकरणी वाशी पोलिस ठाण्यात तिघां विरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पवन ऊर्जा प्रकल्प स्थळी या कंपन्यांचे कर्मचारी राहत आहेत. त्यांच्या निवासस्थानी मारहाण करणे, अडवणूक करणे, शिवीगाळ करणे, कामे न करू देणे, दमदाटी करून पैसे घेणे, साईट वरील साहित्याची चोरी करणे, कंपन्यांचे येणारे साहित्य अडवुन ठेवणे, विद्युत प्रवाह मार्गात अडथळे निर्माण करणे, कंपनीचे चालू असलेले काम बंद पाडून दादागिरी केली जात आहे. अशा अनेक प्रकारचे गुन्हे धाराशिव जिल्ह्यातील विविध पोलिस ठाण्यात नोंदविण्यात आले आहेत.



पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी व्हिडिओ कॉन्फरन्स द्वारे जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक इतर अधिकारी, पवन ऊर्जा प्रकल्पांचे प्रतिनिधी आणि शेतकरी यांच्या समवेत बैठक घेतली. या बैठकीत मंत्री सरनाईक यांनी पवन उर्जा प्रकल्पाबाबत तक्रारी विरोधात सुमोटो (Suo Moto ) गुन्हे दाखल करावेत. अशा गुंडां पासून जिल्ह्यात निर्भय वातावरण निर्माण करण्याची जबाबदारी पोलिसांची आहे.

याबरोबरच संबंधित कंपनीला पवनचक्की उद्योग उभारण्यासाठी जिल्हा प्रशासनाने योग्य ते सहकार्य करण्याचे निर्देश दिले आहेत. पवन ऊर्जा प्रकल्प कर्मचाऱ्यांना धमकी देऊन कोणी खंडणी मागत मागत असल्यास पवन ऊर्जा कंपनी, कर्मचारी यांनी पोलीस प्रशासनाकडे तक्रार दाखल करावी. या तक्रारीची दखल घेऊन तात्काळ कारवाई करण्यात येईल. पवन ऊर्जा प्रकल्पावर झालेल्या चोरी प्रकरणी काही आरोपींना अटक केली आहे.

तर उर्वरित तक्रारी संदर्भात तपास सुरू असून त्यांनाही लवकरच अटक करण्यात येईल अशी माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक रितू खोखर यांनी दिली.

## जाहीरनामा

**उमरगा येथील श्री.के.एन. निवडंगे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर., उमरगा**

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.५२९/२०२५** — **निशाणी क्र. ०७**
**झुंबर/निरंक**

ज्यापेक्षा मयत **कै. व्यकंट गोपाळ सुरवसे** हे मौजे चिंचोली (भु.) ता. उमरगा जि. धाराशिव येथे **दि.३०/०६/२०२५** रोजी मयत झाले असुन अर्जदार क. १. झुंबर व्यंकट सुरवसे वय ६५ वर्षे रा. चिंचोली (भु.) ता. उमरगा जि. धाराशिव २. तात्याराव व्यकंटराव सुरवसे वय ६८ वर्षे, ३. पार्वती श्रीमंत माने वय ५८ वर्षे, ४. हारुबाई अंबादास सुरवसे वय ५५ वर्षे, वरील मयताचे वारस असल्याच्या नात्याने त्यांचे पश्चात शासकीय निमशासकीय कार्यालयीन कामकाजाकरिता वारसा प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार मयताचे वारसदार असल्याबाबत आक्षेप असल्यास या जाहीरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यांत येते की जर सदर मुदतीत कोणी योग्य त्या हरकती दाखल न केल्यास अर्जदाराच्या वारसा प्रमाणपत्र मिळाल्याच्या मागणीबददल पुरावा घेवुन त्याची **कै. व्यकंट गोपाळ सुरवसे** यांचे वारस असल्याबददलचे वारस प्रमाणपत्र हे न्यायालय वरील अर्जदारांना देईल.

**दिनांक १२/०९/२०२५**
**पुढील तारीख १६/०१/२०२५**

**स्वाक्षरित/-**
**कनिष्ठ लिपीक**

**स्वाक्षरित/-**
**सहा.अधिक्षक**

**२ रे सह दिवाणी न्यायालय, क. स्तर उमरगा**

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## पुरुष नसबंदी पंधरवडा अंतर्गत जनजागृतीवर भर

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २८ नोव्हेंबर :** कुटूंब नियोजन हे केंद्र शासनाचे महत्वाचे धोरण आहे. अद्यापही कुटूंब नियोजनाची जबाबदारी बऱ्याचदा स्त्रीलाच पार पाडावी लागते. कुटूंब नियोजनात पुरुषांच्या सहभागाला चालना देण्यासाठी पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया व निरोधचा वापर याचे प्रमाण वाढविण्याच्या हेतूने जागतिक पुरुष नसबंदी पंधरवडा सर्व राज्यात साजरा करण्यात येतो. लातूर जिल्ह्यामध्ये २१ नोव्हेंबर, २०२५ ते ४ डिसेंबर, २०२५ या काळात पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया पंधरवाडा राबविण्यात येत आहे. यावर्षीचे या मोहिमेचे घोषवाक्य 'स्वास्थ व आनंदी कुटूंबाचे स्वप्न, पुरुषांच्या सहभागातून साकार' असे आहे. लातूर जिल्ह्यामध्ये आरोग्य विभागामार्फत ग्रामीण भागामध्ये नसबंदीसाठी मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात येत आहे. पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया सर्व शासकीय आरोग्य संस्थामध्ये मोफत केल्या जातात. तसेच लाभार्थ्यास प्रोत्साहनपर रुपये १ हजार ४५१ अनुदान दिले जाते. या पंधरवाडामध्ये जास्तीत जास्त पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया करुन घेण्याचे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बालाजी शिंदे यांच्यामार्फत करण्यात आले आहे.



# राजीव गांधींच्या पुतळ्याचा संरक्षक कठडा दुरुस्त होणार तरी केव्हा?

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २८ नोव्हेंबर :** लातूर शहरातील औसा रोडवरील बहुचर्चित अशा राजीव गांधी चौकातील राजीव गांधींच्या पुतळ्याचा कठडा एका बाजूने तुटला आहे. शहराच्या सौंदर्यात भर टाकणाऱ्या या पुतळ्याच्या संरक्षक कठड्याची दुरुस्ती करण्याचा मुहूर्त प्रशासन साधणार तरी केव्हा? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

आजमितीस शहरातील राजीव गांधी चौक अतिशय वर्दळीचे ठिकाण झाल्याचे सर्वज्ञात आहे. दिवसापेक्षा सायंकाळच्या सुमारास ह्या चौकात दररोजच वाहतुकीची मोठी कोंडी होत असल्याचे पाहावयास मिळते. या एका चौकात वाहतुकीची कोंडी झाली की, त्याचे परिणाम त्यापुढे असणाऱ्या छत्रपती चौक, तसेच



नांदेड रोडकडे जाणाऱ्या वसंतराव नाईक चौक, कन्हेरी चौक, महात्मा बसवेश्वर चौकातील वाहतुकीवरही होताना दिसतात. त्यामुळे केवळ एकाच चौकातील वाहतूक व्यवस्थेचे नियोजन करून प्रशासनाला चालणार नाही तर संपूर्ण वळण रस्त्यांवरील वाहतूक सुरळीत कशी होईलही पाहणे महत्वाचे ठरणार आहे. नेहमीच वाहनांच्या गराड्यात असणाऱ्या राजीव गांधींच्या पुतळ्याचा पुतळ्याच्या उजव्या हाताच्या बाजूचा संरक्षक कठडा अनेक दिवसांपूर्वी एका वाहनाच्या धडकेत तुटला आहे. हा कठडा तुटला त्यावेळीच संबंधित प्रशासनाने त्याची तात्काळ दुरुस्ती करणे आवश्यक होते. मात्र, कोणत्याही प्रशासनाला जनरेट्याशिवाय जणू समस्येचे निराकरण करण्याची आता सवयच राहिलेली नाही. दिवंगत पंतप्रधानांच्या पुतळ्याचा कठडा तुटलेला असतानाही त्याच्या दुरुस्तीकडे गांभीर्याने पाहिले गेले नाही. यावरूनच प्रशासनाची कार्यतत्परता दिसून येते.

राष्ट्र पुरुषांचे तथा राष्ट्रीय नेत्यांचे पुतळे समाजापुढे आदर्श निर्माण होण्याच्या उद्देशाने उभारण्यात आलेले असतात. त्याबरोबरच हे पुतळे शहराच्या सौंदर्यात भर टाकण्याचे कामही करत असतात.

अशावेळी या पुतळ्यांच्या सुरक्षिततेतची जबाबदारी अतिशय कटाक्षाने सांभाळणे अगत्याचे असते. पुतळ्यांची सुरक्षितता व देखभाल दुरुस्तीसाठी आवश्यक त्या निधीचा अभावही नसतो. त्यामुळे संबंधित प्रशासनाने या बाबीकडे सूक्ष्मपणे लक्ष देणे गरजेचे असते. अनेक दिवसांपासून या पुतळ्याच्या कठड्याची बाजू तुटली असून ती व्यवस्थितरीत्या दुरुस्त करून पुतळ्याचे सुशोभिकरण होणार तरी केव्हा ? असा सवाल सुजाण लातूरकरांतून केला जात आहे.



# रेणापूर येथे संत सेवालाल महाराजांचे भवन बांधून देणार

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २८ नोव्हेंबर :** रेणापूर शहरासह कार्यक्षेत्रातील वाडी तांड्याच्या विकासासाठी भाजपाच्या नेतृत्वातील शासनाच्या माध्यमातून गेल्या पाच-सात वर्षात विविध विकास कामासाठी ७० ते ८० कोटी रुपयाचा निधी मंजूर करून आणला येत्या मार्चपर्यंत आणखी २५ कोटी रुपयांचा विकास निधी आणणार असून बंजारा समाज बांधवांनसाठी संत सेवालाल महाराज यांचे भव्य दिव्य भवन लवकरच बांधणार असल्याचे सांगून आ. रमेशआप्पा कराड यांनी पंधरा वर्षातील काँग्रेसच्या आमदारांनी रेणापूरच्या विकासासाठी कोणती कामे केली, किती निधी दिला याचा हिशोब काँग्रेसवाल्यांनी जनतेला द्यावा असे आवाहन केले.

रेणापूर नगरपंचायत निवडणुकीतील भाजपाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार शोभा शामराव आकनगिरे आणि १३, १४, १५, १६ या प्रभागातील भाजपाचे उमेदवार उत्तम चव्हाण, ज्योती विजय चव्हाण, चतुरा साहेबराव लोकरे, अंजना दिलीप चव्हाण यांच्या प्रचारार्थ रेणुका नगर रूपचंद नगर परिसरात आ. रमेशआप्पा कराड यांची जाहीर सभा झाली. या सभेस भाजपाचे लातूर ग्रामीणचे माजी आमदार ॲड. त्र्यंबकनाना भिसे, भाजयुमोचे जिल्हा अध्यक्ष ऋषिकेशदादा कराड, विक्रमकाका शिंदे, भागवत सोट, नवनाथ भोसले, अनिल भिसे, श्रीनिवास

**रेणापूर शहराच्या विकासासाठी भाजपाने कोट्यावधीचा निधी दिला; काँग्रेसने पंधरा वर्षात काय दिले : आ. रमेशअप्पा कराड**

आकनगिरे, महेंद्र गोडभरले, सतीश आंबेकर, बन्सी भिसे, शरद दरेकर, शहराध्यक्ष अच्युत कातळे यांच्यासह भाजपाचे पदाधिकारी लोकप्रतिनिधी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते या सभेला बंजारा समाज बांधवासह चारही प्रभागातील मतदार बंधू भगिनींची मोठी गर्दी होती.

रेणापूर नगरपंचायतीच्या पहिल्या निवडणुकीत भाजपाचा नगराध्यक्ष होण्याचा मान मतदाराच्या आशीर्वादाने मिळाला असल्याचे सांगून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, नगरपंचायतीवर भाजपाची सत्ता आल्याने केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजनेच्या माध्यमातून प्रशासकीय इमारत, अशोक सम्राट बौद्ध विहार, रेणुका देवी मंदिर भक्तनिवास, मुस्लिम बांधवांसाठी शादीखाना, नवीन पाणीपुरवठा योजना, ईदगाह मैदान संरक्षण भिंत, अंगणवाडी सुसज्ज इमारती, इंन्डोअर स्टेडियम, विविध समाजासाठी समाज मंदिरे, रस्ते, नाली बांधकाम यासह विविध कामासाठी मोठ्या प्रमाणात निधी मंजूर करून आणला आहे.

काँग्रेसने आजपर्यंत केवळ भुलथापा आणि खोटी आश्र्वासने देऊन सत्ता मिळवण्याचा प्रयत्न केला. गेल्या पंधरा वर्षात काँग्रेस आमदारांनी रेणापूर शहरात कुठल्या विकासाला निधी आणला कोणती कामे केली असा प्रश्न उपस्थित करून केंद्रात आणि राज्यात भाजपाची सत्ता आहे रेणापूरच्या विकासाची नगर पंचायतीतही भाजपाची सत्ता आवश्यक असून भाजपाच्या सर्व उमेदवारांना प्रचंड मताधिक्याने विजयी करावे असे आवाहन आ. रमेशआप्पा कराड यांनी केले. प्रारंभी विजय चव्हाण यांनी सभेचे प्रास्ताविक केले सभेचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले. या सभेस दिनकर राठोड, गणेश चव्हाण, उज्वल कांबळे, संतोष राठोड, सुभाष राठोड, नंदकुमार मोठेगावकर, पांडुरंग वाकडे, देविदास राठोड, दगडू राठोड, लखू राठोड, भालचंद्र बिराजदार, गणपती चव्हाण, बाबुराव भोसले यांच्यासह कार्यकर्ते, पदाधिकारी, मतदार बंधू भगिनी उपस्थित होते.

# श्री चैतन्य टेक्नो स्कूलच्या मुख्याध्यापक, संचालकांविरुद्ध गुन्हा दाखल

## मनसे विद्यार्थी सेनेच्या लढ्याला यश

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २८ नोव्हेंबर :** महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्या सततच्या पाठपुराव्यामुळे अखेर येथील श्री चैतन्य टेक्नो स्कुलच्या मुख्याध्यापक व संचालकांवर लातूरच्या पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पालक व शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी हा गुन्हा दाखल केला गेला आहे.

लातूर येथील श्री चैतन्य टेक्नो स्कूलच्या व्यवस्थापनाकडून पालकांची व शासनाची फसवणूक केली जात असल्याप्रकरणी महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्या वतीने गेल्या दीड वर्षांपासून लातूर मधील अनधिकृत चालविण्यात येणाऱ्या या शाळेविरोधात आवाज उठवला होता. शासनाची कोणतीही परवानगी न घेता शाळा पालकाची फसवणूक करून लाखो रुपयाची फिस वसूल केली जात होती. ही बाब मनविसेच्या पदाधिकाऱ्यांच्या लक्षात आल्यावर मनविसेचे जिल्हाध्यक्ष तथा प्रदेश उपाध्यक्ष किरण चव्हाण यांच्या नेतृत्वात शिक्षण विभागाला निवेदन देण्यात आले होते.

त्यानुसार शिक्षण विभागाने तात्काळ कारवाई करत दि. २१ जुलै २०२५ रोजी शाळेला सिल लावून आरटीई एक्ट २००९ नुसार शाळेला प्रथम दिवशी १ लाख आणि पुढील दर दिवशी १० हजार प्रमाणे ७ लाखाचा दंड आकारण्यात आला होता. तो दंड न भरता शाळा प्रशासनाने शाळा चालूच ठेवली होती.त्यानंतर मनविसेने शाळेसमोर निदर्शने करून संताप व्यक्त केला होता. तरी देखील शाळा चालू ठेवली गेली, दीपावली सुट्ट्या नंतर शाळा प्रशासनाने लावलेले सिल तोडून इमारतीत मध्ये परीक्षा घेत असल्याचे मनसेच्या निदर्शनास आले. तेव्हा याची तात्काळ माहिती शिक्षण विभागास कळविली गेली. त्यानंतर तात्काळ दि. १९ नोव्हेंबर रोजी गटशिक्षण अधिकारी यांनी कर्मचारी पाठवून तपासणी केली असता सील तोडून शाळा चालू असल्याचे निर्दशनास आले. त्यांनी पंचनामा करून वरिष्ठाकडे अहवाल पाठवला. माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी डॉ. दत्तात्रय मठपती यांनी या प्रकरणी पोलिसात गुन्हा नोंद करण्याचे आदेश दिले. त

या आदेशानुसार शिवाजीनगर पोलीस ठाण्यात दि. २७ नोव्हेंबर रोजी पालकाची व शासनाची फसवून केल्याचा श्री चैतन्य टेक्नो स्कूल याच्या मुख्याध्यापक व संचालक यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची माहिती मनविसेचे जिल्हाध्यक्ष किरण चव्हाण यांनी दिली.

यापुढेही नियमबाह्य शाळा चालवणाऱ्यांवर कठोर कार्यवाहीचा बडगा उगारण्यास प्रशासनास भाग पाडू असेही किरण चव्हाण यांनी सांगितले.

# जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे २ डिसेंबर रोजी आयोजन

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २८ नोव्हेंबर :** युवकांच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी प्रतिवर्षी केंद्र शासनाच्यावतीने १२ ते १६ जानेवारी या कालावधीत राष्ट्रीय युवा महोत्सव आयोजित करण्यात येतो. राष्ट्रीय युवा महोत्वामध्ये राज्याचा प्रातिनिधीक संघ सहभागी करण्यासाठी राज्य शासनाने प्रतिवर्षी जिल्हास्तर, विभागस्तर व राज्यस्तरावर युवा महोत्सवाचे आयोजन करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे. त्यानुसार जिल्हास्तर युवा महोत्सवाचे आयोजन २ डिसेंबर, २०२५ रोजी लातूर येथे करण्यात येणार आहे. या स्पर्धेमधून प्रथम क्रमांकाच्या स्पर्धकाची विभागीय युवा महोत्सवासाठी निवड करण्यात येणार आहे.

यासाठी स्पर्धकांचे प्रवेश अर्ज १ डिसेंबर, २०२५ रोजी पर्यंत क्रीडा अधिकारी कृष्णा केंद्रे (मो. ९९७५५६६००) यांच्याकडे सादर करावेत. जिल्ह्यामधील सर्व शाळा, महाविद्यालय, युवक मंडळे यातील इच्छूक कलावंताना, स्पर्धकांना यामध्ये सहभागी होता येईल.

समूह लोकनृत्य, समूह लोकगीत, कथालेखन, चित्रकला, वक्तृत्व (भारतातील आणीबाणीचा काळ आणि संविधानोचे उल्लंघन आणि लोकशाही व लोकशाही मूल्यांचे संरक्षण), कविता लेखन, नवोपक्रम (विज्ञान प्रदर्शन) या जिल्हास्तरावर युवा महोत्सव स्पर्धा २ डिसेंबर, २०२५ रोजी सकाळी १० वाजता लातूर जिल्हा क्रिडा संकुल येथे आयोजित करण्यात आल्या आहेत. जिल्हास्तरीय युवा महोत्वामध्ये सहभागी होण्यासाठी इच्छूक स्पर्धकांनी १ डिसेंबर, २०२५ पर्यंत आपले अर्ज लातूर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय येथे सादर करावेत, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे यांनी केले आहे.

# दत्तनगरीत रौप्य महोत्सवी श्री दत्त जयंती उत्सवास प्रारंभ

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २८ नोव्हेंबर :** लातूर शहरापासूनच जवळच असलेल्या नांदगाव इथिओल दत्तनगरीतील श्री दत्त मंदिर देवस्थानमध्ये रौप्य महोत्सवी दत्त जयंती उत्सवास थाटात प्रारंभ झाला. दत्तनगरीचे संस्थापक गुरुवर्य प.पू. गुलाबगिरी महाराज यांच्या दिव्य सान्निध्यात हा उत्सव साजरा करण्यात येत आहे.

नांदगावच्या माळरानावर गुरुवर्य प.पू. गुलाबगिरी महाराजांनी श्रीदत्त मंदिर देवस्थानची उभारणी करून या जागेचे मनमोहक अशा नंदनवनात रुपांतर केले आहे. मागच्या २५ वर्षांपासून या ठिकाणी श्रीदत्त जयंतीचा उत्सव विविध धार्मिक कार्यक्रम, भजन, किर्तनाने हर्षोल्हासात साजरा केला जातो. या उत्सवाचे हे रौप्यमहोत्सवी वर्ष आहे. प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही श्री गुरुचरित्र पारायण, श्रीमद याग व अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्यास सुरुवात झाली आहे. सप्ताहाचे औचित्य साधून बुधवारी श्रीदत्त



महाराजांच्या पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. अत्यंत भक्तिमय वातावरणात गुलाबगिरी महाराजांच्या मार्गदर्शनाखाली हा पालखी सोहळा पार पडला. गुरुवारी सायंकाळी हभप. गोपाळदेव जोशी महाराज ढाळे गावकर यांचे सुश्राव्य कीर्तन झाले. आपल्या ओघवत्या वाणीतील किर्तनाने महाराजांनी उपस्थित भाविक भक्तांना अक्षरशः मंत्रमुग्ध केले. यानिमित्त श्री दत्त भजनी मंडळ. नांदगाव, संतकृपा भजनी मंडळ, राघवेंद्र महिला भजनी मंडळाचा भजनाचा कार्यक्रम झाला. शुक्रवारी जनाबाई महिला भजनी मंडळाच्या भजनी मंडळाने उत्तम भजने तसेच गवळणी प्रस्तुत करून भाविक भक्तांची मने जिंकली शाम मोरे यांच्या गवळणीने उपस्थित भाविक आपले देहभान हरवून गेल्याची अनुभूती आली.

या वर्षीच्या उत्सवाविषयी बोलताना गुलाबगिरी महाराज म्हणाले की, प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही श्रीदत्त महाराजांच्या कृपाशीर्वादाने अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यावर्षीचा सोहळा रौप्य महोत्सवी असल्याने प्रतिवर्षाच्या तुलनेत भाविक भक्तांची उपस्थितीही लक्षणीय असणार आहे. त्यादृष्टीने देवस्थानच्या वतीने सर्वतोपरी नियोजन करण्यात आले आहे. सप्ताहादरम्यान भाविकांसाठी दररोज महाप्रसादाचीही सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. या सोहळ्यास विविध समाजाच्या स्तरातील मान्यवरांचे सहकार्य लाभले असून या सोहळ्याचा परिसरातील भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहनही गुलाबगिरी महाराजांनी केले आहे.

# लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कूलमध्ये संविधान दिवस

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २८ नोव्हेंबर :** लातूर येथील मातोश्री कलावती प्रतिष्ठान संचालित लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कूल मध्ये संविधान दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी शाळेच्या प्रभारी प्राचार्या नम्रता झांबरे समन्वयक रौफ शेख, समन्वयिका रुपाली कोकाटे, विद्या पाटील यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

२६ नोव्हेंबर हा दिवस भारताच्या लोकशाही इतिहासात अतिशय खास मानला जातो. या दिवशी भारतीय लोकशाहीचा पाया रचला गेला. भारतात दरवर्षी आजचा दिवस संविधान दिवस म्हणून साजरा केला जातो. संविधानातील प्रत्येक शब्दाचा अर्थ मुलांना शाळेचे समन्वयक रौफ शेख यांनी समजाऊन सांगीतला. याप्रसंगी शाळेतील विद्यार्थ्यांनी, शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी संविधानाच्या उद्देशिकेचे सामुहिक वाचन केले. शिक्षक, शिक्षीका यांनी संविधान दिवसाच्या



याप्रसंगी शाळेतील विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरयांच्याप्रतिमेस अभिवादन केले. प्रमुख पाहुणे म्हणून कार्यक्रमास उपस्थित असलेले श्रीकृष्ण लाटे, शाळेतील विदयार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षक, शिक्षीका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विशेष प्रयत्न केले.

## खड्डेविषयक कार्यवाहीसाठी समिती गठीत

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २८ नोव्हेंबर :** मुंबई उच्च न्यायालयात दाखल जनहित याचिका क्रमांक ७१/ २०१३ मधील अंतरीम अर्ज क्र. २९११९/२०२५ मध्ये उच्च न्यायालयाने दिलेल्या १३ ऑक्टोबर, २०२५ रोजीच्या आदेशानुसार समिती गठीत करण्यात आली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारितील रस्त्यांवरील खड्डे, मॅनहोल यामुळे होणारे अपघात, मृत्यू च्याअनुषंगाने नुकसान भरपाई देण्यासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाचे अप्पर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली गठीत या समितीचे सदस्य सचिव सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव हे असतील.

# जागतिक एड्स दिनानिमित्त १ डिसेंबर रोजी सायकल रॅली

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २८ नोव्हेंबर :** महाराष्ट्र एड्स नियंत्रण संस्था व जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर - घुगे यांच्या सूचनेनुसार जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदीप ढेले यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण पथक, जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय यांच्यावतीने १ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ६.३० वाजता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथून सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. जागतिक एड्स दिनानिमित्त एचआयव्ही, एड्स जनजागृतीसाठी होत असलेल्या या उपक्रमाचे घोषवाक्य 'अडथळ्यांवर मात करून, एकजूटीने एचआयव्ही, एड्सला लढा देवू, नवं परिवर्तन घडवू' असे आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथून सायकल रॅलीला सुरुवात होईल.

या रॅलीत लातूरमधील सायकल क्लब, विद्यार्थी, स्थानिक सामाजिक संस्था, मान्यवर व्यक्ती, शासकीय अधिकारी व कर्मचारी सहभागी होणार आहेत. तसेच रॅलीच्या समारोप प्रसंगी रेड रिबन क्लब विद्यार्थीमार्फत जगजागृतीपर फ्लॅश मॉब कार्यक्रम घेण्यात येणार आहे. या सायकल रॅलीत नागरिकांनी सहभागी होण्याचे आवहन जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयामार्फत करण्यात आले आहे. तसेच १ डिसेंबर, २०२५ रोजी दुपारी २ वाजता एचआयव्ही जीवन जगणाऱ्या ११ ते १८ वर्षे वयोगटातील मुला-मुलींसाठी चित्रकला स्पर्धाचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचबरोबर १ ते १५ डिसेंबर, २०२५ या कालावधीत जिल्ह्यातील महाविद्यालयांमध्ये व्याख्याने, पोस्टर प्रदर्शन, विविध स्पर्धा, जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.